# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**Yeshwantrao Chavan Pratishthan, Mumbai**



# २२ वा वार्षिक अहवाल

## सन २००६-२००७

**22nd Annual Report, 2006-2007**




यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार मा.श्री.शरदराव पवार,केंद्रीय कृषीमंत्री यांच्या हस्ते स्वीकारतांना मा.श्रीमती सुधा मूर्ति सोबत मा.श्री.नारायण मूर्ति.




यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार मा.श्री.शरदराव पवार,केंद्रीय कृषीमंत्री यांच्या हस्ते स्वीकारतांना मा.श्री.नारायण मूर्ति. सोबत उपाध्यक्ष मा.श्री.हुसेन दलवाई व सरचिटणीस मा.श्री.शरद काळे.

# २२ वा

# वार्षिक अहवाल

## २००६ - २००७


## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई



जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई-४०००२१

दूरध्वनी क्र.२२०२८५९८, २२८५२०८१, २२०४५४६०, २२८५२३४५

फॅक्स : २२८५२०८२

Email : ybchavan@bom3.vsnl.net.in

Visit us : ybchavanpratishthan.org

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## वार्षिक अहवाल
## २००६-२००७

### अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण केंद्रातील उपक्रम | ६ |
| २. | यशवंतराव चव्हाण केंद्रात झालेले महत्त्वाचे कार्यक्रम | ८ |
| ३. | प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या स्पर्धा-पारितोषिक योजना | |
| ४. | विशेष कार्यक्रम | ९ |
| ५. | माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | ९ |
| ६. | प्रतिष्ठानच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रम | १० |
| ७. | प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली अनुदाने | ११ |
| ८. | प्रतिष्ठानला मिळालेले अनुदान | ११ |
| ९. | प्रतिष्ठानच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम/उपक्रम | ११ |
| १०. | प्रतिष्ठानची विभागीय केंद्रे | ३२ |
| ११. | वार्तापत्र | ४८ |
| १२. | वैधानिक लेखा परीक्षकांचा दाखला | ४९ |
| १३. | हिशोबीपत्रके व परिशिष्टे | ५० |
| १४. | प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने | |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम. एम. एच/बी. ओ. एम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन.जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई-४०००२१


**• विश्वस्त मंडळ सदस्य •**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. हुसेन दलवाई | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. अरुण गुजराथी | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. डॉ. रवींद्र बापट | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. मोहन धारिया | |
| ७. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ८. | मा. प्रा. पी. बी. पाटील | |
| ९. | मा.श्री.राम प्रधान | |
| १०. | मा. श्री. गुलाम गौस | |
| ११. | मा. श्री. लक्ष्मण माने | |
| १२. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १३. | मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे | |
| १४. | मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे | |
| १५. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील<br>महाराष्ट्र शासन प्रतिनिधी | |
| १६. | मा. श्री. सुभाष लाला<br>मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव<br>मा. श्री. उमेशचंद्र सरंगी,<br>(मार्च २००७ पासून) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव | |
| १७. | मा. श्री. पी, बी. जाधव<br>प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग | |

**• कार्यकारिणी मंडळ सदस्य •**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरुण गुजराथी
४. मा. श्री. श. गं.काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. बापूसाहेब काळदाते
१०. मा. श्री. रा. सु. गवई
११. मा. श्री. एन. के. पी. साळवे
१२. मा. श्री. के. बी. आवाडे
१३. मा. श्री. गिरीश गांधी
१४. मा. श्री. श्रीनिवास पाटील
१५. मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
१६. मा. श्री. शिवाजीराव गि. पाटील
१७. मा. श्री. सा. रे. उर्फ आप्पासाहेब पाटील
दत्त सहकारी साखर कारखाना,
लि. शिरोळ, जि. कोल्हापूर
१८. मा. श्री. अंकुशराव टोपे
१९. मा. श्री.शामराव पाटील
मा. अध्यक्ष, सह्याद्रि सहकारी साखर कारखाना,
कराड (पदसिद्ध)
२०. मा. श्री. अशोक मारुतराव घुले-पाटील
२१ मा. श्री. माणिकराव पाटील
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)
मा. श्री. सुभाष लाला
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
२२. मा. श्री. उमेशचंद्र सरंगी
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (मार्च २००७ पासून)

**कार्यकारी समिति**

१ मा. श्री. शरदराव पवार
२ मा. श्री. हुसेन दलवाई
३ मा. श्री. अरुण गुजराथी
४ मा. श्री. श. गं. काळे
५ मा. डॉ. रवींद्र बापट
६ मा. श्री. श्रीनिवास पाटील
७ मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई


| | | |
|---|---|---|
| कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. ज्ञानेश्वर खैरे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती विजया चौहान |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| | | श्री. सुनिल वालावलकर |
| मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथालय सल्लागार | श्री. वा. रा. कामत |
| | ग्रंथपाल | श्री. अनिल पाझारे |
| मुख्य कार्यालय | आर्थिक सल्लागार | श्री. व्ही. गणपती |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| रंगस्वर-सृजन | प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर-श्री. सुशील गुप्तन |
| | मुख्य विपणन | श्री.विक्रम वासुदेव |
| विभागीय केंद्र कराड | अध्यक्ष | श्री. राम प्रधान |
| विभागीय केंद्र पुणे | अध्यक्ष | श्री. ज्ञानेश्वर खैरे |
| विभागीय केंद्र नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र लातूर | अध्यक्ष | श्री. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र कोकण | अध्यक्ष | श्री. भाऊसाहेब नेवाळकर |
| प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम | कार्यकारी सचिव | श्रीमती फरिदा लांबे |
| मानद वास्तुविशारद | | मेसर्स शशी प्रभु ॲण्ड असोशिएटस् |
| सांविधिक लेखा परीक्षक | | मेसर्स सी. व्ही. के. ॲण्ड असोसिएटस् |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | | मेसर्स टेंबे आणि म्हात्रे |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा सन २००६-२००७ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**व्यवस्थापन :**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या १० बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. सदर समितीचे सदस्य, पदाधिकारी, विविध विभागांचे प्रमुख नियमितपणे आपापले कामकाज करीत आहेत. विश्वस्त मंडळाच्या ३ पुढीलप्रमाणे बैठका झाल्या (दि. २५ सप्टेंबर २००६, दि. २५ नोव्हेंबर २००६, दि. १२मार्च २००७) रोजी व कार्यकारिणी मंडळाच्या ३ सभा (दि. २५ सप्टेंबर २००६, दि. २५ नोव्हेंबर २००६ व दि. १२ मार्च २००७) रोजी बैठका झाल्या. तसेच कार्यकारी समितीच्या दि. २७ एप्रिल २००६, २७ मे २००६, २८ जून २००६, २५ जुलै २००६, २२ ऑगस्ट २००६, १७ ऑक्टोबर २००६, २५ नोव्हेंबर २००६, २२ डिसेंबर २००६, तसेच १ फेब्रुवारी २००६, ३ मार्च २००६ रोजी बैठका झाल्या. प्रतिष्ठानच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मेसर्स टेंबे ॲण्ड म्हात्रे असोसिएटस्, चार्टर्ड अकाउटंट यांचेमार्फत केली जाते व त्यांचे अहवाल कार्यकारी समितीपुढे ठेवले जातात. वार्षिक हिशेबाची तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी. व्ही. के. ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकाउटंट यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आधीन राहून प्रत्येक विभागीय केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून तिमाही अहवाल मागविले जातात. प्रतिष्ठानची वेबसाईट ybchavanpratishthan.org असून ती वेळोवेळी अद्यावत करण्यात येते.

सभासद संख्या : अहवाल वर्ष अखेर (३१ मार्च २००७) प्रतिष्ठानची निरनिराळया प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे-

१. संस्थापक सदस्य ७१
२. आजीव सदस्य १९४
३. संस्था सदस्य २९

महाराष्ट्र शासनाने श्री. उमेशचंद्र सरंगी, मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव व श्री. पी. बी. जाधव, प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग हे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत. त्यापैकी श्री. उमेशचंद्र सरंगी, मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव यांची कार्यकारिणी मंडळावरही नियुक्ति केलेली आहे.

**केंद्र इमारतीच्या वाढीव बांधकामाबाबत :**

केंद्र इमारतीच्या वाढीव बांधकामास शासनाने मान्यता दिल्यानंतर मेसर्स शशी प्रभु ॲण्ड असोसिएटस् यांच्यामार्फत वाढीव बांधकाम करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या. मेसर्स बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची निविदा माफक असल्याने त्यांना हे काम देण्यात आले. कामाची सुरुवात करण्यापूर्वी चौथ्या मजल्यावरील कार्यालये व माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीसाठी पर्यायी जागा निर्माण करण्यात आली. त्यानुसार माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी व इतर सर्व कार्यालये सुसज्ज व्यवस्था करुन केंद्र इमारतीच्या तळमजल्यावर हलविण्यात आली. तसेच प्रतिष्ठानचे मुख्य कार्यालय केंद्र इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील सांस्कृतिक सभागृहात हलविण्यात आले. केंद्र इमारतीच्या गच्चीवर असलेली वातानुकूलन यंत्रणा तळमजल्यावरील मोकळ्या जागेत स्थलांतरित करण्यात आलेली आहे. मेसर्स बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने पांचव्या मजल्यावरील स्लॅबचे व इतर बांधकामाचे काम बहुतांशी पूर्ण केलेले आहे.

वाढीव बांधकामाबाबत निर्णय घेणेसाठी व कार्यवाही करण्यासाठी विश्वस्त मंडळाने प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा. श्री. अरुण गुजराथी यांच्या अध्यक्षतेखाली बांधकाम समिती स्थापन केलेली आहे. त्याचे सदस्य सरचिटणीस श्री. शरद काळे, कोषाध्यक्ष डॉ. रवि बापट, वास्तुविशारद शशि प्रभू, शासनाच्या बांधकाम विभागाचे निवृत्त सचिव श्री. एस. आर. तांबे व शासनाने नियुक्त केलेले उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग हे आहेत. बांधकाम समितीची बैठक महिन्यातून एकदा आयोजित केली जाते व कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येतो. दैनंदिन बांधकाम कामासंदर्भात सरचिटणीस श्री. शरद काळे यांच्या अध्यक्षतेखाली बांधकाम समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात येते.

यामध्ये बांधकामाशी संबंधित सर्व लोक उपस्थित राहतात.

### **१. यशवंतराव चव्हाण केंद्रातील उपक्रम :**

**अ) मुख्य सभागृह :**

यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांसाठी तसेच निरनिराळया सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिसंवाद, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीतसभा आदि कार्यक्रमही सभागृहात झाले. सभागृह सर्व सोयींनी युक्त तसेच अद्ययावत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सभागृहात डॉल्बी डिजिटल साउंड सिस्टिम बसविण्यांत आली आहे.

**ब) सांस्कृतिक सभागृह :**

या सभागृहांत आता कलाप्रदर्शनाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. देशाच्या व राज्याच्या विकासाशी संबंधित सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वरुपाच्या परिषदा, परिसंवाद व चर्चासत्रे घेण्यासाठी तसेच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य सभागृह, सांस्कृतिक सभागृह तसेच कलादालन सवलतीच्या दरात देण्यात येतात.

**क) यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय :**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालय हे 'संदर्भ ग्रंथालय' असून सभासदांनी, ग्रंथ ग्रंथालयातच वाचावयाचे आहेत. ग्रंथालय वार्षिक वर्गणी रु. २५०/- आहे. तथापि प्रतिष्ठानच्या आजीव सभासदांना वर्गणी न आकारता यशवंतराव चव्हाण ग्रंथालय उपलब्ध करण्यात आले आहे. कॉलेज विद्यार्थ्यांना नाममात्र वार्षिक वर्गणी रु. २५/- घेऊन त्यांना ग्रंथालय उपलब्ध केले आहे.

ग्रंथालयीन नियमानुसार ग्रंथालयाची कामकाजाची आखणी केली आहे. यशवंतराव चव्हाण ग्रंथालयास शासनाकडून रु. ६४०००/- अनुदान मिळाले आहे. प्रतिष्ठानच्या सन २००६-२००७ अंदाजपत्रकात एकूण रक्कम रु. २ लाख मंजूर झाली होती. या रकमेतून, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, कायद्याची पुस्तके, ललित वाड़मय व संदर्भ ग्रंथ यशवंतराव चव्हाण ग्रंथालयासाठी घेतले आहेत. २००६-२००७ या आर्थिक वर्षात ग्रंथालयासाठी रु. १,५४,५९६/- खर्च झाले आहेत.

यशवंतराव चव्हाण ग्रंथालय विकसित करण्याचे काम अव्याहत सुरु असून ग्रंथालयाचे आयोजन व व्यवस्थापन यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले आहे.

**या आर्थिक वर्षात खालील महत्त्वाची पुस्तके यशवंतराव चव्हाण ग्रंथालयासाठी घेतली आहेत.**

१. नामदेव : भारतीय साहित्याचे निर्माति-म. गो. देशमुख,साहित्य अकादमी,मुंबई
२. तमाशा : एक रांगडी गंमत - सं. श्री. भंडारे
३. Our Parliment : An Introduction to the Parliment of India - S.C.Kashyap
४. Social Democracy in Practice - P. Bise
५. The Managment BIBLE N. Flanayan
६. अस्तित्ववाद आणि मराठी कादंबरी-रेखा साने-इनामदार
७. नादवेध : सु. पिशवीकर
८. संतसमाज आणि अध्यात्म- वि.शं.चौघुले
९. The last Mughal W. Dalvymple
१०. भारताचे परराष्ट्र धोरण डॉ. दुभाषी
११. मुंबईचा अन्नदाता-शी. बोन्द्रे
१२. The Beautiful India S. A. Rehana
१३. बखर पर्यावरणाची-देऊळगावकर
१४. Right to Information Ad 2005 - Universal prakashan

१५. Evoking H. M. Seervai
१६. ब्रिटीशांची भारतातील राजनीती-एस. गोपाळ
१७. लोकमान्य ते महात्मा-स. मोरे
१८. महाराष्ट्र आणि मराठे अ. रा. कुलकर्णी
१९. माझा समुद्र शोध श्री. कार्लेकर
२०. प्राचीन भारताचा राजकीय इतिहास

ग्रंथालयाचे माहिती सेवा देणे हे मूलभूत कार्य आहे. संगणक तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रंथालय पुढील योजना तयार करण्यास प्रयत्नशील आहे. काही महत्त्वाच्या घडामोडींचे वृत्तपत्रीय कात्रणे संग्रहित करणे ग्रंथालयाचे उद्दिष्ट आहे.

ग्रंथालय व्यवस्थापनाचे काम ग्रंथपाल श्री. अनिल पुं. पाझारे करतात. श्री. वासुदेव रा. कामत हे ग्रंथालय सल्लागार म्हणून काम पाहतात.

**ड) युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सचे संशोधन केंद्र :**

युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृद्धीसाठी ते फार महत्त्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळ्या क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येईल, याची माहिती प्रसिद्ध केली जाते.

**इ) महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ :**

महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कै.डॉ.धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सकपद्धतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केलेल्या आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. या उपक्रमासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**ई) बॉम्बे सिटीपॉलिसी रिसर्च फाउंडेशन (बॉम्बे फर्स्ट) :**

केंद्र इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील ४०० चौ. फूटाची जागा बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन (बॉम्बे फर्स्ट) या सार्वजनिक न्यासास संशोधन कार्यासाठी दिलेली आहे. बॉम्बे फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक/वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारुन येथील पायाभूत सुविधामध्ये विकास करुन नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते.

**उ) अनुबोधपट :**

मा.चव्हाणसाहेबांच्या जीवनावर अनुबोधपट तयार करण्याचे काम नामवंत दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांचेकडे सोपविण्यात आलेले असून त्यांनी ग्रंथसामग्री, पत्रव्यवहार, छायाचित्रे, वर्तमानपत्रीय लेखन व मा. यशवंतराव चव्हाण यांच्या सहवासातील समकालीन ज्येष्ठ मान्यवरांच्या मुलाखती घेण्याचे काम महाराष्ट्रातील जवळजवळ पूर्ण झाले असून दिल्ली येथील मान्यवर एकत्रित जमवून मुलाखतीस सुरुवात करण्याचा प्रयत्न चालू आहे. सदर अनुबोधपटासाठी महाराष्ट्र शासनाकडून आर्थिक अनुदान मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

## २) यशवंतराव चव्हाण केंद्रात झालेले महत्त्वाचे कार्यक्रम

### अ) मा. चव्हाणसाहेबांची पुण्यतिथि व जयंती :

मा.चव्हाणसाहेबांच्या २२ व्या पुण्यतिथिनिमित्त दि.२५ नोव्हेंबर २००६ रोजी चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मा.ना.श्री.अरुण गुजराथी, माजी विधानसभा अध्यक्ष व प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष उपस्थित होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन २००६', कृषी-औद्योगिक क्षेत्रात प्रगति केलेले श्री.भवरलाल जैन यांना प्रदान करण्यात आले व 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २००६' जाहीर करण्यात आला. याच कार्यक्रमात प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या खुल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. तसेच 'यशवंतराव चव्हाण ई बुक' चे प्रकाशन मा.अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले.

मा. यशवंतराव चव्हाण यांचा ९४ वा जयंती समारंभ सोमवार दि. १२ मार्च २००७ रोजी.चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा. ना. श्री. शरदराव पवार,केंद्रिय कृषीमंत्री व प्रमुख अतिथी म्हणून मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील, राज्यपाल, राजस्थान हे होते. या कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २००६ मा. श्रीमती सुधा मूर्ति व मा.श्री.नारायण मूर्ति यांना प्रदान करण्यात आला. समारंभाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत मा. श्री. अरुण गुजराथी, कार्याध्यक्ष यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन सौ. सुप्रिया सुळे, विश्वस्त यांनी केले. याच कार्यक्रमात 'न्याय व्यवहार आणि मराठी भाषा' या पुस्तकाचे प्रकाशन भारताचे कृषीमंत्री मा. ना. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. वरील दोन्ही कार्यक्रमास प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य तसेच इतर प्रतिष्ठित मान्यवर मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

### ब) यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक :

प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांमधील एक भाग म्हणून खालील क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्ति वा संस्थेला चक्रीयपद्धतीने पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१) यशवंतराव चव्हाण कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक
२) यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता/विज्ञान तंत्रज्ञान पारितोषिक
३) यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक
४) यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती/कला व क्रीडा पारितोषिक

यावर्षीचे 'यशवंतराव चव्हाण कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक' या क्षेत्रासाठी होते. कृषी औद्योगिक क्षेत्रात प्रगति केलेले श्री.भवरलाल जैन यांना मा.चव्हाणसाहेबांच्या २२ व्या पुण्यतिथीदिनी, २५ नोव्हेंबर २००६ रोजी मा.श्री.ना.धों.महानोर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. १ लाख रुपये व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरुप आहे.

### क) यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार :

मा.यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार' व सन्मानपत्र देण्यात येते. रक्कम रुपये २ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्यन्यायाधीश मा.वाय.व्ही.चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमण्यात आली आहे. मा.डॉ.भालचंद्र मुणगेकर, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मा.डॉ.अनिल काकोडकर, अध्यक्ष, परमाणु ऊर्जा आयोग, मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, महानिदेशक वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद, मा. डॉ. अरुण निगवेकर, अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, मा. डॉ. रुपा शहा,कुलगुरु,एस.एन.डी.टी.विद्यापीठ, मा.श्री.चार्ल्स कुरिया, प्रख्यात आर्किटेक्ट व राष्ट्रीय नागरी आयोगाचे भूतपूर्व अध्यक्ष हे या समितीचे सदस्य आहेत.

या निवड समितीच्या शिफारशीनुसार यावर्षीचा राष्ट्रीय पुरस्कार मा.श्रीमती सुधा मूर्ति व मा.श्री.नारायण मूर्ति यांना मा.चव्हाणसाहेबांच्या ९४ व्या जयंतीदिनी १२ मार्च २००७ रोजी भारताचे कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.श्री.शरदराव पवार यांच्या हस्ते तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त व सभासद यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपूर्वक देण्यात आला.

## ३. खुली निबंध स्पर्धा :

या स्पर्धेसाठी 'महाराष्ट्र राज्य आणि आपत्ती व्यवस्थापन' हा विषय निवडण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील स्पर्धकांनी भाग

घेतला होता. स्पर्धेचे परीक्षक म्हणून कर्नल मराठे,पुणे यांनी काम केले. या स्पर्धेमध्ये श्री.विश्वनाथ पांडुरंग कांबळी,बोरिवली,मुंबई यांना प्रथम पारितोषिक रु.५०००/-, श्री.अनंतराव लिंबाजी काहीड, लातूर यांना द्वितीय पारितोषिक रु.३०००/-, श्री.अमोल शिवाजीराव जोशी,लातूर यांना तृतीय पारितोषिक रु.२०००/- देण्यात आली. सदर स्पर्धेमध्ये उत्तेजनार्थ बक्षीस कु.मोहिनी संजय पवार,नाशिक यांना देण्यात आले. सदर पारितोषिके मा.चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी समारंभपूर्वक देण्यात आली.

**४. विशेष कार्यक्रम :**

**अ) ज्येष्ठ नागरिक मेळावा :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबईतर्फे दिनांक २९ ऑक्टोबर २००६ रोजी मुंबईतील कुर्ला ते कर्जत, कसारा व नवी मुंबई या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मा. श्री. हुसेन दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली व ज्योतिर्भास्कर जयंत साळगांवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी केले. सदर कार्यक्रमात भांडुपच्या श्रीमती नलिनी दत्तात्रय शहाणे, मुलुंडच्या श्रीमती प्रभा आनंद देशमुख, कुर्ल्याचे श्री. प्रभाकर काशिनाथ छत्रे आणि कर्जतचे श्री. मनोहर दत्तात्रय रणदिवे यांचा ज्येष्ठ नागरिक म्हणून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास जवळजवळ १५० ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

**५. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी हे सीडॅक, पुणे यांचे संगणक प्रशिक्षणाचे अधिकृत केंद्र मे १९९९ मध्ये स्थापन झालेले आहे. या विभागाने सुरुवातीला डिप्लोमा इन ॲडव्हान्सड् कॉम्प्युटींग (DAC) आणि डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (DIT) हे संगणक प्रशिक्षणाचे वर्ग सुरु केले. मागील वर्षाप्रमाणे २००६-२००७ मध्ये देखील विद्यार्थ्यांचा प्रतिसाद उत्तम असून लक्षणीय प्रगति या केंद्राने केली आहे. व्यवस्थापनामध्ये काही तुरळक अडचणी येऊन सुद्धा प्रशिक्षणाचा दर्जा चांगला ठेवला आहे.

केंद्र इमारतीच्या अतिरिक्त पांचव्या मजल्याचे बांधकाम सुरु झाल्यामुळे तूर्त प्रशिक्षणाचे वर्ग बेसमेंटमध्ये सुरु केले आहेत. ही तात्पूरती व्यवस्था असून लवकरच सन २००७ च्या अखेरीस पांचव्या मजल्यावर प्रशिक्षणाचे वर्ग घेण्याची कायम व्यवस्था करण्यात येणार आहे.

**प्रशिक्षण :**

डिप्लोमा इन ॲडव्हान्सड् कॉम्प्युटींग (DAC) : यावर्षी ॲडव्हान्सड् कॉम्प्युटींगचे वर्ग तीन बॅचेस मध्ये आयोजित करण्यात आले होते. या वर्गामध्ये ३०४ विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे प्रशिक्षणाचे शिक्षण पूर्ण केले.

बॅचेसमधील गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांची खालीलप्रमाणे निवड करून बक्षिसे देण्यात आली.

अ) DAC फेब्रुवारी २००६ श्री. सुमीत रुसिया, प्रथम पारितोषिक, श्री. मनोज भगत, द्वितीय पारितोषिक, श्रीमती धन्या नायर, तृतीय पारितोषिक.

ब) DAC ऑगस्ट २००६ श्री. अमरिश शहा, कु. चेतना भगत, कु. सारिका भंडेवार

क) DAC फेब्रुवारी २००७ श्री. तन्वीर मोमिन, कु. प्रेरणा भगत, श्री. विकास गुप्ता.

सीडॅकने औद्योगिक क्षेत्राला आवश्यक असणारे उच्च संगणकतज्ञ तयार करण्यासाठी श्रेष्ठ दर्जाचा अभ्यासक्रम तयार केला आहे. याचे महत्त्व अग्रगण्य कंपनींतील प्रमुखांनी देखील मान्य केले आहे.

'सी' प्रोग्रॅमिंग कोर्स देखील घेण्यात येतात. ज्यामुळे विद्यार्थ्यांची DAC-CET ची तयारी होते. याचे प्रशिक्षण ऑनलाईनद्वारा सुध्दा देण्यात येते.

डिप्लोमा इन ॲडव्हान्सड् कॉम्प्युटींग आर्टस (DACA) : नॅशनल मल्टिमिडिया रिसोर्स सेंटर, पुणे द्वारा चालणारे ॲडव्हान्सड् कॉम्प्युटर आर्टस् व इतर कोर्स (C-DAC ACTS) पुणेद्वारा घेण्यात येतात. त्यामुळे कॉम्प्युटर आर्टस्च्या प्रशिक्षणामध्ये याची भर पडली आहे.

मुंबई शहर हे कॉम्प्युटर आर्टस् आणि मल्टिमिडिया ॲप्लिकेशन्ससाठी प्रमुख ठिकाण आहे. येणाऱ्या चालू वर्षात यामध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

चालू वर्षातील तीन (DACA) बॅचचा निकाल चांगला लागला आहे. शिवाय डिप्लोमा इन मल्टिमिडिया क्रिएशनच्या पाच बॅचेस घेण्यात आल्या आहेत.

**डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (DIT) बेसिक कोर्सेस :**

२००६-२००७ या वर्षात DIT च्या तेरा बॅचेस घेण्यात आलेल्या आहेत. यामधून जवळजवळ १७४ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

**कॉर्पोरेट ट्रेनिंग :** वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये संस्थांमध्ये उच्चशिक्षित संगणतज्ञांच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे हे लक्षांत घेऊन संस्था YCP'S AIT च्या प्रशिक्षणवर्गांसाठी आपली मागणी नोंदवितात. यामध्ये खालील संस्थांचा समावेश आहे.

भारतीय लष्कर, DGQA
भारतीय नौदल, भारतीय अन्न महामंडळ
ऑल इंडिया रेडिओ, बॉम्बे चार्टर्ड अकाउंटंटस् व इतर

**प्लेसमेंट :** वेगवेगळ्या नामांकित कंपनी AIT च्या कॅम्पस् इंटरव्ह्यूमध्ये सहभागी होतात. यामध्ये AIT च्या विद्यार्थ्यांनी आपली चांगली कामगिरी दाखविली.

फेब्रुवारीच्या २००६ च्या बॅचमधील जवळजवळ ९५ टक्के विद्यार्थी कॅम्पस् इंटरव्ह्यूमधून नियुक्त झाले आहेत. तर ऑगस्ट २००६ च्या बॅचमध्ये ९८ टक्के विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

**इतर विविध कार्यक्रम :**

व्यावसायिक/व्यापारीक संवाद, सामान्यज्ञान, बुद्धिमत्ता चाचणी ह्या मुख्य विषयाच्या प्रशिक्षणात सहभाग.

कॉम्प्युटर आर्टस्च्या विद्यार्थ्यांनी आर्ट फेस्टिव्हल, ॲनिमेशन मुव्हिज्, सेमिनार इत्यादि ठिकाणी हजेरी लावली.

संस्थेला माजी विद्यार्थ्यांच्या भेटी हे AIT चे वैशिष्ट्य आहे. त्यामध्ये त्यांनी आपल्या विचारांची देवाणघेवाण केली. जुन्या आठवणी जागवल्या व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन घडामोडींची ओळख करुन दिली.

विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्रे तसेच त्यातून प्रेरणा मिळावी याकरिता पुढील मान्यवर तज्ञांना निमंत्रित करण्यात आले. मा. श्री. एलस्टन, व्यवस्थापक, एच. आर. सायबेज्, मा. श्री. राजीव पानीकांत, उपाध्यक्ष, युटीआय, मा. श्री. यतिन नेरुरकर, उपाध्यक्ष, एन. एस. डी. एल. मा. श्री. किशन पारेख, तांत्रिक संचालक, स्टारकॉर्न, सॉफ्टवेअर कंपनी लि., मा. श्री. अच्युत गोडबोले, ज्येष्ठ संगणकतज्ञ, मा. श्री. सॅम पित्रोदा, अध्यक्ष, ज्ञान आयोग.

या वर्षामध्ये श्री. सीतारामकृष्णा यांच्या जागी व्यवस्थापन डॉ. हेमंत दरबारी यांची कार्यक्रम समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**पुरस्कार :** सीडॅकच्या अठ्ठावीसावा वर्धापनदिनी दि. २७ जानेवारी २००७ रोजी आयोजित झाला. या सोहळयात "Consistant Best Performance" हा पुरस्कार देऊन YCP'S AIT ला गौरविण्यात आले.

**६. प्रतिष्ठानच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रम :**

**अ) भारतीय भटके विमुक्त संशोधन संस्था, संशोधन प्रकल्प, सातारा :**

भारतीय भटके विमुक्त संशोधन संस्था, सातारा यांनी महाराष्ट्रातील भटक्या जमातींच्याविषयी पथदर्शक प्रकल्प जून १९९९ पासून सुरु केला आहे. पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. त्याविषयीचा अहवाल लवकरच प्राप्त होईल.

**ब) 'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम' :**

'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम' या संस्थेच्या उपक्रमाला प्रतिष्ठान सहकार्य देते. त्यास अनुसरुन 'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम'च्या कार्यालयासाठी केंद्र इमारतीतील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मुंबई शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी, म्हणून बालवाड्या चालविणे, संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक-शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्वपूर्ण कामे 'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम' मार्फत डॉ.माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर केली जातात.

**ड) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन, महाराष्ट्र शाखा :**

या संस्थेच्या वतीने दरवर्षी यशवंतराव चव्हाण स्मृति व्याख्यान आयोजित करण्यात येते. सदर संस्थेने यावर्षी गुरुवार दि.२३ नोव्हेंबर २००६ रोजी ''ग्लोबल इकॉनॉमी अॅण्ड रिइमर्जिंग इंडिया'' या विषयावर डॉ. नरेंद्र जाधव,कुलगुरु,पुणे विद्यापीठ यांचे व्याख्यान आयोजित केले होते. सदर व्याख्यानास मा. ना. श्री. आर. आर. पाटील, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच वरिष्ठ शासकीय अधिकारी व प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रतिष्ठानकडून आर्थिक सहाय्य करण्यात येते.

**७. प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली अनुदाने :**

अहवाल वर्षात खालील संस्थांना अनुदान देण्यात आले.

| क्र. | संस्थेचे नांव | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १ | सेंटर फॉर अॅडव्हान्सड स्ट्रॅटेजिक स्टडिज्. | २०,०००/- |
| २ | कोक्रेआ, पुणे | १०,०००/- |
| ३ | इंडियन असोसिएशन फॉर हॅन्डिकॅप्ड् | २,२००/- |
| ४ | दि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन | १५,०००/- |
| ५ | सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली | ४०,०००/- |
| ६ | नॅशनल स्कूल फॉर ब्लाइन्ड | ३,०००/- |

**८. प्रतिष्ठानला मिळालेले अनुदान :**

| क्र. | संस्थेचे नांव | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १ | ग्रंथालय संचालक,महाराष्ट्र राज्य | ६४,०००/- |

**९. प्रतिष्ठानच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम/उपक्रम :**

**अ) कृषी व सहकार व्यासपीठ :**

कृषी विभाग :

कृषि-सहकार व्यासपीठाचे काम निमंत्रक म्हणून मा. श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे विश्वस्त आणि माजी महापौर श्री.अंकुश काकडे संयोजक म्हणून काम पाहतात. पुणे कार्यालयातून ते काम चालते त्याला पद्मविभूषण मा. श्री. मोहन धारिया यांचे मार्गदर्शन मिळते. या कामकाजात श्री.भिडे आणि पंडीत यांचा सहभाग असतो. अभ्यास मंडळाच्या सभा नियमित पुणे येथे मा. श्री. ज्ञानेश्वरबापू खैरे यांच्या अध्यक्षतेखाली होतात. काही बैठकांचे अध्यक्षस्थान मा. श्री. मोहन धारिया त्यांना वेळ उपलब्ध असल्यास स्वीकारतात.

'अॅग्रोवन' हे कृषि विषयाला वाहिलेले दैनिक पुणे येथून सुरु झाले आहे. मा. श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे यांनी 'अॅग्रोवन'चे संपादकांना कृषि-सहकार व्यासपीठाच्या वतीने सदर दैनिकातील प्रकाशित मजकूरावर प्रासंगिक चर्चा नियमितपणे व्यासपीठात घेतल्या जातात. त्याचे प्रसिद्धीसाठी पत्र लिहिले होते. याबाबत व्यासपीठाचे प्रतिनिधींनी, श्री. निशिकांत भालेराव,संपादक 'अॅग्रोवन' याची भेट घेऊन चर्चा केली. स्वामीनाथन समितीच्या शेतकरी धोरणासंबंधीच्या कार्यशाळात श्री. भालेराव यांचेशी पुन्हा चर्चा करणेत आली. त्यांनी विनंती केल्यानुसार सदर समितीच्या चौथ्या अहवालानंतर दि. १६ ऑगस्ट २००६ रोजी प्रतिष्ठानमध्ये झालेल्या तसेच प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित दि. १८ व १९ ऑगस्ट २००६ रोजी श्री. स्वामीनाथन यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चासत्र व कार्यशाळेस व्यक्त केलेल्या मतांवर आधारित कृषी सहकार व्यासपीठ, वनराई व अफार्म यांचे वतीने श्री. भिडे यांनी तयार केलेला अहवाल मा. श्री. धारियांचे सहीने आयोगास पाठविला. प्रा. पंडीत यांनी सदर अहवाल व स्वत: स्वतंत्रपणे सादर केलेल्या अभिप्रायांच्या प्रती संपादक श्री. भालेराव यांना त्यांचे विनंतीवरुन नेऊन दिल्या. 'अॅग्रोवन'मध्ये प्रतिष्ठान, वनराई व अफार्मचे सहकाराने आयोजित केलेल्या चर्चासत्रास भरपूर प्रसिद्धी दिली.

पाणी सिंचन :

'गोमुख', 'गंगोत्री', 'समन्यायी पाणी परिषद' व 'सोपे कॉर्म' या संस्थातील चर्चांना व्यासपीठोचे प्रतिनिधी उपस्थित राहून विचार व्यक्त करतात. या चारही संस्थांचा सहभाग प्रतिष्ठानच्या कृषि सहकार व्यासपीठाच्या कार्यक्रमात असतो. यापुढील जलसिंचन व्यवस्थेचा विकास नदी खोरे निहाय होणे अपेक्षित असून त्यानुसार भिमा खोरे विकास कार्यक्रमांत प्रतिष्ठानही सहभागी झाले आहे. जलसंधारण योजनेसंबंधी 'गोमुख' संस्थेचे झालेल्या कार्यकारिणी सभेस उपस्थित राहून प्रा. पंडीत यांनी सहभाग घेतला.

'हार्ट ॲग्रोटेक' संस्थेच्या प्रमुखांशी फळ प्रक्रिया या प्रशिक्षणासंबंधी व्यासपीठाचे प्रतिनिधींनी चर्चा केली व कृषी व्यासपीठाशी संलग्न कार्यक्रम घेणेवर विचार करता येईल असे सांगितले. (दि.१२.६.०६)

श्री. माधवराव चितळे यांच्या 'पाणी' विषयावरील व्याख्यानास निमंत्रणावरुन व्यासपीठाचे प्रतिनिधीं उपस्थित राहिले. (दि. १४.६.०६)

पुणे कृषि मंच ॲग्रीकल्चर फोरम यांच्या मासिक बैठकीत दर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात निमंत्रणावरुन व्यासपीठाचे प्रतिनिधीं सहभागी होतात व आपले विचार मांडतात. त्याचप्रमाणे ॲग्रीकल्चर फोरमचे सदस्यही कृषी व सहकार व्यासपीठाचे चर्चामध्ये सहभागी होऊन आपले योगदान देतात.

अफार्म-प्रतिष्ठान संयुक्त कार्यक्रम :

अफार्ममध्ये स्वयंसेवी संस्थांच्या अनौपचारिक समूहाच्या वतीने (प्रतिष्ठानसह) घेतलेल्या महत्त्वाच्या सहा अधिनियमांधारित शासकीय कार्यक्रमांसंबंधीच्या कार्यक्रमात व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला व 'माहितीचा अधिकार कायदा २००५' वर आपले विचार व्याख्यानरुपाने प्रशिक्षणार्थी पुढे मांडले. (दि. ४.५.०६) सदर विषयावरील पुढील कार्यक्रमांसंबंधी पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यात व्यासपीठाचे प्रतिनिधीं सहभागी झाले व त्यांनी भूमिका मांडली. (दि. २.६.०६) त्यानंतर या स्वयंसेवी संस्थांच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. माहिती अधिकार तसेच अन्य सर्व विषयांवर मुद्दे मांडणी केली. सदर संस्था समूहाच्या कार्य समितीच्या बैठकीस व्यासपीठाचे प्रतिनिधीं उपस्थित राहिले व सभेत सहभाग घेऊन कार्यक्रमांचे आयोजनाबाबत चर्चा करुन पुढील कार्यवाही निश्चित केली.

भूजल विभागाचे श्री.बागडे यांच्या 'उपयुक्त जलप्रस्तर पातळी' या विषयावरील व्याख्यानास व्यासपीठाचे प्रतिनिधीं उपस्थित राहिले व त्यांचेशी चर्चा केली. (दि. ८.५.०६)

इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्समधील जागतिक बँक आयोजित शासकीय पाणी योजने विषयीच्या कार्यशाळेस व्यासपीठाचे प्रतिनिधीं सहभागी झाले. (दि. ११.६.०६)

आंतरखोरे नदीजोड कार्यक्रमविषयक चर्चासत्र/कार्यशाळेस व्यासपीठाचे प्रतिनिधीं उपस्थित राहिले व त्यांनी चर्चेस सहभाग घेऊन मत प्रदर्शन केले. (दि. १५.६.०६)

स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त प्रशिक्षण कार्यक्रमात व्यासपीठाचे प्रतिनिधींनी 'माहितीचा अधिकार' यावर अभ्याससत्र घेतले व अन्य सर्व विषयांवर शंका निरसन केले.

'आदिवासी भागातील कृषी' या विषयावरील श्रीमती साळुंखे यांच्या व्याख्यानास व्यासपीठाचे प्रतिनिधीं उपस्थित राहिले. त्यासंबंधी इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्सच्या वार्तापत्रात उल्लेख करणेत आला आहे. (दि. ११.७.०६)

'जागतिकीकरण' विषयावरील व्याख्यानास व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले. (दि. २२.७.०६)

दि. २५.७.०६ रोजी जागतिक बँकेच्या 'महाराष्ट्र जलसुधार प्रकल्प कार्यक्रम' विषयावरील राज्याचे चीफ इंजिनिअर यांच्या व्याख्यानास व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले व आभार प्रदर्शन केले.

पक्षीताप (बर्ड फ्लू) याने महाराष्ट्रात थैमान मांडले होते. पुणे दूरदर्शनच्या वतीने (कृषीदर्शन विभाग) कुक्कूट पालकांच्या मार्गदर्शनासाठी करावयाच्या कार्यक्रमांत सहभाग घेणेविषयी प्रा.पंडीत यांना निमंत्रित केले होते. त्यानुसार त्यांनी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. दूरदर्शनवर सदर कार्यक्रम काही वेळा दाखविण्यात आला. काही प्रेक्षक श्रोत्यांनी सदर कार्यक्रम विशेषत: तज्ञांकडून शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती मिळवण्याचे दृष्टीने तज्ञांना बोलते करण्याचे सूत्रसंचालन समाधानकारक झाल्याचे समक्ष व दूरध्वनीद्वारा सांगितले.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या याविषयावर अभ्यास करणाऱ्या प्रबोधन मंचाच्या कृती गटाबरोबर सहकार्य साधून एक चर्चासत्र भरविण्यात आले होते. तसेच या विषयावर 'प्रयास' संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीमती सीमा काकडे यांचे व्याख्यान कृषी सहकार व्यासपीठातर्फे आयोजित करण्यात आले.

पुणे कृषी मंच (ॲग्रीकल्चर फोरम) यांच्या सहकार्याने विशेष आर्थिक क्षेत्राबाबत चर्चा करुन व्यासपीठाने एक निवेदन तयार केले. याच विषयावर 'एम. आय. टी, पुणे' या संस्थेने आयोजित केलेल्या परिसंवादात व्यासपीठाचे प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादन संघ यांच्या ऑफिसमध्ये जाऊन दूध उत्पादन आणि विक्री याबाबत व्यासपीठाचे प्रतिनिधींनी प्रश्न समजावून घेतले व त्यावर आधारित शोधनिबंधाचे सादरीकरण शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर येथील चर्चासत्रांत प्रा.पंडीत यांनी सादर केले.

२७.२.२००७ चिकोत्रा,कोल्हापूर खोऱ्यातील समन्यायी पाणी परिषदेच्या पाणी संस्था कार्यशाळेस प्रा.पंडीत यांनी मार्गदर्शन केले.

१८.३.२००७ 'ॲग्रोवन' दैनिकाने आयोजित केलेल्या मराठा चेंबरमधील कृषी विज्ञान केंद्राच्या चर्चासत्रात व्यासपीठाचे प्रतिनिधींनी सहभाग घेऊन मुद्दे मांडले व संपादक श्री.भालेराव यांचेशी चर्चा केली.

अंदाजपत्रकातील तरतुदींनुसार शासकीय सहाय्य (केंद्र व राज्य) थेट शेतकऱ्यांना कसे मिळवून देता येईल यासंबंधी विशेष कृषी परिषद मराठा चेंबरचे श्री.उदय बोरावके,अध्यक्ष,कृषी विभाग यांचे सहकार्याने घेण्यांत आली. त्याचे संयोजन श्री.भिडे यांनी केले. परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ.मुकुंदराव घारे होते. मा.श्री.मोहन धारिया यांनी परिषदेत मार्गदर्शन केले. परिषदेचे उद्‌घाटन मा.श्री.बापूसाहेब खैरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.जयराम देसाई व प्रा.पंडीत यांनी संयुक्तरित्या केले. प्रा.पंडीत यांनी आभार प्रदर्शन केले. सदर कार्यक्रमास 'ॲग्रोवन'तर्फे भरपूर प्रसिद्धी देणेत आली. मा.श्री.बापूसाहेब खैरे यांचे उद्‌घाटनाचे भाषणही 'ॲग्रोवन'तर्फे प्रसिद्ध करणेत आले.

**सहकार :**

व्यासपीठाचे अभ्यासमंडळ :

व्यासपीठातर्फे तज्ञांचे अभ्यासमंडळ दरमहा व मधून मधून आवश्यकतेनुसार भरविण्यात येते. अहवाल काळात त्यात अनेक प्रश्नांचा ऊहापोह करण्यात आला. या मंडळाचे कामकाज मा. श्री. बापूसाहेब खैरे यांच्या अध्यक्षतेखाली चालते. त्यात यावर्षात श्री.भिडे व श्री.पंडीत यांचेबरोबर डॉ. नीलकंठ रथ, डॉ.प्रभाकर दुभाषी, श्री. कोरान्ने, डॉ. कामत, प्रा. नाडकर्णी, डॉ. घाणेकर, कै. जोगळेकर, प्रो. आर. के. पाटील, श्री. कापरे, श्री. कोकरे, डॉ. कावेरी (एन. आय. बी. एम.) डॉ. मुकुंदराव गायकवाड, डॉ. गलांडे तसेच अन्य तज्ञांनी वेळोवेळी सहभाग घेऊन आपले विचार व्यक्त केले आहेत. तसेच सदर चर्चासत्रात व्यक्त झालेली संकलित मते पत्राद्वारा केंद्र शासनास मा.धारिया यांचे स्वाक्षरीचे व राज्य शासनास मा. श्री. बापूसाहेब खैरे यांचे सहीने सादर करणेत येतात. तसेच श्री. भिडे व प्रा. पंडीत सदर पत्राच्या प्रती मा. सहकार व शेती आयुक्तांना समक्ष सादर करुन पाठपुरावा करतात. सदर कार्य या कालावधीत प्रसंगानुसार चालू राहिले व नवनियुक्त सहकार आयुक्त मा. श्री. अनिल डिग्गीकर व त्या आधीचे मा. श्री. शर्मा यांनी या कालावधीत वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन केले.

शेती कर्ज पुरवठा :

सहकारी बँकांसंबंधी जो वैद्यनाथन समिती अहवाल शासनाने स्वीकारला आहे. त्यावर व्यासपीठाचे वतीने दोन बैठकीत चर्चा करणेत आली आहे. सदर चर्चेत डॉ. प्रभाकर दुभाषी, डॉ. नीलकंठ रथ, श्री. कोरान्ने, डॉ. कामत, प्रा.नाडकर्णी, श्री.पुजारी तसेच श्री. भिडे व प्रा.पंडीत यांनी सहभाग घेतला. त्यांत सहकारी पतपुरवठ्याचा दीर्घ मुदतीसह एकत्र विचार करावा व समितीने नमूद केल्याप्रमाणे वर्षा तसेच अन्य नैसर्गिक आपत्तीचे धोके यापासून शेतकऱ्यांचे संरक्षण केलेच पाहिजे. त्यासाठी राज्यातील सर्व पिकांचेसाठी सर्वंकष विमा योजना चालू ठेवावी. तसेच प्रा. रथ यांच्या टिपणीतील मुद्देही लक्षांत घ्यावेत असे ठरविण्यात आले. त्यानुसार मा.श्री.मोहन धारिया यांच्या स्वाक्षरीने मा. श्री. शरद पवार, कृषीमंत्री केंद्र शासन यांना अहवाल सादर केला.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा यातील बदलाचे प्रस्तावावर या कालावधीत महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे अपील क्र.१५५१/२००० चे निकालामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनास सुचविले. त्यानुसार जरुर तो प्रस्ताव मा. सहकार आयुक्तांनी शासनास सादर केला. त्या दुरुस्तीबाबतचा पाठपुरवठा चालू आहे. याबाबत मा. श्री. धारिया यांचे सहीने मा. ना. श्री. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना दि. १०.७.२००६ रोजी खुलाशाचे सविस्तर पत्र पाठवून पाठपुरावा करण्यात आला आहे. यासंबंधाने विधानसभेत सहकारी संस्था कायदा दुरुस्ती करत असल्याचे आश्वासनही मा. ना. श्री. पतंगराव कदम यांनी दिले

आहे. मात्र अद्यापही त्याबाबतची कार्यपूर्ती झाली नाही.

सहकार आयोग :

मा. श्री. धारियासाहेब यांनी मा. ना. श्री. शरद पवार,कृषी व सहकारमंत्री, भारत सरकार यांना सहकारी शताब्दी संबंधात एक सहकार आयोग नेमून या सहकारी चळवळीच्या १०० वर्षाचा आढावा घेऊन पुढील कामकाजाची दिशा ठरवावी असे सुचविले होते. त्याबाबत राज्य शासनाकडेही पाठपुरावा करण्यात आला आहे. यासंबंधी मा. आंनदराव पाटील, कार्याध्यक्ष, भारती विद्यापीठ यांचेसह व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी मा. सहकारमंत्री,महाराष्ट्र शासन यांचेशी व श्री. ओऊळकर, सहनिबंधक व वैयक्तिक सहाय्यक, मंत्रीमहोदय, सहकार यांचेशी चर्चा केली असता त्यांनी सहकार महाशताब्दी कार्यक्रम हाती घेण्यात येईल असे सांगितले. त्याप्रमाणे तो घेण्यात आला आहे. त्यांच्या सांगली येथील कार्यक्रमात प्रा.पंडीत यांनी 'नागरी बँका व पत्संस्था आणि सहकारी अधिनियम' या विषयावर व्याख्यान दिले. सहकारी चळवळीचा १०० वर्षाचा आढावा घेऊन पुढील वाटचालीचे दृष्टीने केंद्र शासनाने सहकारविषयक जी उच्चाधिकारी समिती नियुक्त केली आहे, तिचे अध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव पाटील यांचेशी मा.श्री.बापूसाहेब खैरे यांनी सातत्याने संपर्क ठेवला आहे. त्याचे सूचनेनुसार व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी श्री.पाटील यांची पुणे येथे भेट घेऊन दोन वेळा चर्चा केली. तसेच स्वत: मा.श्री.शिवाजीराव पाटील यांनी व्यासपीठाच्या अभ्यास मंडळात येऊन सभासदांबरोबर सखोल चर्चा केली आणि त्यांच्या अहवालांसाठी व्यासपीठाच्या सूचनांची नोंद घेतली.

पाणी वापर संस्था :

सदर संस्थांचे उपविधी व त्यांचे लेखा परीक्षण यासंबंधी व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी उपनिबंधक व विशेष लेखा परीक्षक यांचेशी चर्चा केली व माहिती मिळविली.

महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या वतीने झालेल्या राज्य पातळीवरील ३ हजार प्रतिनिधींच्या अधिवेशात व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले व प्रतिनिधींशी चर्चा केली. (२५.४.२००६)

घटना दुरुस्ती :

प्रा. आर. व्ही. नाडकर्णी यांनी केंद्र शासनाने सहकारी संस्थाविषयक घटना दुरुस्तीच्या प्रस्तावाची प्रत प्रतिष्ठानला उपलब्ध करुन दिल्यानंतर सदर प्रस्तावांवर प्रतिष्ठानचे सहकार व्यासपीठामध्ये सविस्तर चर्चा करणेत आली आहे. यावर प्रतिष्ठानने घटनेमध्ये दुरुस्ती करताना त्या दुरुस्तीमध्ये सहकारी तत्वांचा समावेश करावा जेणेकरुन सहकारी चळवळीची योग्य दिशेने वाटचाल होऊ शकेल असे सुचविले. हयाची नोंद घेतल्याचे त्यासंबंधी समितीतील झालेल्या चर्चेवरुन दिसून येते.

महिला पतसंस्थांसाठी दोन अभ्यासवर्ग वरील कालावधीत 'सहकार भारती' च्या वतीने घेण्यात आले. त्यात व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले व त्यांनी त्यात मार्गदर्शन केले.

सहकार विभाग निवृत्त अधिकाऱ्यांचे अकराव्या वार्षिक संमेलनास उपस्थित राहून व्यासपीठाचे प्रतिनिधीनी आपले विचार मांडले. कृषी व सहकार व्यासपीठाचे कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन सभासदांना केले.

सहकारवर्धिनी संस्थेच्या प्रशिक्षणविषयक कार्यक्रमास व सूत्रसंचालन समिती बैठकीत व्यासपीठाचे प्रतिनिधीनी सहभाग घेऊन मतप्रदर्शन केले.

राज्य सहकारीसंघाशी संपर्क व समन्वय साधण्याचा सातत्याने प्रयत्न चालू असतो. सदर कालावधीत हे कार्य चालू ठेवण्यात आले. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने प्रतिष्ठानचे मा. श्री. बापूसाहेब खैरे यांना त्यांचे कार्यक्रमांना या काळात आमंत्रित केले होते. त्याप्रमाणे संघाचे अध्यक्ष श्री. शिंदे व अन्य पदाधिकारी यांचेशी संयुक्त कार्यक्रमाबाबत सातत्याने चर्चा केली व संघाने आपले सभासद प्रशिक्षणवर्ग व अन्य शिक्षण, प्रशिक्षण कार्यक्रमात 'माहिती अधिकार अधिनियम २००५' याचा समावेश करणेबाबत जे आग्रहाने प्रतिपादन केले होते, त्यास संघाकडून प्रतिसाद मिळाला आहे. दि. ३.५.२००६ रोजी राज्य संघात कै. धनंजयराव गाडगीळ स्मृति कार्यक्रमास व्यासपीठाचे प्रतिनिधीनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानचे पुढाकाराने 'यशदा'चे श्री.किरण कुलकर्णी यांचीही व्याख्याने सहकारी संघातील व्याख्याते व अधिकारी यांचेसाठी ठेवण्यात आली.

सहकार खात्याची कामकाज सुधारणा :

फोर्ड फाउंडेशनचे सहकार्याने 'यशदा'ने महराष्ट्रातील अनेक शासकीय खात्यांचे कामकाजाचे पुनर्विलोकन करुन त्यामध्ये खात्याची

कोअर कामे, त्याचप्रमाणे जी कामे अन्य संस्थांकडे वर्ग करता येतील व जी कामे कमी करता येतील. अशा प्रकारे आढावा घेऊन सहकार खात्यात काय सुधारणा करता येईल, याबाबतचा अहवाल तयार केला. त्याबाबत चर्चेसाठी सहकार खात्याचे अधिकारी व इतरांना आमंत्रित केले होते. त्या चर्चेमध्ये व्यासपीठाचे प्रतिनिधींनी सहभाग घेतला. त्यांनी ज्या सूचना केल्या त्या मान्य करणेत आल्या.

केंद्र शासनाने नेमलेल्या उच्चाधिकार समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीसंबंधी (२६ मुद्दे) प्रतिष्ठानच्या व्यासपीठाने तज्ञांच्या दोन बैठका घेऊन त्यांचे मुद्दे संकलित करुन त्यावर मा.श्री.मोहन धारिया यांचेशी चर्चा केली. श्री. भिडे यांनी त्याबाबत अहवाल तयार केला. सदर अहवाल मा. श्री. बापूसाहेब खैरे यांचे स्वाक्षरीने मा. श्री. शिवाजीराव पाटील,अध्यक्ष, उच्चाधिकार समिती यांना सादर केला आहे.

'कोथरुड ग्राहक सेवा संस्थेच्या' सभेत उपस्थित राहून प्रा. पंडीत यांनी सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर मार्गदर्शन केले. (दि. १८.६.२००६)

'सहकार भारती' संस्थेच्या 'आपला सहकार' या नियतकालिकाच्या प्रकाशन कार्यक्रमात व्यासपीठाच्या प्रतिनिधीनी मार्गदर्शन केले. (दि. १५.७.२००६) पुढील अंकात त्यासंबंधी उल्लेख करणेत आला आहे.

याच संस्थेच्या वतीने कै.माधवराव गोडबोले स्मृति सहकार पुरस्कार कार्यक्रमास उपस्थित राहिले. (दि. २१.७.२००६)

जनता सहकारी बँकेच्या ओम्नी सेतु उपक्रमाचे मा.ना.श्री.शरद पवार यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. या कार्यक्रमास व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच संस्थेच्या कामकाज आढावा बैठकीस निमंत्रणावरुन व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले व मार्गदर्शन केले.

नॅशनल हाऊसिंग बँकेने ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्याकडील घर मालमत्तेमधून नियमित आर्थिक मदत मिळावी म्हणून एक विशेष योजना तयार केली आहे. त्या बँकेचे चेअरमन श्री. श्रीधर यांच्याशी संपर्क साधून कृषीतज्ञ श्री. बुधाजीराव मुळीक यांच्या मदतीने एक चर्चासत्र प्रतिष्ठानने आयोजित केले होते. चर्चासत्राला ६०-७० वयोवृद्ध व्यक्ती हजर होत्या. त्यासंबंधी अनेकांनी प्रतिष्ठानशी त्यानंतर संपर्क साधला असता व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी त्यांना उपलब्ध माहिती दिली. आता दि. २८.२.२००७ च्या अर्थसंकल्पात मा.अर्थमंत्र्यांनी याबाबतच्या योजनेचा समावेश केला आहे.

९.२.२००७ रोजी राज्य व जिल्हा सहकारी बँकांच्या पुनरुज्जीवनासंबंधी चर्चा घेण्यात आली.

'माहितीचा अधिकार (कायदा २००५)' विषयक काम :

१. भारत शासनाने 'माहितीचा अधिकार कायदा २००५' केला आहे. त्याचा जनमानसात मोठ्या प्रमाणावर प्रसार व प्रशिक्षण व्हावे म्हणून मा.श्री.बापूसाहेब खैरे यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच विशाल सह्याद्रीचे कै.सिन्नरकर यांनी यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनीचे वतीने होणाऱ्या 'माहितीचा अधिकार कायदा २००५' यावरील कार्यशाळेत प्रशिक्षणात सहभाग घेतला.

माहितीचा अधिकार पुस्तिका :

या विषयावर श्री. भिडे यांनी २० पानी सविस्तर टिपण तयार केले. विशाल सह्याद्रीच्या वतीने प्रकाशित पुस्तिकाचे वितरण व संबंधितांना मार्गदर्शन सातत्याने चालू आहे.

सदर पुस्तिकेस मा. अण्णा हजारे यांची प्रस्तावना असावी अशी मा.श्री.बापूसाहेब खैरे यांची इच्छा असल्याने प्रा.पंडीत यांनी ती समक्ष मिळविली. त्यावेळी विशाल सह्याद्रीचे प्राचार्य कै.सिन्नरकर उपस्थित होते.

सदर बाबतीत प्रतिष्ठानचे विश्वस्त व निमंत्रक आणि पुणे विभागाचे अध्यक्ष मा.श्री.बापूसाहेब खैरे यांचे पुढाकाराने 'यशदा' संस्थेशी सामंजस्य करार करणेत आला असून त्यांचे वतीने तसेच प्रतिष्ठान व विशाल सह्याद्रीच्या संयुक्त विद्यमाने सदर कालावधीत ज्या कार्यशाळा घेणेत आल्या त्या व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी तसेच विशाल सह्याद्रीचे वतीने प्राचार्य सिन्नरकर यांनी सहभाग घेतला.

सुरुवातीपासून यात हिरीरीने भाग घेणारे श्री.जयंतराव (ग. दि.) जोगळेकर यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांचे श्रद्धांजली सभेत व्यासपीठाच्या प्रतिनिधीनी आदरांजली वाहिली.

'यशदा'त या विषयावर वेळोवेळी (दि. ४.४.०६, १८.४.०६, ३०.४.०६, १.६.०६, २१.४.०६, ४.७.०६ ) चर्चा व कार्यक्रम झाले. त्यात प्रतिष्ठानचे प्रतिनिधी सहभागी झाले. 'माहितीचा अधिकार कायदा २००५' चे बाबतीत 'यशदा' चा कोअर ग्रुप व वर्षपूर्ति आढावा सभेत श्री.भिडे यांनी आपले विचार मांडले.

'पुणे मराठी ग्रंथालय' संस्थेच्या वतीने 'माहिती अधिकार' यावर परिसंवाद घेणेत आला. मा.श्री.बापूसाहेब खैरे यांच्या सौजन्याने विशाल सह्याद्रीने प्रकाशित केलेल्या पुस्तिकेच्या २०० प्रती प्रा. पंडीत यांनी उपस्थितांना वितरीत करण्याची व्यवस्था केली त्याबद्दल संयोजकांनी प्रतिष्ठानचे आभार मानून प्रतिनिधिक सत्कार केला.

वैकुंठ मेहता राष्ट्रीय प्रबंध संस्थान-संचालक पद भरणेबाबत ('माहिती अधिकार') माहिती मागवावी. या विषयावर प्रतिष्ठानचे विश्वस्त व पुणे केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. बापूसाहेब खैरे सक्रिय असून त्यांच्या प्रेरणेने या कक्षातून काही विषयावर अर्ज करणेत आले आहेत.

मा. ना. श्री. शरद पवार यांनी केंद्र शासनामध्ये कृषी खात्याचा कार्यभार सांभाळल्यानंतर वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान,पुणे येथे भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी सदर संस्थेचे संचालक पद महिनोमहिने भरले नसल्याचे समजल्यावरुन सदर पद तातडीने भरले जाईल असे आश्वासन दिले होते. त्यानंतर वर्ष होऊन गेले तरी सदर पद भरले नसल्यामुळे माहितीच्या अधिकाराखाली मा. श्री. बापूसाहेब खैरे यांनी त्याबाबत कृषी व सहकार व्यासपीठामध्ये चर्चाही योजिली. सदर बाबतीत अर्ज केला. नंतर आलेल्या उत्तरानुसार केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. त्यामुळे याविषयास चालना मिळाली आहे. अंतिम कार्यवाही अद्याप अपेक्षित आहे. याबाबतीत श्री. अंकुशराव काकडे मा. ना. श्री. शरदराव पवार, कृषीमंत्री, केंद्र शासन यांचेकडे पाठपुरावा करीत आहेत.

कृषी व्यासपीठाच्या वतीने 'माहिती अधिकार' या विषयावर या कालावधीत दोन सभांचे आयोजन करण्यात आले. (दि.१२.४.०६ व २४.६.०६) महिला आर्थिक विकास महामंडळाच्या स्वयंसहाय्यता गटाचे पन्नास महिला कार्यकर्त्यांचे या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. त्यात व्यासपीठाच्या प्रतिनिधींचा सहभाग. 'माहिती अधिकार' या विषयावर केंद्रीय श्रमिक प्रशिक्षण केंद्रात प्रा.पंडीत यांनी प्रशिक्षणवर्गात व्याख्यान दिले. (दि. २२.६.०६)

प्रतिष्ठानच्या महिला व्यासपीठाच्या वतीने महिला रोजगाराबाबत व माहिती अधिकारासंबंधी महिलांना माहिती देण्याचा कार्यक्रम आयोजित केला. वरील तीनही कार्यक्रमास व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी व्याख्याने दिली.

'उमंग' संस्थेच्या वतीने झालेल्या महिलांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात व्यासपीठाचे प्रतिनिधींनी 'माहिती अधिकार' याविषयावर मार्गदर्शन केले. १५० महिला उपस्थित होत्या.

पद्मश्री विखे पाटील सहकार प्रबंध संस्थेने राज्यातील साखर कारखाने आणि दुग्ध संस्थांतील कार्यकर्ते यांचेसाठी 'माहिती अधिकार' या विषयावर एक कार्यशाळा घेतली. त्यात व्यासपीठाच्या प्रतिनिधींचा सहभाग.

पुणे जिल्ह्यातील प्राथमिक कृषी संस्थेच्या तालुका सचिवांची एक बैठक दि.२७ एप्रिल २००६ रोजी मा.श्री.बापूसाहेब खैरे यांच्या सूचनेनुसार घेण्यात आली. त्यात 'माहिती अधिकार' तसेच सचिवांचे कामकाज आणि वैद्यनाथन समितीच्या संदर्भात 'सचिवांचे भवितव्य' या विषयावर सविस्तर ऊहापोह केला. संघटनेचे प्रमुख श्री.लोणकर यांनी यासंदर्भात ३-४ वेळा श्री. भिडे व प्रा. पंडीत यांचेशी चर्चा केली. तसेच मा.श्री.बापूसाहेब खैरे यांचे मार्गदर्शन घेतले.

दिनांक ४ जुलै २००६ रोजी व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी 'महिला आर्थिक विकास महामंडळ' यांचे पुणे कार्यालयात निमंत्रणावरुन जाऊन पौड येथील कार्यक्रमासंबंधी जिल्हाअधिकारी यांचेशी अधिनियमांतील कलमांची चर्चा केली.

दिनांक ५ जुलै २००६ रोजी व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी 'यशदा'मध्ये तेथील अधिकाऱ्यांच्या संदेशानुसार जाऊन श्री.किरण कुलकर्णी अपर संचालक, माहिती अधिकार विभाग आणि सहाय्यक अधिकारी श्रीमती हाडकर यांचेशी 'माहिती अधिकार आणि सहकार' या विषयावर श्री.भिडे यांनी 'यशदा'चे माहिती अधिकार विभाग प्रमुख श्री. प्रमोद माने यांच्या पत्राप्रमाणे तयार केलेल्या पुस्तिकेच्या हस्तलिखित प्रारुपासंबंधी सविस्तर चर्चा केली. त्यानुसार प्रारुपात परिपूर्ती करावयाचे ठरले. त्यानुसार श्री. भिडे यांनी महाराष्ट्र शासनाचे माहिती आयुक्त डॉ. सुरेश जोशी यांनी दिलेल्या निकालांची प्रत 'यशदा'मधील अधिकारी श्री. यादव आदिंच्या साहाय्याने तयार करवून घेतली. श्री. भिडे यांनी त्यातील निवडक निर्णयांचा 'माहितीचा अधिकार व सहकार' या पुस्तिकेमध्ये समावेश केला. त्यामुळे सदर नियोजित पुस्तिकेचे मूल्यवर्धन झाले असा अभिप्राय मा. बापूसाहेब खैरे यांनी संपूर्ण मजकूर वाचून घेऊन व्यक्त केला.

त्याचप्रमाणे पंजाबमधील सहकारी संस्थांचे अधिकारी व सहकार खात्याचे अधिकारी यांचेसाठी एक कार्यक्रम चंदिगड येथे आयोजित करण्यांत आला होता. त्या प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी प्रतिष्ठानतर्फे श्री. भिडे यांनी तयार केलेल्या पुस्तिकेचा बहुमोल उपयोग 'यशदा'स झाल्याचे श्री. प्रमोद माने, अतिरिक्त महासंचालक 'यशदा' यांनी दि. ११ व १२ एप्रिल ०७ चे ट्रेनर ट्रेनिंगमीटचे वेळी सांगितले.

२२ ऑगस्ट ०६ रोजी 'यशदा'चे माहिती अधिकार विभाग प्रमुख व डेप्युटी डायरेक्टर जनरल यांनी विनंति केल्याप्रमाणे पंजाबमधील

माहिती अधिकाराबाबत तेथील सहकारी शिखर संस्थांच्या संघ संस्थेने त्यांच्या सुमारे २५० कार्यकर्ते अधिकाऱ्यांच्या प्रबोधनासाठी जो प्रशिक्षण कार्यक्रम हाती घ्यावयाचा आहे त्यात वितरण करण्यासाठी जी घडीपत्रिका (फोल्डर) तयार करावयाचा आहे, त्यासाठी सुमारे दहा पृष्ठांचे टिपण देण्याची विनंती केली. त्यानुसार सदर टिपण श्री.भिडे यांनी तयार करुन 'यशदा'स दिले.

कृषी व्यासपीठाचे सर्वश्री भिडे व कै. सिन्नरकर यांची निवड यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी 'यशदा'तर्फे महाराष्ट्र राज्य वीज वितरण महामंडळाचे अधिकाऱ्यांना माहितीचा अधिकार कायदा २००५ या विषयावर प्रशिक्षण देणेसाठी करण्यांत आली होती. त्याप्रमाणे सांगली, धुळे, औरंगाबाद, नांदेड या ठिकाणचे प्रशिक्षण कार्यक्रमांत १००० पेक्षा जास्त अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणामध्ये प्रतिष्ठानने सहकार्य केले.

'सहकारी प्रबंध संस्था', पुणे येथे 'माहिती अधिकार' यावर प्रशिक्षणवर्गात कै.सिन्नरकर यांनी व्याख्याने दिली. (दि.१८ते२१ सप्टेंबर ०६)

भारती विद्यापीठाचे समाजशास्त्र केंद्रात दि. १५.९.२००६ रोजी व्यासपीठाच्या प्रतिनिधीचे 'माहिती अधिकार' या चर्चासत्रांत व्याख्याने दिली.

श्री. भिडे यांनी १८.९.२००६ रोजी डॉ. सुरेश जोशी, मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी आयोजित केलेल्या बैठकीत निमंत्रणावरुन 'यशदा'मध्ये झालेल्या कार्यक्रात सहभाग घेतला.

बालविज्ञान चळवळ : पुणे विद्यापीठाचे माजी उप कुलगुरु कै. डॉ. वि. ग. भिडे यांनी स्थापन करुन उत्तमरित्या चालविलेल्या या चळवळीच्या स्टिअरींग कमिटीवर विभागीय केंद्र,पुणेच्या वतीने प्रा. प्रभाकर पंडीत काम करतात. सदर समितीच्या या कालावधीत झालेल्या पांच बैठकीत (दि. ८.४.०६, ७.५.०६, १०.६.०६, २४.६.०६, ८.७.०६) त्यांनी सक्रिय सहभाग घेतला व कार्यक्रमविषयक मुद्दे मांडले. सदर बालविज्ञान चळवळीला जोडून आता ही चळवळ महाविद्यालयातील युवकांसाठी विस्तारित करण्यात येणार आहे. २००५-०६ या वर्षात प्रा. पंडीत यांची सेक्रेटरी जनरल (आऊट स्टेशन), बालविज्ञान चळवळ अशी नियुक्ति करणेत आली आहे.

विशाल सहयाद्री आवारात कै. यशवंतराव चव्हाण पुतळ्याचे अनावरणाचा कार्यक्रम झाला. (दि.१९.५. ०६) उद्घाटक श्री.भिलारे गुरुजी, अध्यक्ष मा. श्री. बापूसाहेब खैरे, सूत्रसंचालक प्रा.पंडीत. प्रमुख वक्ते मा. खा. अनंतराव पाटील, वक्ते मा. श्री. अंकुश काकडे तसेच श्री. भिडे व अन्य मंडळी उपस्थित होती.

कै. नरुभाऊ लिमये स्मृति आर्यभूषण पुरस्कार कार्यक्रमास व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले. कार्यक्रमाचे संयोजन मा.श्री.अंकुश काकडे यांनी केले. मा. श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी आभार मानले. (दि. २.६.०६)

प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या अपंग हक्क परिषदेस व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले. (दि.१.व २ जुलै ०६)

पुणे येथील भारत विकास परिषद संस्थेच्या वतीने अपंगांसाठीच्या कार्यशाळा भूमिपूजन समारंभास व्यासपीठाचे प्रतिनिधी उपस्थित राहिले व नियोजित कार्यासंबंधी माहिती घेतली व (दि. ६.७.०६) मुंबई परिषदेची माहिती दिली.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या विद्यमाने 'पत्रकारिता' या विषयावर पूर्ण दिवस मुक्तचिंतन कार्यक्रमात व्यासपीठाचे प्रतिनिधीनी सहभाग घेतला. प्रतिष्ठानचे कामकाज व 'माहिती अधिकार' यावर मुद्दे मांडले तसेच मा.श्री.बापूसाहेब खैरे यांचे सौजन्याने उपस्थितांना विशाल सहयाद्रीच्या 'माहिती अधिकार' पुस्तिकेच्या प्रती वितरीत केल्या. त्याबद्दल संयोजकांनी प्रतिष्ठान व मा.श्री.बापूसाहेब खैरे यांचे आभार मानले. (दि. २.४.०६)

१२.३.२००७ केंद्रीय प्रसिद्धी विभागाचे संचालक,श्री.प्रशांत पाठराबे यांची त्यांचे कार्यालयात भेट घेऊन व्यासपीठाचे प्रतिनिधीनी त्यांना प्रतिष्ठानच्या कामकाजाची व कार्यक्रमांची माहिती दिली. त्यांचेकडून भारताचे मा. अर्थमंत्री श्री. चिदंबरम् यांचे अर्थसंकल्पावरील भाषण व अन्य कागदपत्रे मिळवली.

१३.३.२००७ : 'भारतातील सामाजिक असंतोष आणि भावी आव्हाने' या विषयावर प्रतिष्ठानने (मुंबई) प्रायोजित केलेल्या 'परिसंवाद २००७' यास जनरल सेक्रेटरी मा. श्री. काळेसाहेब यांचे सूचनेनुसार प्रा. पंडीत उपस्थित राहिले व उपस्थित मान्यवरांना प्रतिष्ठानचे कामकाजाची माहिती दिली. याचवेळी यशदाचे अप्पर संचालक, श्री. किरण कुलकर्णी यांचेशीही चर्चा केली.

**ब) महाराष्ट्र महिला व्यासपीठ :**

महाराष्ट्र महिला व्यासपीठाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) महिला प्रबोधन-विविध कार्यक्रमांच्याद्वारा
२) महिलांचे कायदेविषयक शिबीर
३) महिला विकासाचे विविध कार्यक्रम
४) महिलांचे बचतगट स्थापन करणे.

महाराष्ट्र महिला व्यासपीठाचे विविध त-हेने कार्यक्रम करण्यावर नेहमीच भर दिला आहे.

नियमित होणारे कार्यक्रम :

बचतगट :

विविध विभागात जाऊन महिलांना एकत्र करणे. त्यांचा विश्वास संपादन करणे. त्यांच्यामध्ये भगिनीभाव निर्माण करणे. या कामांमध्ये खूपच वेळ द्यावा लागतो. खूपदा शासनातर्फे वस्त्या उठवल्या जातात. लोक बेघर होतात. झालेले गट विस्कळीत होतात. अशा परिस्थितीत गट टिकवणे. अधिकच अवघड होते. बचतगटाची संख्या आता १७ पासून २५ पर्यंत झाली आहे.

- रोजंदारीवर जगणाऱ्या स्त्रियांची बचत अत्यल्प असते. महिला व्यासपीठाने आता प्रत्येक गटातील सदस्यांचे रजिस्टर कार्यालयात ठेवण्यास सुरुवात केली, कुलाबा, मुलुंड, गोवंडी, भांडुप व घाटकोपर इत्यादि भागात हे गट आहेत.
- महिला आर्थिक विकास महामंडळ या शासकीय संस्थेच्या सहकार्याने १८ व १९ मे रोजी ३० कार्यकर्त्यांसाठी एक प्रशिक्षणवर्ग महाराष्ट्र महिला व्यासपीठाने आयोजित केला होता. बचतगटविषयी सर्व तांत्रिक गोष्टींची माहिती तेथे देण्यात आली. या प्रशिक्षणवर्गाचे वैशिष्ट्य म्हणजे जेवणाचा खर्च प्रत्येकाने स्वत:च केला होता. बचतगट चालवण्याच्या दृष्टीने हे शिबीर अतिशय उपयुक्त ठरले.
- आरोग्य शिबीर : ही शिबिरे मुख्यत: मधुमेह, डोळ्यांचे विकार, गर्भाशयाचे विकार, सांधेदुखी या आजाराविषयी असतात. स्त्रिया स्वत:च्या आजारांविषयी उदासीन असतात. दरवेळी शासकीय रुग्णालयात लागणारा वेळ व बेफिकीरी यामुळे तेथे जाणे टाळले जाते व खाजगी डॉक्टर परवडत नाहीत. स्त्रियांची नोंदणी त्यांच्या आजाराविषयी त्यांच्याशी चर्चा, त्यांनी घरगुती उपायांची माहिती देणे व स्थानिक डॉक्टरांच्या सहकार्याने शिबिरात नियोजन करणे ही सर्व कामे महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्या उत्साहाने करतात. प्रत्यक्ष शिबिरांच्या दिवशी सर्व डॉक्टर्स विना मोबदला वेळ देतात. तात्कालिक औषधे, चष्मे यासाठी स्थानिक दुकानाची मदत मिळते. दीर्घकालीन उपचारांची गरज असल्यास कोठे जावे लागेल याचीही माहिती दिली जाते. यावर्षी ८ वेगवेगळी शिबिरे झाली. ४५० अंदाजे महिलांना मदत मिळाली.

**विविध कार्यक्रम** :

- महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने 'संवाद-संध्या' कार्यक्रमांतर्गत ज्ञानपीठ विजेते ज्येष्ठ कवि श्री. विंदा करंदीकर यांच्या कवितांचे सादरीकरण श्रीमती उषा मेहता, श्रीमती नीरजा व श्रीमती प्रज्ञा लोखंडे या नामवंत कवयित्रींनी केले. कवीच्या प्रतिभेची उंची व सखोलता जाणवून देणारा हा एक उत्तम कार्यक्रम होता. पूर्व प्रसिद्धी अभावी श्रोत्यांची संख्या मात्र मर्यादित होती. 'संवाद-संध्या' कार्यक्रम पुढे चालू ठेवण्यात येणार आहे.
- सप्टेंबर महिन्यात हैद्राबाद येथील एन. आय. आर. डी. (N.I,R,D,) संस्थेत General Education या विषयावर श्रीमती विजया चौहान यांनी आपले विचार मांडले.
- 'लोकसंस्थेतील स्त्रियांचे घटते प्रमाण' हा एक अत्यंत काळजीचा विषय त्या अनुषंगाने स्त्रियांचे कायदेशीर हक्क विवाह नोंदणीचे महत्त्व इत्यादि विषयही स्त्रियांसमोर मांडणे महत्त्वाचे ठरते.
- महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्या श्रीमती वासंती शेवाळे यांनी अहमदाबाद येथे या विषयांवरील एका राष्ट्रीय कार्यशाळेत भाग घेतला होता.
- भ्रुणहत्या या विषयावर अन्य संस्थेतर्फे होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये विशेषत: महिला व्यासपीठाची पूर्णवेळ कार्यकर्ती श्रीमती शोभा लोंढे भाग घेते.

- अलिकडेच लोकसभा, विधानसभामध्ये स्त्रियांना ३३ टक्के कलमाखाली आरक्षण मिळावे व त्यासंदर्भातील विधेयक मंजूर व्हावे म्हणून सर्व स्त्री संघटना पुन्हा चळवळ हाती घेत आहेत. खासदारांना भेटून त्यांच्याशी चर्चा हा त्या कामाचा एक भाग आहे. महिला व्यासपीठाचा या कामी सहभाग आहे.
- गरीब मुलींचे शिक्षण हा महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्यांचा जिव्हाळ्याचा विषय असून महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्यांनी महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थिनींसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करुन त्यांना बक्षीस देण्याचा प्रयत्न केला.
- युवती नेतृत्व विकास युवती प्रशिक्षण हे नवमहाराष्ट्र युवा अभियान व अन्य विभागीय केंद्राच्या मदतीने महत्त्वाचे कार्यक्रम महिला व्यासपीठातर्फे हाती घेतले जात आहेत.
- पुणे येथील विभागीय केंद्रातर्फे श्रीमती शैला लिमये, सुहासिनी करंडक स्पर्धा घेतात.

दरवर्षी नाट्य विषयावर एक कार्यशाळा आयोजित केली जाते.

**संघटनात्मक कार्यक्रम :**

- ऑगस्ट महिन्यात विभागीय केंद्राच्या महिला प्रतिनिधीची एक बैठक मुंबईत घेण्यात आली. वर्षभरात हाती घेण्याचे कार्यक्रम विभागीय केंद्राच्या अपेक्षा. कार्यकर्त्यांची बौद्धिक तयारी इत्यादिविषयी चर्चा झाली. बैठकीत उपाध्यक्ष श्री.हुसेन दलवाई व सरचिटणीस श्री.शरद काळे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. नवमहाराष्ट्र युवा अभियानचे श्री.दत्ता बाळसराफ यांनीही उपयुक्त सूचना केल्या.
- संघटना समिती बैठक दिनांक ३.१०.२००६ रोजी श्रीमती विजया चौहान यांच्या घरी घेण्यात आली. १२ कार्यकर्त्या उपस्थित होत्या. कार्यक्रमांबाबत चर्चा करुन कार्यक्रमांचे आयोजन केले.
- दिनांक ४ व ५ नोव्हेंबर २००६ रोजी स्रॅरो या संस्थेच्या सहकार्याने स्त्रीविषयक छोट्या फिल्मस् एक महोत्सव यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या मुख्य सभागृहात आयोजित केला. महोत्सवात भारताच्या विविध भागात वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या स्त्रियांच्या संदर्भातील ९ चित्रपट दाखविण्यात आले.
- दिनांक ८ डिसेंबर २००६ रोजी मुलुंड येथील कार्यालयात रेशनिंग यंत्रणाबाबत रेशनिंग नियम शिबीर श्रीमती शोभा लोंढे यांनी आयोजित केले. बचतगटातील ६० महिलांनी सहभाग घेतला.
- १९ ते २३ डिसेंबर २००६ रोजी किशोरवयीन मुलींचे पहिले शिबीर औरंगाबाद येथे महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले.
- दिनांक २१ डिसेंबर २००६ रोजी मेणबत्या बनविण्याबाबत प्रशिक्षण बचतगटातील महिलांना दिले.
- दिनांक ३ जानेवारी २००७ रोजी दुपारी ३.०० वाजता नवीमुंबई-नेरुळ येथे 'सावित्रीबाई फुले जयंती' साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्या श्रीमती शोभा लोंढे व श्रीमती पुष्पा नलावडे यांनी ठरविला. या कार्यक्रमात कौटुंबिक समस्या निवारण केंद्राची माहिती श्रीमती पुष्पा नलावडे यांनी दिली. भ्रूणहत्या याविषयी श्रीमती वासंती शेवाळे यांनी माहिती दिली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची माहिती श्रीमती माधुरी शर्मा यांनी दिली.
- बचतगट स्थापना करण्याबाबतच्या बैठका पुढील विभागात श्रीमती शोभा लोंढे यांनी घेतल्या. नायगांव, साकीनाका, ताडदेव, चेंबूर, बी.डी.डी.चाळ,घाटला, मुलुंड, कुलाबा, चिंचपोकळी व बोरिवली इत्यादि
- नवीन स्थापन केलेले बचतगट : शिवशक्तीनगर, मुलुंड, कुलाबा-आंबेडकर नगर, गणेशमूर्ती नगर, मानखूर्द, लातूभाई कॉलनी, बांद्रा शासकीय वसाहत इत्यादि.
- दिनांक १७ व १८ फेब्रुवारी २००७ रोजी नाशिक छत्रपति शिवाजी केंद्र क्रीडा संकुलन येथे अपंग मुलांची स्पर्धा झाली. या कार्यक्रमांत महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.
- महिला व्यासपीठाच्या कार्यकर्त्यांनी सर्व संघटनांनी जागतिक आंतरराष्ट्रीय महिलादिनानिमित्ताने कार्यक्रमात सहभाग घेतला.
- दिनांक ८ मार्च जागतिक महिलादिनानिमित्ताने महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे कार्यक्रम सादर केला. त्या कार्यक्रमांत बचतगटातील ८० महिलांनी सहभाग घेतला.

• दिनांक १६ मार्च २००६ रोजी संघटन समितीची बैठक झाली. त्या बैठकीत श्रीमती विजया चौहान यांनी महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या संयोजक पदाचा राजीनामा दिला. त्याचदिवशी दुपारी निवडणुकीचे अनुभव या विषयाला धरुन श्रीमती शोभा लोंढे यांनी पुढीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन केले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीतील उमेदवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमांत श्रीमती रतन गौडांबे, श्रीमती जयश्री उपश्याम, श्रीमती अरुणा इसनगर, कार्यकर्ते यांनी पुढील विषयी मांडणी केली.

निवडणुकीला उभे राहण्याचा निर्णय कसा घेतला?, कोणी प्रोत्साहन दिले?, कोणी माघार घेण्यास सांगितले?, प्रचारात कोणते मुद्दे महत्त्वाचे ठरले? प्रचार कसा केला? कोणी मदत केली?,साहित्य काय वापरले?,निवडणुकीचा दिवस कसा गेला? परिणामांच्या वेळी काय वाटले?, आर्थिक व्यवस्था कशी उभी केली? किती पैसे लागले?, घरच्या लोकांच्या प्रतिक्रिया काय होत्या?

**क) नवमहाराष्ट्र युवा अभियान :**

नवमहाराष्ट्र युवा अभियानचे काम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक श्री.विश्वास ठाकूर व त्यांचे पूर्णवेळ सहकारी श्री.सुरेश पाटील व श्रीमती मीनल सावंत हे पहातात. तसेच अभियानातंर्गत अपंग हक्क विकास मंचासाठी श्री.विजय कान्हेकर हे समन्वयक म्हणून काम पहातात व इतर अनेक सहकारी कामात मदत करतात.

वैद्यकीय तपासणी व औषधोपचार शिबिर : (दि. १६ एप्रिल २००६)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त धसई, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे वैद्यकिय शिबीर व औषध वाटप हा कार्यक्रम पिनॅकल क्लब मुंबई व महिला आर्थिक विकास महामंडळ (ठाणे जिल्हा) यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.

सृजन बालमहोत्सव कराड : (२३ व २४ एप्रिल २००६)

या कार्यशाळेच्या समारोपास मा. खा. सुप्रिया सुळे, मा. खा. श्री. श्रीनिवास पाटील, आमदार श्री.बाळासाहेब पाटील, डॉ.सुरेश भोसले, सौ.उत्तरा भोसले उपस्थित होते. संयोजन विभागीय संघटक श्री. अभिजित कुलकर्णी व श्री. दीपक कोठावळे यांनी केले. या कार्यक्रमास अभियानचे प्रतिनिधी उपस्थित होते.

शैक्षणिक गुणवत्ता विकास (प्राथमिक शिक्षण) चर्चासत्र – (१८ जून २००७)

महाराष्ट्रात शिक्षणाचे जाळे सर्वत्र पसरलेले आहे. दुर्गम भागातील प्रत्येक वस्तीपाड्यापर्यंत शिक्षणाच्या सुविधा पोहोचविण्याचे काम शासन करीत आहे. प्रशिक्षण केवळ तांत्रिक न रहाता त्यात जिवंतपणा कसा आणता येईल. शिक्षकांचा व्यक्तीविकास, ग्रामशिक्षण समित्यांचे कामकाज यासारख्या अनेक बाबींचा ऊहापोह करण्यासाठी दि. १८ जून २००६ रविवार रोजी यशवंतराव चव्हाण केंद्रात दिवसभराचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या चर्चासत्रात श्री. रमेश पानसे, श्रीमती विजया चौहान, श्रीमती मंजिरी निमकर, श्री.हेरंब कुलकर्णी, श्री.गिरीश सामंत, श्री.हर्षवर्धन सपकाळ, श्री. शहाजी ढेकणे, श्री. रमेश जोशी यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील ३५-४० तज्ञांनी सहभाग घेतला. प्रतिष्ठानचे सरचिटणीस शं.ग. काळे व कोषाध्यक्ष डॉ.रवी बापट यांचीही चर्चासत्रात महत्त्वपूर्ण उपस्थिती होती. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे मा. सुप्रिया सुळे यांनी या चर्चासत्राचे आयोजन करण्यात पुढाकार घेतला होता.

प्राथमिक शिक्षणाच्या चर्चासत्रात राज्याचे शिक्षण सचिव श्री.सुमित मलिक यांची दिवसभराची उपस्थिती, शिक्षणक्षेत्रातील अभ्यासकांची नेमकी व आटोपशीर मांडणी, शालेय शिक्षण क्षेत्राबद्दल आस्था असलेल्यांचा सहभाग आणि समस्या व उपाय यांची मुद्देसूद व नियोजनबद्ध चर्चा हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. श्री.दत्ता बाळसराफ व श्री.युवराज मोहिते यांनी या चर्चासत्रासाठी समन्वयाचे काम केले.

**राज्यस्तरीय बैठक : (१९ जून२००६)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या कार्यकारींनी मंडळाची बैठक पार पडली. या सभेस संयोजक, सहसंयोजक सर्व विभागीय संघटक व विशेष निमंत्रित उपस्थित होते. या बैठकीमध्ये येणाऱ्या वर्षामध्ये घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यात आली व ठराव मंजूर करण्यात आले.

**स्वातंत्र्यदिन फेरी : (१४ ऑगस्ट २००६)**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येस स्वातंत्र्यफेरी आयोजित करण्यात आली होती. महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन या फेरीची

सुरुवात झाली पुढे महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करीत फेरी संपन्न झाली.

**असंघटीत कष्टकरी रॅली : (१६ सप्टें. २००६)**

असंघटित कामगारांच्या सामाजिक सुरक्षा रॅलीचे स्वागत मुंबईतील बहुसंख्य संस्था व संघटना यांनी करावे यासाठी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

### राज्यस्तरीय बैठक : (२४ सप्टे. २००६)

नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या विभागीय संघटकांची बैठक यशवंतराव चव्हाण सेंटर येथे घेण्यात आली. या बैठकीत सर्व विभागांचे अहवाल सादर करण्यात आले. तसेच आगामी काळात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाबाबत साधक-बाधक चर्चा करण्यात आली.

### संवाद संध्या : (२५ सप्टे. २००६)

महाराष्ट्र महिला व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य विंदा करंदीकर यांच्या कवितेवर आधारित 'संवादसंध्या' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. श्रीमती उषा मेहता, प्रा.प्रज्ञा लोखंडे व प्रा.नीरजा यांनी तो सादर केला.

### चित्रपट रसास्वाद यात्रा : (७ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २००६)

जेष्ठ चित्रपट समीक्षक मा. अशोक राणे यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाने नवमहाराष्ट्र युवा अभियान व इंडियन फिल्म ॲकेडेमीतर्फे आयोजित केलेल्या चित्रपट रसास्वाद यात्राचा शुभारंभ नाशिक येथून झाला. तेथील के.टी.एच. एम. या महाविद्यालयात सोमवार दि. ७ ऑगस्ट ०६ रोजी पहिली कार्यशाळा घेतली. शाळा कॉलेजच्या पातळीवर चित्रपट शिक्षण दिले जावे आणि त्यांचे महत्त्व समाजातील सर्व थराला विशेषत: शिक्षणव्यवस्थेला समजावून द्यावे म्हणून हा उपक्रम हाती घेतला महाराष्ट्रातील जवळपास सर्व जिल्हयातील ५० शहरातील ५० कॉलेजात एक दिवसाचा चित्रपट रसास्वाद कार्यशाळेचे (फिल्म एप्रिसिएशन वर्कशॉप) आयोजन असा ह्या फिल्म एप्रिसिएशन यात्रा उपक्रमाचा कार्यक्रम आहे. सहा तासांच्या या कार्यशाळेत चित्रपट इतिहास (माध्यम, स्वरुप आणि विकास), चित्रपट आणि तमाम पारंपरिक कला, चित्रपट कला विरुद्ध धंदा आणि चित्रपट रसग्रहण या पाच विषयांवर संवादपूर्ण व्याख्यान, चर्चा आणि जगातला पहिला भारतीयपट राजा हरिशचंद्र (१९१३) तसेच देश परदेशातील काही चित्रपटातील निवडक दृश्ये काही लघूपट यांच विषयानुरुप प्रदर्शन असं या कार्यशाळेच स्वरूप होते.

### ७ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २००६

कॉलेजेस- २५, उपस्थिती - प्रत्येक ठिकाणी १५० ते २०० विद्यार्थी, साधारणपणे १० प्राध्यापक आणि विशेष पाहुणे म्हणून १५ ते २० गावातील मंडळी असत. व्याख्यानाचे एकूण तास १५०, प्रमुख वक्ता व सूत्रधार : श्री.अशोक राणे

### ग्रामशिक्षण समिती सक्षमीकरण परिषद - अमरावती :- (१० ऑक्टोबर २००६)

दीप प्रतिष्ठानच्या वतीने अमरावती येथे ग्रामशिक्षण समित्यांचे सबलीकरणासाठी त्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेला गडचिरोली, वर्धा, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, अमरावती, पुणे या जिल्ह्यांतून प्रतिनिधी सहभागी झाले होते.

**समाजकार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग - २००६ प्रशिक्षण समन्वयक : श्री विजय कसबे**

| दिनांक | विषय | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| २० ऑगस्ट २००६ | स्व. ओळख, मुद्दे व निर्णय | ५ नोव्हें. २००६ | १. गट कार्य<br>२. फुले आंबेडकरी चळवळ आरक्षण चर्चा |
| ०३ सप्टे. २००६ | १. समाजकार्याचा इतिहास<br>२. मानवी विकासाचे टप्पे | १२ नोव्हें. २००६ | असंघटित कामगारांचे प्रश्न, अपंगांचे प्रश्न |
| १७ सप्टें. २००६ | १. व्यक्ती सहयोग कार्य<br>२. संवाद व्याख्या व प्रकार<br>३. भूमिका सादरीकरण | १९ नोव्हें. २००६ | ग्राहक कायदा<br>मिडियाचे समाज कार्यात महत्व |

| दिनांक | विषय | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ ऑक्टो. २००६<br>१५ ऑक्टो. २००६ | बाल कामगार समस्या<br>समुपदेशन | २६ नोव्हें. २००६<br>१० डिसेंबर २००६<br>२१ जाने. २००७ | IPC मधील महिलांसंबंधी गुन्हे बचत गट<br>रेशनिंग यंत्रणा/चळवळ/योजना<br>वस्ती साधने व नकाशा, वस्ती सर्वेक्षण व समतेची ओळख, वस्तीच्या व्याख्या प्रकार, वस्ती समस्या हाताळणी वस्ती कार्यकर्ता भूमिका |

कायदेविषयक प्रशिक्षण वर्ग २००६ – ०७ प्रशिक्षण समन्वयक – श्री. अनिल चाळके

| दिनांक | विषय | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ११ नोव्हें. २००६<br>२५ नोव्हें. २००६ | न्यायालयीन कामकाज<br>विधी सेवा प्रधिकरण अधिनियम, हिंदू विवाह कायदा ५५ | ९ डिसें. २००६<br>७ जाने. २००७<br><br>२७ जाने. २००७ | कौटुंबिक अत्याचार विरोधी कायदा २००५<br>माहितीचा अधिकार अधिनियम २००५<br><br>भारतीय दंडसंहिता |

समाज कार्यकर्ता प्रशिक्षणवर्ग संस्था भेट : (आदिवासी सहज शिक्षण परिवार, मासवण, ता. पालघर, जि. ठाणे)

२४ डिसें. २००६ रोजी सकाळी १० वाजता आदिवासी सहज परिवार संस्थेच्या चिटणीस श्रीमती सुमन देशपांडे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. समाजवादी विचारांनी एकत्रित आलेल्या महिलांच्या प्रयत्नांचे चित्र म्हणजे आदिवासी सहज शिक्षण परिवार ही संस्था. या भेटीस एकूण २८ कार्यकर्त्यांनी भेट दिली.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन कथा, कविता, एकांकिका स्पर्धा–२००६

कथा स्पर्धा – परीक्षक : डॉ. दीपा देशमुख

| नांव | कथा | नांव | कथा |
|---|---|---|---|
| ऐश्वर्य नामदेव<br>मुकुंद नाकील<br>आनंदा टकले | (बाप) प्रथम क्रमांक<br>(जोगतीन) द्वितीय क्रमांक<br>(लाव्हारं) तृतीय क्रमांक | अमित नाईक<br>फेरोज पठाण<br>उमेश देशमुख | (प्रेमाहुती) उत्तेजनार्थ<br>(अन गुंडेराव मंत्री झाले) उत्तेजनार्थ<br>(जॅनी) उत्तेजनार्थ |

कविता स्पर्धा – परीक्षक : प्रा. श्रीमती लीना केदारे

| नांव | कथा | नांव | कथा |
|---|---|---|---|
| दिपक चौधरी<br>ऐश्वर्य नामदेव<br><br>नारायण पूरी | (अमिबा) प्रथम क्रमांक<br>(मुंग्यांच्या वारुळाला लागावी आग) द्वितीय क्रमांक<br>(माय) तृतीय क्रमांक | संदिप कांबळे<br>विलास तनपूरे<br><br>श्रावण शिंदे | (बळीराज) उत्तेजनार्थ<br>(आर्जव) उत्तेजनार्थ<br><br>(आता तरी जगायला शिक) उत्तेजनार्थ |

एकांकिका लेखन स्पर्धा – परीक्षक : प्रा. रवी देवगडकर

| नांव | एकांकिका | नांव | एकांकिका |
|---|---|---|---|
| दिनकर पंडित<br>माधवी जाधव<br>प्रसाद सोनटक्के | (एप्रिल फूल) प्रथम क्रमांक<br>(आम्ही आहोत आम्ही) द्वितीय क्रमांक<br>(नो चान्स फॉर लव्ह) तृतीय क्रमांक | सुयोगकुमार भवरे<br>आशिष काकडे<br>आनंद काकडे | (जीवन संग्राम) उत्तेजनार्थ<br>(स्वयंवर) उत्तेजनार्थ<br>नवदिशा: व्यसनमुक्तीची पहाट उत्तेजनार्थ |

माहितीचा अधिकार कार्यशाळा : (७ जानेवारी २००७)

नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने श्रमिक हॉल,दादर,मुंबई येथे 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' या विषयावर पूर्ण दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली. दि. ७ जानेवारी रोजी घेण्यात आलेल्या या कार्यशाळेस राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य क्षेत्रातील कार्यकर्त्यासह महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच जिज्ञासू गृहिणींना मौलिक मार्गदर्शन, यशदा,पुणे संस्थेचे तज्ञ अमरनेळचे प्रा.अशोक पवार व माहितीचा अधिकार क्षेत्रात कार्यरत असणारे मुंबईचे तडफदार सामाजिक कार्यकर्ते श्री.प्रमोद पाटील यांनी केले.

यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार – २००६ : (१२ जानेवारी २००७)

नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या एका युवा/युवतीस युवा पुरस्काराने सन्मानीत करण्यात येते. सन २००६ चा युवा पुरस्कार मा.श्री. अभिजीत मोहनराव वडगावकर, सोलापूर व मा. श्रीमती कुषावर्ता चंद्रशेखर बेळे, देवणी, लातूर यांना संत एकनाथ रंगमंदिर, औरंगाबाद येथे मा. अच्युत गोडबोले, मा. विश्वासभाऊ कचरे यांच्या हस्ते व मा. नंदकिशोर कागलीवाल यांच्या उपस्थितीत युवादिनी दि. १२ जानेवारी २००७ रोजी पुरस्कार प्रदान करण्यात आले. मा. सचिन मुळे, मा. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. निलेश राऊत, श्री. अरुण रसाळ, श्री. संजय शेटे, श्री. सुरेश पाटील तसेच श्री. सुधीर सेवेकर, डॉ. दिपा काळे इत्यादि उपस्थित होते. पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम रु. ११,०००/- व सन्मानपत्र असे आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ कार्यशाळा : (११ मार्च २००७)

नवमहाराष्ट्र युवा अभियान. व धोंडू डोळकर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या विद्यमाने पिपल्स जिमखाना,परळ येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. श्री. प्रमोद पाटील, श्री. व्होरा यांनी मार्गदर्शन केले. श्री. प्रसाद सारंग यानी कार्यशाळेचे आयोजन केले होते. मुंबईतील साठ ते सत्तर नागरिकांनी याचा लाभ घेतला.

एड्स प्रतिबंधक नेतृत्व कार्यशाळा : (११ मार्च व १७ मार्च २००७)

नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पुरंदर स्नेह सामाजिक कल्याण संस्था,खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रमिक हॉल दादर, मुंबई येथे 'एड्स प्रतिबंधक नेतृत्व' या विषयावर दिनांक ११ व १७ मार्च रोजी पूर्णवेळ प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला डॉ. आर. आर. शिंदे (विभागप्रमुख, प्रतिबंधक व समाजवैधकशास्त्र, के. ई. एम. रुग्णालय, मुंबई) यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

**अपंग हक्क व विकास मंच :**

१. अपंग हक्क व विकास परिषद १ व २ जुलै २००६

अपंगांच्या विकासासाठी अनेक संस्था अस्तित्वात असल्यातरी प्रत्येक अपंगांचे सामाजिक आणि आरोग्यविषयक प्रश्न निराळे आहेत. शिवाय हा प्रवर्ग एकसंध नसल्यामुळे त्यांच्या समस्यांविषयी एकत्रितपणे चर्चा करुन त्या जाणून घेणे आणि उदयाची दिशा निश्चित करणे यासाठी १ व २ जुलै ०६ रोजी नवमहाराष्ट्र युवा अभियान यांनी मुंबईत अपंग हक्क व विकास परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेला केंद्रीय कृषीमंत्री मा. ना. शरद पवार, उपमुख्यमंत्री मा. ना. आर. आर. पाटील, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री मा. ना. दिलीप वळसे-पाटील, सामाजिक न्यायराज्यमंत्री मा. ना. धर्मरावबाबा अत्राम, अपंग कल्याण आयुक्त, श्री. आर. के. गायकवाड यांच्यासह राज्यभरातून १०० मान्यवर व १५० उपचार तज्ञ आणि ७५० प्रतिनिधी होते.

चार सत्रात चालविण्यात आलेल्या या परिषदेत अंध, दृष्टीदोष, कर्णबधिर, मुकबधिर, अस्थिव्यंग व मतिमंद या अपंगांच्या सर्व प्रवर्गाच्या विविध प्रश्नांवर विचारवंतानी आपले मनोगत व्यक्त केले. दोन दिवसात झालेल्या चर्चेतून समोर आलेल्या अपंगांच्या समस्या प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी प्रास्ताविकातून मांडल्या अपंगांच्या सर्व प्रवर्गाचे प्रश्न वेगवेगळे व गंभीर असून त्यांची उत्तरे ही स्वतंत्रपणे शोधण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

२. दि. ३१ ऑगस्ट २००६ : मा. ना. विमल मुंदडा यांचे समवेत मा. सुप्रियाताई यांचे नेतृत्वाखाली आरोग्यविभागातील अधिकारी व हक्क मंचाचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक संपन्न झाली. आरोग्य विभागामार्फत अपंगांना जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर कृत्रिम अवयव व शस्त्रक्रिया यासाठी अनेक वर्षापासून निधी पडून होता परंतु खर्च होत नसे त्याबाबत चर्चा झाली.

३. दि. २० सप्टें. २००६ : महाराष्ट्र राज्याचे उप-मुख्यमंत्री, मा. आर. आर. पाटील यांनी आयोजित केलेल्या अपंगांच्या विविध

समस्यासंदर्भातला बैठकीस अपंग हक्क व विकास मंचाच्या संयोजिका, मा.श्रीमती सुप्रियाताई सुळे, मा.श्री.हेमंत टकले, श्री.विजय कान्हेकर, श्री.दत्ता बाळसराफ, श्री.सुरेश पाटील, श्री.दिपक शेलार इत्यादि हजर होते.

४. दि.२० ऑक्टो. २००६ : प्रतिष्ठानच्या सांस्कृतिक सभागृहात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री मा.दिलीप वळसे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत अपंगात शिक्षण देणाऱ्या विशेष शाळांच्या अभ्यासक्रमात तांत्रिक शिक्षणाची तोंडओळख सुद्धा करुन दिली जात नाही ह्यावर चर्चा झाली.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी अपंगासाठी उच्च व तंत्र शिक्षणाच्या संघी उपलब्ध होण्याबाबत चर्चा करण्यासाठी स्वतंत्र बैठक बोलाविण्यात येईल असे सांगितले. त्या अनुषंगाने अपंगांना तांत्रिक शिक्षणाच्या संघी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात काही सूचना करण्यात आल्या आहेत. या सूचनांची अंमलबजावणी अवश्य होईल असा विश्वास त्यांनी मंचास दिला.

५. दि.२८ व २९ ऑक्टो. २००६ - अपंग कलावंत मेळावा - कान्हेफाटा : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान अपंग हक्क व विकास मंच आणि नाट्यशाळेच्या वतीने अपंग कलावंतासाठी साईबाबा सेवाधाम, कान्हेफाटा, ता.मावळ, जि.पुणे येथे निवासी अपंग कलावंत मेळावा आयोजित करण्यात आला. दि. २८ व २९ ऑक्टोबर या दोन दिवसीय चालणाऱ्या मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे अपंग कल्याण आयुक्त श्री. आर. के. गायकवाड यांनी केले. या मेळाव्यास एकूण ५३ अपंग कलावंत हजर होते.

या मेळाव्यातून अष्टपैलू कलावंत म्हणून श्री. बिपीन वर्तक यांचा शाल, श्रीफळ व रु. ५०००/- देऊन सत्कार करण्यात आला. या मेळाव्याचा समारोप प्रख्यात रंगकर्मी श्री. कमलाकर सोनटक्के यांनी केला.

४. दि. २० नोव्हें. २००६ - मा. उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत मान्य झालेल्या इतिवृत्ताची आढावा बैठक मा. सामाजिक मंत्री, न्यायमंत्री चंद्रकांत हांडोरे यांच्या दालनात मा. सामाजिक न्याय राज्यमंत्री धर्मरावबाबा अत्राम, मंचच्या सौ. सुप्रियाताई सुळे, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, डॉ. अरविंद प्रभु त्याचप्रमाणे मंत्रालयातील सर्व विभागांचे प्रमुख व मंचचे प्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

५. दि. १० डिसें. २००६ - मंचाने प्रतिष्ठानच्या सांस्कृतिक सभागृहात जागतिक अपंग दिवस व मानवी हक्क दिनाचे औचित्य साधून अपंगांच्या वैद्यकीय, रोजगार, स्वयंरोजगार आणि सामाजिक पुनर्वसनासाठी कार्यशाळेचे आयोजन केले होते. अपंगामध्ये एड्सविषयी जनजागृतीसाठी डॉ. आर. आर. शिंदे यांच्या सहाय्याने प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

६. दि. २२ जाने. ०७ - महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे कार्यशाळा घेण्यात आली. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा, परीक्षा मंडळ व अभियानचे प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यशाळेत अपंगांसाठी विशेष अभ्यासक्रम तयार करण्यात आले.

७. अपंग मुला मुलींच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा १७ व १८ फेब्रुवारी २००७ : अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, नाशिक महानगरपालिका, नाशिक, जिल्हा परिषद, नाशिक, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे अपंग हक्क विकास मंच, विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अपंग मुला/मुलींच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा दि. १७ व १८ फेब्रुवारी २००७ रोजी नाशिकच्या राजे संभाजी स्टेडियमवर अतिशय उत्साहाने संपन्न झाल्या. महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यातील सुमारे १५०० अपंग मुलामुलींनी या स्पर्धेत सहभाग घेतला. अर्थातच मा. श्री. शरद काळे, मा. श्री. हुसेन दलवाई व मा. डॉ. रवि बापट यांचे भक्कम पाठबळ लाभल्यामुळे आम्ही हे धाडस करु शकलो. ही जबाबदारी स्वीकारताना संयोजक मा. श्रीमती सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनानुसार समन्वयक श्री. विश्वास ठाकूर, श्री. विजय कान्हेकर, श्री. दत्ता बाळसराफ यांनी अपंगांच्या क्रीडा स्पर्धांना एक नवी दिशा आणि आयोजनातील एक नवी कार्यपद्धति देण्याची महत्त्वाकांक्षी संकल्पना मनात घेऊनच या स्पर्धेचे अतिशय उत्कृष्टरित्या आयोजन केले.

**ड) मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३९-क प्रमाणे संविधानाला अभिप्रेत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाने विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ नावाचा कायदा केला आहे. हा कायदा संपूर्ण भारत देशाला लागू आहे. या कायद्याची अमंलबजावणी शासकीय यंत्रणेमार्फत केली जाते. परंतु या कायद्याच्या तरतुदीनुसार हे काम अशासकीय संस्था, सार्वजनिक न्यास इत्यादि मार्फत सुद्धा करता येते म्हणून १९९२ पासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना

राबविण्यात येत आहे. त्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम नावाच्या विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली निस्वार्थ सेवा या योजनेसाठी देत आहेत.

विधी सेवा प्राधिकरण अधिनियमाला अभिप्रेत असलेली सर्व कामे वरील फोरम मार्फत केली जातात. त्या मध्ये गोरगरिबांना व गरजवंताना मोफत तोंडी सल्ला देणे, वादग्रस्त पक्षकारामध्ये समेट घडवून आणणे, प्रलंबित प्रकरणामध्ये समेट घडवून आणण्यासाठी संबंधित न्यायालयाच्या सहकार्याने लोकन्यायालयाचे आयोजन करणे, कायद्याची विशेष माहिती करुन देण्यासाठी विशेष व्याख्यानांचे आयोजन करणे, सामान्य माणसाला कायद्याची माहिती करुन देण्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे, विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कार्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे आणि विधी क्षेत्रामध्ये संशोधन करुन वैहानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला विचारार्थ पाठविणे इत्यादि कामांचा समावेश होतो. त्यानुसार गेल्या आर्थिक वर्ष (२००६-२००७) मध्ये खाली दर्शविलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१. फोरमच्या बैठका :

योजनेच्या अमंलबजावणीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दर महा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या बैठका घेतल्या जातात. त्यानुसार गेल्या आर्थिक वर्षामध्ये १२ बैठका झाल्या.

सरासरी १५ सदस्य प्रत्येक बैठकीला उपस्थित होते. या सर्व बैठकीमध्ये अंदाजे २०० विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

२. उपसमितीच्या बैठका :

काही महत्त्वाच्या विषयासंबंधी सखोल अभ्यास करुन प्रस्ताव तयार करण्यासाठी फोरमच्या वेगवेगळ्या उपसमित्या नेमल्या जातात. अशा उपसमित्यांच्या ३० सप्टेंबर २००६, १६ डिसेंबर २००६ व ३ मार्च २००७ दिवशी बैठका झाल्या.

१. संपादकीय उपसमिती : 'न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा' नांवाचे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी श्री.शरद काळे,सरचिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली श्री.शांताराम दातार, श्री. अशोक कदम, श्री. म. बा. पवार या सदस्यांची उपसमिती गठित केली होती. या बैठकांमध्ये पुस्तकाच्या स्वरुपाबाबत सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

२. छाननी समिती : देवराष्ट्रे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंधाची छाननी करण्यासाठी छाननी समितीची बैठक २२ डिसेंबर २००६ रोजी झाली.

३. ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा समिती : चव्हाण केंद्रामध्ये दरवर्षी ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा भरविण्यात येतो. गेल्या आर्थिक वर्षामध्ये या मेळाव्याची तयारी करण्यासाठी खालील कार्यवाही करण्यात आली.

   १. सर्व विभागाची बैठक : दिनांक २८ जुलै २००६ रोजी दुपारी ३.०० वाजाता चव्हाण केंद्रामध्ये श्री सुशील गुप्तन् यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिष्ठानच्या सर्व विभागांची बैठक झाली. सर्व विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीमध्ये मेळाव्याची व ज्येष्ठ नागरिकांच्या सत्काराची रुपरेषा ठरविण्यात आली.

   २. प्रतिनिधी बैठका : ज्येष्ठ नागरिक मेळाव्याची अंतिम रुपरेषा ठरविण्यासाठी फोरम व फेस्कॉम यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ सप्टेंबर २००६ रोजी सायंकाळी ३.०० वाजता विरंगुळा केंद्र, मुलुंड (पूर्व) येथे सर्व ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधींच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. श्री. मधुकर कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. बैठकीला ६० पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीमध्ये मेळाव्याचे अंतिम स्वरुप ठरविण्यात आले.

३. कायदेविषयक सहाय्य व सल्ला केंद्र :

गरजवंतांना मोफत सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजल्यापासून सल्ला केंद्र चालविले जाते. तज्ञ वकीलांमार्फत सल्ला दिला जातो. गेल्या आर्थिकवर्षामध्ये हे केंद्र एकूण ४९ दिवस चालू होते. सल्ला केंद्रामध्ये आलेल्या सर्व लोकांना तोंडी सल्ला देण्यात आला. अंदाजे ९६ लोकांनी प्रत्यक्ष लाभ घेतला.

४. मोफत समुपदेश व तडजोड केंद्र :

दर मंगळवारी सायंकाळी ४.०० ते ७.०० या वेळात समुपदेश व समेट शाखेचे आयोजन करण्यात येते.

५. आपल्या कायद्याची ओळख करुन घ्या व्याख्यानमाला : (Know your Law Lecture Series)

या व्याख्यानमालेअंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदेपंडितांचे विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात येते. गेल्या आर्थिकवर्षामध्ये असे एकूण दोन कार्यक्रम झाले त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. शनिवार दिनांक २९ एप्रिल २००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता चव्हाण केंद्राच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये 'डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन्स' (Development Control Regulations) याविषयावर श्री.महाबळेश्वर मोरजे,वकील यांचे व्याख्यान झाले. श्री.शशी प्रभु,वास्तूविशारद हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मुंबई महापालिकेचे निवृत्त चीफ इंजिनिअर श्री.साने आणि माजी मंत्री,श्री. दिवाकर रावते यांचीसुद्धा भाषणे झाली.

२. कौटुंबिक अत्याचार प्रतिबंधक कायदा : शनिवार दिनांक ९ डिसेंबर २००६ रोजी कौटुंबिक अत्याचार प्रतिबंधक कायदयासंबंधी श्री. हेमंत केंजाळकर, वकील, व श्रीमती विद्या वैद्य, वकील यांची व्याख्याने झाली. १५० पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या. हा कार्यक्रम फोरम, महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजण्यात आला होता. प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री.शरद काळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

६. विधी साक्षरता कार्यक्रम :

सर्वसामान्य लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या कायद्याची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, गृहनिर्माण संस्थाचे सदस्य, सर्व सामान्य जनता इत्यादि गेल्या आर्थिक वर्षामध्ये अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचा तपशील खाली दर्शविल्याप्रमाणे

६-१ : फोरम व समीप प्रतिष्ठान, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २ एप्रिल २००६ रोजी रोटरी सेवा सभागृह, डोंबिवली, येथे सामान्य स्त्री-पुरुषांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २०० पेक्षा जास्त स्त्री-पुरुष उपस्थित होते. श्री अनिल भानुदास हे अध्यक्षस्थानी होते.

६-२ : फोरम व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये रविवार दिनांक ६ ऑगस्ट २००६ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुले व मुली) उपस्थित होते. श्री. हेमंत देशपांडे, जिल्हा न्यायाधीश, ठाणे हे अध्यक्षस्थानी होते. मुंबई उच्च न्यायालयांचे पीठासीन न्यायमूर्ती श्री डी. जी. देशपांडे हे प्रमुख पाहुणे होते.

६-३ : फोरम व वीर वजेकर महाविद्यालय, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी त्या महाविद्यालयामध्ये रविवार दिनांक १३ ऑगस्ट २००६ रोजी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते. रायगड जिल्हा न्यायाधीश श्री. खाणझोडे हे अध्यक्ष होते आणि मुंबई उच्च न्यायालयाचे पीठासीन न्यायमूर्ती श्री. अभय ओक हे प्रमुख पाहुणे होते.

६-४ : फोरम व डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, नेरुळ, नवी मुंबई, यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी रविवार दिनांक २० ऑगस्ट २००६ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) एक विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ठाणे जिल्हा न्यायाधीश श्री. हेमंत देशपांडे होते आणि प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई उच्च न्यायालयांचे पीठासीन न्यायमूर्ती श्री राधाकृष्णन् हे उपस्थित होते. २०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते.

६-५ : फोरम व डोंबिवली ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २२ सप्टेंबर २००६ रोजी ज्ञानेश्वर मंगल कार्यालय, डोंबिवली येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २०० पेक्षा जास्त जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

६-६ : फोरम व यशवंतराव कनिष्ठ महाविद्यालय, देवराष्ट्रे, यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १८ नोव्हेंबर २००६ रोजी त्या महाविद्यालयामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी एक विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते.

६-७ : फोरम व यशवंतराव कनिष्ठ महाविद्यालय, देवराष्ट्रे, यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १९ नोव्हेंबर २००६ रोजी महिला व पुरुष यांच्यासाठी त्या महाविद्यालयामध्ये एका विधि साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त स्त्री-पुरुष उपस्थित होते. यशवंत शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री. मोहन मोरे हं अध्यक्ष होते.

६-८ : फोरम व आशादीप महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १० डिसेंबर २००६ रोजी महापालिका शाळा, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल येथे महिलांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी श्रीमती आशा भोईर होत्या. १०० पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या.

६-९ फोरम व मानसी मंगल विकास केंद्र, चेंबूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १४ जानेवारी २००६ रोजी महिला व पुरुषासाठी साई मंदिर,चेंबूर येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त स्त्री-पुरुष उपस्थित होते.

६-१० फोरम व रमाई महिला विकास समिती, चेंबूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २५ फेब्रुवारी २००६ रोजी महिलासाठी त्रिमूर्ती चाळ, रामगड, मुलुंड (प.) येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. श्री.उत्तम गीते हे अध्यक्षस्थानी होते. १०० पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या.

६-११ फोरम व डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, वडाळा, यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ११ मार्च २००७ रोजी डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयामध्ये त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य श्री.माधवी अध्यक्षस्थानी होते.

६-१२ : फोरम व आचार्य मराठे महाविद्यालय, चेंबूर, यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १८ मार्च २००७ रोजी त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी त्या महाविद्यालयामध्ये एक विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य श्री. मुळे हे अध्यक्षस्थानी होते.

६-१३ : वरील सर्व विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये हुंडाबंदी व मूलभूत कर्तव्यपालन याबाबत शपथा देण्यात आल्या तसेच संविधानाच्या सरनाम्याचे सांघिक वाचन करण्यात आले.

७. न्यायालयात मराठीचा वापर :

या चळवळीचा एक भाग म्हणून फोरमतर्फे खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१. विधी महाविद्यालयामध्ये मराठीचे वर्ग :- मुंबई विद्यापीठाचे जे विद्यार्थी एल. एल. बी.च्या परीक्षेमध्ये मराठीतून उत्तरपत्रिका लिहिणार आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी मराठीचे खास वर्ग भरविण्यात आले. हे वर्ग न्यू लॉ महाविद्यालय, माटुंगा येथे भरविण्यात आले.

२. मराठी चर्चासत्र :- फोरमतर्फे दिनांक १७ जून २००६ रोजी चव्हाण केंद्रामध्ये न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी प्रास्ताविक केले. चर्चासत्रामध्ये ४० सदस्य उपस्थित होते. यामध्ये अनेक शासकीय अधिकारी उपस्थित होते. अतिशय महत्त्वाचे १५ प्रकारचे निर्णय घेण्यात आले.

८. न्यायिक अधिकारी व वकील यांची परिषद :

रविवार दिनांक ११ नोव्हेंबर २००६ रोजी मंगल कार्यालय, डोंबिवली येथे ठाणे जिल्ह्यातील न्यायिक अधिकारी व वकील यांची परिषद संपन्न झाली ही परिषद कल्याण, उल्हासनगर, भिवंडी व शहाड येथील वकील संघाने संयुक्तपणे आयोजिली होती. फोरमचे सदस्य सचिव आदेशानुसार या परिषदेला उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. पळशीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री.हेमंत देशपांडे जिल्हा न्यायाधीश हे अध्यक्ष होते. ३०० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते.

९. मूलभूत कर्तव्याबाबतचा मेळावा :

फोरम, मुंबई विद्यापीठ आणि फ्लॅट (Flat) ओनर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथे दिनांक ३ जानेवारी २००७ रोजी संविधानातील मूलभूत कर्तव्ये पालनाबाबत श्री. महाबळेश्वर मोरजे यांच्या अध्यक्षतेखाली एक मेळावा भरविण्यात आला होता. ३०० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते. मेळाव्यामध्ये मूलभूत कर्तव्यांचे महत्त्व सांगण्यात येऊन सर्व उपस्थितांनी मूलभूत कर्तव्यपालनाबाबत शपथा घेतल्या. या मेळाव्यामध्ये शासनाच्या गृहनिर्माण धोरणाबाबतसुद्धा चर्चा झाली.

१०. मराठी निबंधांचे पुस्तक प्रकाशित करण्याबाबत :

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई राज्य मराठी विकास संस्था आणि मुंबई विद्यापीठ (विधी विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २३ डिसेंबर १९९५ व रविवार दिनांक २४ डिसेंबर १९९५ रोजी चव्हाण केंद्रामध्ये 'मराठीतून विधी व न्याय व्यवहार' या विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादामध्ये अनेक मान्यवरांनी भाग घेऊन आपले निबंध सादर केले होते. या निबंधाचे संकलन पुस्तकाच्या स्वरुपात प्रकाशित करण्याचा प्रतिष्ठानने निर्णय घेतला होता. हे काम सुसूत्रपणे पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस, मा.श्री.शरद काळे यांच्या अध्यक्षतेखाली खालील तीन सदस्यांची संपादकीय समिती नेमण्यात आली होती.

१. श्री. शांताराम दातार

२. श्री. अशोक कदम

३. श्री. म. बा. पवार

वरील समितीच्या एकूण तीन बैठका झाल्या. त्या समितीने पुस्तकाची मुद्रण प्रत तयार केली. यामध्ये वर दर्शविलेले निबंध, शासनाने व मुंबई उच्च न्यायालयाने काढलेले आदेश, परिपत्रके, निर्णय इत्यादिंचा समावेश करण्यात आला. १२ मार्च २००७ रोजी मा.यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जयंतीच्या दिवशी 'न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा' या शीर्षकाचे पुस्तक प्रतिष्ठानचे अध्यक्ष व भारताचे कृषीमंत्री मा.श्री.शरदराव पवार यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. या पुस्तकाच्या प्रकाशनाचे काम ग्रंथालीने केले.

११. संशोधनाचे काम :

वर सांगितल्याप्रमाणे फोरमतर्फे विधी संशोधनाचे कामसुद्धा केले जाते. गेल्या आर्थिकवर्षामध्ये फोरम नियमांमध्ये अनेक महत्त्वाचे बदल सुचविण्यात आले असून ते नियम सध्या प्रतिष्ठानला मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत. सध्या महाराष्ट्र हुंडाबंदी नियम २००३ यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी संशोधन चालू आहे.

**इ) महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या मदतीने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे तीन महत्त्वाचे उपक्रम यावर्षी संपन्न झाले.

१. माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांची वैज्ञानिक जाणिवा शिबिरे संपन्न झाली. महाराष्ट्रातील १२ जिल्हयांतील ८७० शिक्षकांनी त्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, समाजसुधारकांच्या सत्यशोधाची जाणिवा व अंधश्रद्धा निर्मूलन यांचे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात आले.

२. विद्यार्थ्यांसाठी एक स्वयं अध्ययन परीक्षा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना दिलेली प्राप्तपत्रिका स्वत: वाचून पालकांशी, शिक्षकांशी चर्चा करुन मित्रांशी बोलून ते सोडवतात. यावर्षी सातहजार विद्यार्थी-विद्यार्थिनी या परीक्षांना बसले. त्यामध्ये औरंगाबाद येथील एकहजार उर्दू विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळेत विज्ञानबोधवाहिनी या नावीन्यपूर्ण उपक्रमाने जणू छोटे विज्ञान संमेलनच साजरे होते. यावर्षी मराठवाडा व व-हाड यामधील १५५ शाळांत हा उपक्रम साजरा झाला.

**ई) रंगस्वर :**

प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे नाट्य, चित्रपट, गायन इत्यादि कार्यक्रम होतात. रंगस्वरची वर्गणी, पतीपत्नीसाठी रु. ७५०/-, वैयक्तिक रु. ५००/- अपंगासाठी रु. १५०/- भरुन रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांना कार्यक्रमाचा आस्वाद घेता येतो. रंगस्वरच्या कार्यक्रमाचे नियोजन सरचिटणीस श्री. शरद काळे, कोषाध्यक्ष डॉ. रवींद्र बापट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येते.

११ एप्रिल : भीमसेन जोशी अध्यासन ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ सौ. अंजली दाते यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

१५ एप्रिल : रंगस्वरच्या वतीने कै. सुरेश भट यांच्या जन्मदिनानिमित्ताने मराठी गझल मुशायरा आयोजित करण्यात आला. त्यामध्ये सदानंद सातवडेकर, अभिमन्यू अळतेकर, सुनील तांबे यांचा सहभाग होता.

१७ एप्रिल : प्रभात चित्रमंडळाच्या सहयोगाने 'लाइफलेस पेपर' हा इराणी चित्रपट दाखविण्यात आला.

१८ एप्रिल : रंगस्वरच्या वतीने अर्चना कान्हेरे यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

२४ एप्रिल : प्रभात चित्रमंडळाच्या सहयोगाने 'द सायलेन्स' (इंगमार बर्गमन स्वीडन) दिग्दर्शित चित्रपट दाखविण्यात आला.

२५ एप्रिल : रंगस्वरच्या वतीने वीणा वायकुळ यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

४ मे : प्रभात चित्रमंडळाच्या सहकार्याने रेनन् अॅलेक्झॅन्ड्रोविक हा इस्त्रायल चित्रपट दाखविण्यात आला. (जेम्स जर्नी टू जेरूसलेम)

१० मे : साईसाक्षी प्रकाशित अनामिका निर्मित 'माकडाच्या हाती शॅम्पेन' लेखक डॉ.विवेक बेळे, दिग्दर्शक गिरीश जोशी या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

१६ मे : साईसाक्षी प्रकाशित अनामिका निर्मित 'फायनल ड्राफ्ट' (लेखक/दिग्दर्शक गिरीश जोशी) या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

१७ मे : भीमसेन जोशी अध्यासन ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ सहकार्याने हृषिकेश गांगुर्डे यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

१८ मे : ललित,मुंबई निर्मित 'अलविदा' (लेखक-मनस्वीनी लता रविंद्र, दिग्दर्शक सतीश मनवर) या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

१९ मे ते २० मे : पंचम निषाद सहकार्याने 'आरोही' हिंदुस्थानी संगीत महोत्सव संपन्न झाला.

२२ मे : रंगस्वरच्या वतीने जॅन कडार व इल्मार क्लॉस झेक दिग्दर्शित 'द शॉप ऑन द मेन स्ट्रीट' चित्रपट दाखविण्यात आला.

६ जुलै : रंगस्वरच्या वतीने आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला अभंग भक्तिगीतांचा 'सुंदर ते ध्यान' कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमाची संकल्पना/संयोजन/निरूपण रेखा नार्वेकर यांनी केले.

१२ जुलै : ललित थिएटर्स सहकार्याने 'सिगारेटस्' (लेखक-मनस्वीनी लता रविंद्र, दिग्दर्शक सतीश मनवर) या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

१३ जुलै : प्रभात चित्रमंडळाच्या सहकार्याने मान्यवर दिग्दर्शकांचे लघुपट दाखविण्यात आले.

१७ जुलै : प्रभात चित्रमंडळाच्या सहकार्याने संस्कार दिग्दर्शक पट्टीभिराम रेड्डी हा कन्नड चित्रपट दाखविण्यात आला.

१८ जुलै : भीमसेन जोशी अध्यासन ललित कला केंद्र,पुणे विद्यापीठ सौ.मृणाल नाटेकर-भिडे यांचे गायन आयोजित करण्यात आले होते.

२९ जुलै : ललित थिएटर्स, मुंबई निर्मित सहकार्याने 'बार बार' (लेखक-दिग्दर्शक सतीश मनवर) या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

९ ऑगस्ट : भीमसेन जोशी अध्यासन ललित कला केंद्र,पुणे विद्यापीठ विश्वजीत बोरवणकर यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

१० ऑगस्ट : प्रभात चित्रमंडळाच्या सहकार्याने 'ट्रेन टू पाकिस्तान' (दिग्दर्शक पामेला रूक्स) हा हिंदी चित्रपट दाखविण्यात आला.

१७ ऑगस्ट : प्रभात चित्रमंडळाच्या सहकार्याने सत्यजित रॉय दिग्दर्शक 'गणशत्रू' बंगाली चित्रपट दाखविण्यात आला.

२३ ऑगस्ट : सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्स सहयोगाने पावसाची गाणी हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

२४ ऑगस्ट : रंगस्वरच्या वतीने राधिका पेंडसे यांचे कथ्थकनृत्य आयोजित करण्यात आले होते.

४ सप्टेंबर : रंगस्वरच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त 'गणराज रंगी नाचतो' हा अभंग भक्तिगीतांचा श्रवणीय कार्यक्रम करण्यात आला.

१२ सप्टेंबर : प्रभात चित्रमंडळाच्या सहकार्याने मार्को पोन्टी दिग्दर्शित 'सॅन्टा मॅरेडोना' हा इटालियन चित्रपट दाखविण्यात आला.

१३ सप्टेंबर : ओमकार एन्टरटेन्मेंटच्या सहकार्याने संजय सूरकर दिग्दर्शित मराठी चित्रपट 'आई शप्पथ' दाखविण्यात आला.

२२ सप्टेंबर : इनर कोर्ट यार्ड सहकार्याने पंडित रतन मोहन शर्मा यांचे गायन आयोजित करण्यात आले होते.

२५ सप्टेंबर : रंगस्वर आय.एन.टी आयोजित कै. प्रविण जोशी आंतरमहाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धा २००६ संपन्न झाली.

२६ सप्टेंबर : भीमसेन जोशी अध्यासन ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ सहकार्याने श्रीमती शीला जोशी यांचे गायन आयोजित करण्यात आले होते.

२७ सप्टेंबर : प्रभात चित्रमंडळाच्या सहकार्याने अ सॅन्ट्री बिना दिग्दर्शक 'माय ब्रदर इन लॉ' हा इटालियन चित्रपट दाखविण्यात आला.

२९ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर : रुद्रवीणा तपस्वी उस्ताद झीया मोहिउद्दीन डागर यांच्या स्मरणार्थ 'ध्रुपद महोत्सव' संपन्न झाला.

११ ऑक्टोबर : स्वर्गीय एस. डी. बर्मन यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने बर्मनदांच्या अमर संगीताचा श्रवणीय कार्यक्रम 'बर्मनदांची गाणी' हा सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रधार श्री. सुरेश चांदवणकर यांनी केले.

१३ ऑक्टो ते १९ ऑक्टो : या कालावधीत रंगस्वर व प्रभात चित्र मंडळ आणि एशियन फिल्म फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नाने पांचवा आशियाई चित्रपट महोत्सव साकार झाला. या सात दिवसांच्या चित्रपट महोत्सवात ७२ चित्रपट दाखविण्यात आले. या चित्रपट महोत्सवात एशियन फिल्म कल्चर पुरस्कार, सत्यजित रॉय स्मृति पुरस्कार, स्पेक्ट्रम आशिया, सेंट्रल एशियन सिनेमा, फोकस ऑन म्यानमार, फोकस ऑन रिजनल सिनेमा, इंडियन व्हिस्टा अशाप्रकारचे कार्यक्रम करण्यात आले.

रंगस्वर व सूरप्रभाततर्फे दीपावलीचा आनंद द्विगुणित करण्याकरिता दीपावली पहाट कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमात भुवनेश कोमकली गायन आणि जयतीर्थ मेवुंडी यांच्या गायनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती रेखा नार्वेकर यांनी केले.

५ नोव्हेंबर : रंगस्वर-सृजन आयोजित मातीकाम (Pottery) कार्यशाळेत स्वाती गांगल आणि सहकारी यांनी विद्यार्थ्यांना मातीकामाद्वारे सृजनशक्तीचा आविष्कार घडविण्याची कार्यशाळा घेण्यात आली.

८ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, ललित कला केंद्र, गुरुकुल, पुणे विद्यापीठ, सर रतन टाटा ट्रस्ट यांच्या सहकार्याने 'नाट्य महोत्सव'(Natya Mahotsav) आयोजित करण्यात आला. तसेच चौरंग, मुंबई निर्मित 'पालखी' लेखक-सुबोध खानोलकर, इरावती कर्णिक, दिग्दर्शक अद्वैत दादरकर यांच्या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

९ नोव्हेंबर : अपर्णा,मुंबई निर्मित 'कॅप्टन ५६ पॉलिस्टर ८४' (लेखक रामू रामनाथन, चेतन दातार, दिग्दर्शक सुनील शानबाग) या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

१० नोव्हेंबर : ललित कला केंद्र, गुरुकुल,पुणे विद्यापीठ निर्मित '......वारले आहेत' (लेखक टॉम स्टॉपर्ड, इरावती कर्णिक,दिग्दर्शक सतीश मनवर) या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

११ नोव्हेंबर : भरतनाट्यम् मंदिर पुणे निर्मित 'संगीत शारदा' (लेखक गो. ब. देवल, दिग्दर्शक डॉ. राम साठे) हा प्रयोग संपन्न झाला.

१४ नोव्हेंबर : प्रभात चित्रमंडळाच्या सहकार्याने 'वन हंड्रेड स्टेप्स' (दिग्दर्शक मर्को तुलिओ) व 'माय ब्रदर इन लॉ' दिग्दर्शक अलॅसॅन्ड्रो पिवा हे चित्रपट दाखविण्यात आले.

१७ नोव्हेंबर रंगस्वरच्या 'फिर तेरी कहानी याद आयी...' ही नौशाद अलींना गीतांजली अर्पीत केली. सुप्रसिध्द संगीतकार नौशाद यांना त्यांनीच संगीतबध्द केलेल्या रागदारीतील सर्वश्रेष्ठ गीतांची आदरांजली देण्यात आली.

१८ नोव्हेंबर : पंचम निषाद रंगस्वरच्या वतीने 'सुरभि' हा शास्त्रीय संगीतावर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये कला रामनाथ यांचे व्हायोलिन वादन तर गुंडेचा ब्रदर्स यांच्या ध्रुपद गायनाचा कार्यक्रम झाला.

२१ नोव्हेंबर : प्रभात चित्रमंडळाच्या सहकार्याने 'अॅबोना' (दिग्दर्शक सहमत सालेह हरुन) तसेच 'द प्राइस ऑफ फरगिव्हनेस' (दिग्दर्शक मल्सूर वादे) हा चित्रपट दाखविण्यात आला.

५ जानेवारी ०७ : Inner Courtyard आणि रंगस्वर आयोजित 'भारत जाज्यम्' (Bharat Jazzam) हा कार्यक्रम घेण्यात आला. नमिता बोदाजी आणि संस्कार अॅकेडमी यांनी हा कार्यक्रम सादर केला.

७ जानेवारी : सृजन आयोजित लहान मुलांसाठी 'कागदी शिल्प' (Paper Craft) हा कार्यक्रम श्री.विवेक तेटविलकर यांनी घेतला.

९ जानेवारी : भीमसेन जोशी अध्यासन व ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ आणि रंगस्वर आयोजित निनाद बाकरे यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला.




यशवंतराव चव्हाण कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक मा.श्री.नां.धों.महानोर यांच्या हस्ते स्वीकारतांना मा.श्री.भवरलाल जैन सोबत कार्याध्यक्ष मा.श्री.अरुण गुजराथी.



यशवंतराव चव्हाण यांच्या ९४ व्या जयंती कार्यक्रमास मा.श्रीमती प्रतिभाताई पाटील,राज्यपाल,राजस्थान प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहिल्या त्यांचे स्वागत करतांना कार्याध्यक्ष मा.श्री.अरुण गुजराथी.




मा.श्रीमती सुधा मूर्ति मा.श्री.नारायण मूर्ति यांना देण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २००६ च्या सन्मानपत्राचे वाचन करताना विश्वस्त मा. सौ. सुप्रिया सुळे, सोबत कार्याध्यक्ष मा.श्री.अरुण गुजराथी, सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश मा.वाय.व्ही.चंद्रचूड, मा.श्रीमती सुधा मूर्ति, मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील, राज्यपाल, राजस्थान, अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री मा.श्री.शरदराव पवार, मा.श्री.नारायण मूर्ति, उपाध्यक्ष मा.श्री.हुसेन दलवाई व सरचिटणीस मा.श्री.शरद काळे.




प्रतिष्ठानने प्रकाशित केलेल्या 'न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा' पुस्तकाचे प्रकाशन करताना केंद्रीय कृषीमंत्री, मा. श्री. शरदराव पवार, सोबत मा.श्रीमती प्रतिभाताई पाटील, राज्यपाल,राजस्थान, मा.श्री.नारायण मूर्ति.



यशवंतराव चव्हाण ई बुक सीडीचे प्रकाशन करताना डावीकडून मा. श्री. नां. धों. महानोर, मा. श्री. अरुण गुजराथी, कार्याध्यक्ष, मा. श्री. भवरलाल जैन.




विभागीय केंद्र,पुणे यांच्या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा.श्री.ज्ञानेश्वर खैरे, मा.श्री.शांतीलाल सुरतवाला, मा.श्री.अंकुशराव काकडे, श्रीमती शैला लिमये व इतर.



विभागीय केंद्र,कराड यांच्या वतीने आयोजित केलेल्या सूर्यमालेतील सृष्टी चमत्कार या विज्ञानविषयक व्याख्यानाचे उद्‌घाटन करताना मा. श्री. पी. डी.पाटील, सोबत मा. श्री. विलासराव पाटील, मा. खासदार श्रीनिवास पाटील, श्री.मोहन आपटे व इतर.



विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने आदरणीय देशभक्त श्री. रा. कृ. पाटील यांना महाराष्ट्र भूषण सन्मान जाहीर झाल्याबद्दल त्यांच्या निवासस्थानी जाऊन आनंद व्यक्त करताना केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. गिरीश गांधी व इतर.




विभागीय केंद्र,लातूर यांच्या वतीने मा.चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाच्यावेळी केंद्राचे अध्यक्ष मा. डॉ. जनार्दन वाघमारे, सचिव, श्री. हरिभाऊ जवळगे व इतर.



कृषी व सहकार व्यासपीठाने आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थित असलेले डावीकडून प्रो. इलू मलाई, श्री. एस. टी. भिडे, मा.श्री.शिवाजीराव गि. पाटील, मा. डॉ. मोहन धारिया, मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे व प्रा. पंडीत.

११ जानेवारी : साईसाक्षी निर्मित अनामिका प्रकाशित 'खेळ मांडियेला' लेखक-दिग्दर्शक चेतन दातार यांच्या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

१७ जानेवारी : अथर्व निर्मित चंद्रवलय प्रकाशित 'लूज कंट्रोल' या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला. लेखक हेमंत ढोमे, दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी.

२२ जानेवारी : रंगस्वर आणि प्रभात चित्र मंडळ यांच्या सहकार्याने 'इफ बाय चान्स' (दिग्दर्शक ॲलसन्ड्रो डी अल्ट्री) तसेच 'आय एम नॉट स्केअर्ड' दिग्दर्शक ग्रॅब्रिल सलवेटोरस हे चित्रपट दाखविण्यात आले.

३० जानेवारी : रंगस्वर आणि प्रभात चित्र मंडळ यांच्या सहकार्याने 'एक संध्याकाळ लघुपटासोबत' (An Evening with short films) हा कार्यक्रम घेण्यात आला.

### उ) सृजन :

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर या विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाकरता सृजन अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सृजनच्या माध्यमातून समाजातील मान्यवर व्यक्तींच्या सर्जनशीलतेचा आविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना आणि संयोजन मा. श्रीमती सुप्रिया सुळे यांची असून यामध्ये सन्माननीय सल्लागार म्हणून सुप्रसिद्ध चित्रकार श्री.डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग हे काम पाहतात. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सृजन कार्यशाळा सकाळी ९.०० वाजता चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात येते. श्री. विद्याधर खंडे,समन्वयक म्हणून त्यांना सहाय्य करतात.

जून २००६ मध्ये श्री. शुभानंद जोग, सर जे.जे.कला महाविद्यालय यांनी मुलांना भेटकार्ड यासंदर्भात मुलांची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेमध्ये वेगवेगळ्या वस्तूंच्या सहाय्याने भेटकार्ड कशी बनवायची हे शिकविण्यात आले.

जुलै २००६ मध्ये मा. डॉ. कामाक्षी भाटे,असोसिएट प्रो. के. ई. एम. हॉस्पिटल यांनी मुलांकरता शारीरिक आणि आरोग्य शिक्षण याविषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेमध्ये मुलांना होणारे 'पावसाळ्यातील विविध आजार व मुलांच्या वाढीच्या समस्या' या विषयावर चर्चात्मक माहिती दिली. त्याचबरोबर पोस्टाच्या सहकार्याने भित्तीपत्रके यांच्या सहकार्याने आपला विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगितला.

ऑगस्ट २००६ मध्ये श्री. अरुण नाईक यांनी 'अस्तित्व' या संस्थेमार्फत मुलांच्या मानसिक आरोग्यावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये मानसिक ताण-तणाव पालक, शिक्षक, विद्यार्थी व मुले यांच्या परस्पर नाते संबंधात छोट्या छोट्या गोष्टींद्वारे मुलांना माहिती दिली. परीक्षेच्या दृष्टिकोनातून सोप्या व कठिण विषयांचा अभ्यास कसा करावा हे समजावून सांगितले.

सप्टेंबर २००६ मध्ये कार्टूनिस्ट श्री. विवेक प्रभु-केळुस्कर यांनी विविध प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या व मानवांच्या भावमुद्रांचे व्यंगात्मक चित्रण करुन मुलांना ते कसे करता येईल, ते कसे ओळखायचे याचे मार्गदर्शन केले. मुलांनी या कार्यशाळेमध्ये मानवी चेहऱ्यावरचे विविध भावांचे निरीक्षण करुन चित्र रेखाटण्याची माहिती समजावून घेतली.

ऑक्टोबर २००६ मध्ये मुंबई अग्निशमन दलाचे (फायरब्रिगेडचे) ADFO श्री. सुधीर अमीन यांनी आग प्रतिबंधक कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेकरिता सृजनच्या विद्यार्थ्यांनी फोर्ट फायरब्रिगेडच्या स्टेशनला भेट दिली. या कार्यशाळेमध्ये फायरब्रिगेडला फोन आल्यानंतर वेगवेगळ्या लाईटच्या सहाय्याने प्रत्येक गाडी सर्व तयारीनिशी दोन तीन मिनिटात फायर स्टेशनच्या बाहेर पडते व तातडीने घटनास्थळी पोहचून मदत कार्यास सुरुवात करतात. आगीच्या प्रसंगी उद्‌भवणाऱ्या वेगवेगळ्या घटनांची प्रात्यक्षिके दाखविली. त्यामध्ये ॲम्ब्युलन्स सेवा, प्राण्याची सुटका, आगीचे विविध प्रकार व त्यावर प्रतिबंध करण्याचे प्रकार इत्यादि माहिती देण्यात आली.

नोव्हेंबर २००६ मध्ये सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌च्या श्रीमती स्वाती गांगण आणि सहकाऱ्यांनी मुलांना मातीकाम विषयी माहिती दिली. यामध्ये मुलांनी मातीचे विविध आकाराचे मुखवटे तयार केले व नंतर चाकाच्या सहाय्याने पणती तसेच इतर भांडी बनवली.

डिसेंबर २००६ मध्ये सृजन 'जानेवारी ०६ ते डिसेंबर ०६'च्या कार्यकामाची सांगता ३ डिसेंबर ०६ रोजी करण्यात आली या सांगता कार्यक्रमात शिरोडकर हायस्कूल,परळ येथील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील आणि देशातील लोकप्रिय लोकगीत, लोकनृत्य इत्यादि सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश होता. या कार्यक्रमात सृजनच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात संपादन केलेल्या यशाबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.

मुलांमध्ये लोकप्रिय असलेल्या सृजनच्या चौथ्या वर्षाच्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन ७ जानेवारी २००७ रोजी करण्यात आले. या दिवशी कागदातून शिल्पकला या विषयावर सृजनची कार्यशाळा घेण्यात आली. उद्‌घाटनाच्या सत्रात श्री. विवेक तेटविलकर यांनी कागदांचे विविध वस्तू बनविण्याचे मुलांना शिकविले.

जानेवारी ०७ मध्ये शिशुवर्ग ते इयत्ता दुसरी या विद्यार्थ्यांसाठी श्री. श्रीनिवास हे काम करतात. यामध्ये मुलांना गाणी, गोष्टी इत्यादि प्रकार शिकविले जातात. श्री. वाडकर यांनी मुलांना रायगड किल्ल्यातील पक्षांचे विविध आवाज व त्यांची वर्णने सांगितली.

फेब्रुवारी ०७ मध्ये श्री. शुभानंद जोग यांनी सुलेखनाची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेमध्ये मुलांना अक्षरांचे विविध प्रकार, आकार आणि स्वरूप यांची माहिती दिली.

या कार्यशाळेकरिता कल्याण, डोंबिवली, वसई, विरार आणि नवी मुंबई, पनवेल येथून सुमारे ३०० ते ४०० विद्यार्थ्यांची उपस्थिती असते.

जानेवारी ते डिसेंबर या कॅलेंडरी वर्षात सृजनची कार्यशाळा आयोजित केली जाते.

मार्च ते मे या तीन महिन्यात विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या काळात कार्यशाळा बंद असते. जून महिन्याच्या पहिल्या रविवारी सृजनच्या कार्यशाळेला सुरुवात होते.

**१०. प्रतिष्ठानची विभागीय केंद्रे**

**१) विभागीय केंद्र, पुणे :**

पालखी सोहळा (दि. २१ जून ०६) : प्रतिवर्षीप्रमाणे पुणे केंद्राच्या वतीने वारकरी बंधु भगिनींना एकादशीनिमित्त साबुदाणा खिचडी व स्पेशल चहा वाटप, तिरंगा भवन येथे श्री. शांतीलाल सुरतवाला यांचेकडून आयोजित करणेत आले. सदर कार्यक्रमास लायन्स क्लब, पुणे हिलटॉपचे सहकार्य प्राप्त झाले होते.

वृत्तपत्र पदविका : सदर अभ्यासक्रमात पुणे विद्यापीठामध्ये श्रीमती अनघा सावंत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. त्यांना पुणे विद्यापीठ वृत्तपत्रविद्या पदविका परीक्षेत चालू घडामोडी या विषयांत विशेष प्राविण्याबद्दल तसेच कै.वरुण भिडे स्मृतिदिनानिमित्त सहा स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक प्रदान करण्यात आली. सदर कार्यक्रमास सर्वश्री,अंकुश काकडे, शांतीलाल सुरतवाला, प्रा. पंडीत उपस्थित होते.

दिवाळी पहाट : या कार्यक्रमास अंदाजे चार ते पांच हजार प्रेक्षक हजर होते. श्री.दिलीप गायकवाड यांचे सनईवादन श्री.राजू जावळकर यांचे तबलावादन त्याचप्रमाणे उत्कृष्ठ असे भरतनाट्यम् व गाणी असे करमणूकीचे कार्यक्रम त्यांत आयोजित करण्यात आले होते. प्रतिष्ठानतर्फे यंदा प्रथमच दिलेला दिवाळी पहाट पुरस्कार आकाशवाणीच्या 'विविध भारती' विभागाला देण्यात आला. हा पुरस्कार सौ.भारती रूस्तम गोखले यांनी स्वीकारला. पुरस्कार वितरण शिवशाहीर श्री.बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाले.

बालनाट्य महोत्सव : प्रतिष्ठानतर्फे बालकलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी बालनाट्य महोत्सव भरतनाट्य मंदिरात आयोजित करण्यात आला होता. श्रीमती स्वाती उपाध्ये यांनी सहयाद्री सभागृहात एक महिना प्रशिक्षणवर्ग घेऊन त्यांची तयारी केली होती. या महोत्सवात फुलण्यात मौज आहे, आजोबांची गोष्ट, संजीवनी, फंटुश असे नाट्यप्रयोग आयोजित केले होते.

खासदार सौ. सुप्रिया सुळे यांनी नागालँडमधील कलाकारांचा एक कार्यक्रम पुणे येथे आयोजित केला होता. त्यात पुणे केंद्रातर्फे मा. श्री. अंकुश काकडे, मा. श्री. शांतीलाल सुरतवाला व मा. श्री. ज्ञानेश्वरबापू खैरे यांनी सक्रिय सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

**अ) नवमहाराष्ट्र युवा अभियान, पुणे :**

नवमहाराष्ट्र युवा अभियान,पुणे यांचे काम श्री. भैयासाहेब खैरे, समन्वयक, पुणे विभाग आणि श्री.विलास लोंढे,संघटक हे पाहतात. या विभागातर्फे सावित्रीबाई फुले जयंती, शिवणवर्ग प्रमाणपत्र वाटप व स्वयंरोजगार माहिती कार्यक्रम तिळगुळ समारंभनिमित्त कायदेविषयक माहिती असे कार्यक्रम घेण्यात आले. तसेच खानापूर पुणे येथे युवतींचे दोन दिवसांचे शिबीर आयोजित करण्यात आले होते. खराडी, ता.हवेली येथे बालदिन महोत्सव, व 'धर्मनिरपेक्षता व शिक्षकांची भूमिका' यावर कार्यशाळा पुणे येथे सहयाद्री सभागृहात आयोजित केली. श्री. भैयासाहेब खैरे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. बोपोडी पुणे येथे श्री. भैयासाहेब खैरे यांचे अध्यक्षतेखाली महिला सक्षमीकरण कार्यक्रम घेण्यात आला. कोंढवा येथे युवकांसाठी उद्योजकता मेळावा भरविण्यात आला होता. कै. चव्हाणसाहेब यांचे पुण्यतिथीनिमित्त दि. २५ नोव्हेंबर २००६ रोजी सहयाद्री सभागृहात पंचायत राज प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला मा. ना. श्री. अजितदादा पवार हजर होते. त्यांनी

कै.चव्हाणसाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार घातला. श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक शाळेत मुलींसाठी लैंगिक शिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. श्रीमती रंजना गायकवाड, समन्वयक, महिला व बालकल्याण, सहाय्यक कक्ष, पोलीस अधीक्षक कार्यालय,पाषाण यांनी माहिती दिली.

मौजे गराडे, ता. पुरंदर येथे एन. एस. एस.च्या कॉलेज विद्यार्थ्यांच्या कॅम्पचे उद्‌घाटन पुणे विभागाचे समन्वयक श्री. भैयासाहेब खैरे यांचे हस्ते झाले. मराठवाडा कॉलेज, पुणे व पूना कॉलेज, पुणे येथे 'मूल्यशिक्षण' या विषयावर संघटक, श्री. विलास लोंढे यांनी मार्गदर्शन केले.

**ब) विभागीय केंद्र, पुणे महिला व्यासपीठ :**

सदर केंद्राचे कामकाज मा.श्री.बापूसाहेब खैरे यांचे मार्गदर्शनानुसार व मुंबईहून आलेल्या सूचनांनुसार चालते. श्रीमती शैला लिमये यांच्या नेतृत्वाखाली विविध प्रकारचे महिलांना उपयुक्त कार्यक्रम केले जातात. त्यात विभागीय केंद्राचे महिला व्यासपीठ व माझी मैत्रीण ट्रस्ट यांच्या समन्वयाने महिलांसाठी मा. श्री. बापूसाहेब खैरे यांचे अध्यक्षतेखाली नियमित सभा घेण्यात येतात. त्यात श्रीमती शैला लिमये आणि श्री. भिडे व प्रा. पंडीत रोजगारप्रधान कामकाजविषयक मार्गदर्शन करतात. त्यामुळे महिलांच्या उद्योजकतेस उत्तेजन मिळते व प्रत्यक्ष अर्थार्जन होते. प्रसंग विशेषी श्री. देशपांडे-स्वयंरोजगार केंद्र प्रमुख सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करतात.

पुणे जिल्ह्यातील सोमवाडी येथे उद्योगपती श्री. टाटा यांच्या साहाय्याने व्यासपीठाच्या वतीने बचत गटांचे चांगले काम चालते. तेथील कातकरी समाजात संयुक्त कार्य हाती घेण्याचे दृष्टीने त्यांचे विनंतीवरुन महिला व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी भेट देऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले व चर्चा केली. (दि. ५.४.०६)

म. फुले संग्रहालयात पुणे विभागातील बचतगटांच्या प्रतिनिधींचा मेळावा झाला. त्यात व्यासपीठाच्या प्रतिनिधींनी मार्गदर्शन केले व सहभाग घेतला.

'महिला अत्याचार' या विषयावर केंद्र शासनाने जो अधिनियम केला आहे त्याचा महिला वर्गात विशेष प्रसार होण्याचे दृष्टीने श्री.भिडे यांनी एक पुस्तिका तयार केली आहे.

**२) विभागीय केंद्र, कराड :**

ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्ग : विभागीय केंद्र,कराडद्वारा संचालित शिवाजी विद्यापीठ, प्रौढ आणि निरंतर शिक्षण केंद्र, कोल्हापूरच्या ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्गाचे उद्‌घाटन मा. आमदार बाळासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. अध्यक्षस्थानी विभागीय केंद्र, कराडचे सचिव, मा. श्री. मोहनराव कृष्णाजी डकरे होते. यावेळी ज्येष्ठ ग्रंथपाल श्री. पालेकरसर, सौ. उमराणी, सौ. कल्पना पाटील, प्रकल्प अधिकारी श्री. अनिल पाटील उपस्थित होते.

महाआरोग्य मेळावा : फेडरेशन ऑफ स्पोर्टस्, सर्व्हिस ॲण्ड कल्चर कराड, व विभागीय केंद्र,कराड, कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट,कराड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६.४.२००६ रोजी जागतिक आरोग्यदिनाचे औचित्य साधून महाआरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

येथील शिवाजी हायस्कूलमध्ये सकाळी ११.०० ते सायं.७.०० वाजेपर्यंत कराड शहरातील व आसपासच्या परिसरातील स्त्री/पुरुष नागरिकांनी या मेळाव्याचा उपयोग करुन घेतला. कराड शहरातील व कृष्णा वैद्यकीय ट्रस्टमधील ९० तज्ज्ञ डॉक्टरांसह, ४५ आरोग्यसेविका, ६० स्वयंसेवक व औषध विक्री प्रतिनिधींचे सहकार्य लाभले. सर्वसामान्य जनतेला महागडा औषधोपचार न परवडणारा असल्यामुळे महाआरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सर्व प्रकारच्या तपासण्या मोफत करण्यात आल्या.

महाआरोग्य मेळाव्यात बालरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, दंतरोग, कान-नाक-घसा विभाग, मानसोपचार विभाग, त्वचा विभाग, अस्थिरोग विभाग, हेल्थ विभाग, रक्तगट तपासणी, क्षयरोग विभाग, दमा विभाग, एच. आय. व्ही. तपासणी, त्याचबरोबर पोलिओ, बी. सी. जी. ट्रिपल, गोवर, टायफाईड आदिंचे लसीकरण करण्यात आले. जनरल विभागामध्ये सर्व प्रकारच्या तपासण्या करुन मोफत औषध वाटप करण्यात आली.

सृजन बालमहोत्सव कार्यशाळा : विभागीय केंद्र,कराड व नवमहाराष्ट्र युवा अभियान विभागीय केंद्र कराड व कृष्णा बालवाद्यवृंद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ व २४ एप्रिल २००६ या दोन दिवशी सृजन बालमहोत्सव कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सकाळी ९.०० ते सायं. ५.०० या वेळेत येथील विठामाता विद्यालय येथे ही कार्यशाळा संपन्न झाली. कराड शहर व परिसरातील इयत्ता १ली ते इयत्ता ९ वी वयोगटातील सुमारे १५० विद्यार्थी विद्यार्थिनींनी चित्रकला, सुलेखन, ओरिगामी व गायन याबाबतचे प्रशिक्षण घेतले. नवमहाराष्ट्र युवा अभियान

व कराड केंद्रांच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन केले.

कार्यशाळेचा समारोप यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबईच्या विश्वस्त मा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते दि.२४ एप्रिल २००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सौ. वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृहात झाला. त्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी गायनाचे सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. खासदार श्री. श्रीनिवास पाटील तर मा. आमदार बाळासाहेब पाटील, कृष्णा बालवाद्यवृंदाचे संकल्पक डॉ. सुरेश भोसले, सौ. उत्तरा भोसले, प्रतिष्ठानच्या कराड केंद्राचे सचिव, मा. मोहनराव डकरे, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे संयोजक, श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक, श्री. विश्वास ठाकूर,नाशिक आदिंची प्रमुख उपस्थिती होती. या मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे सांगता समारंभ झोकात झाला. नवमहाराष्ट्र युवा अभियानचे उपक्रम वाढविण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा विशेष महत्त्वाची ठरली. या कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी व शहरातील ज्येष्ठ व्यक्तीही उपस्थित होत्या.

सौ. वेणूताई चव्हाण जयंती : स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या दिवंगत पत्नी सौ. वेणूताई चव्हाण यांची २३ वी पुण्यतिथी जयंती विभागीय केंद्र,कराड व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने साजरी करण्यात आली.

सायं. ६.०० वाजता निश एन्टरटेटमेंट प्रस्तुत 'भैरव ते भैरवी' या गायन मैफिलीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन विभागीय केंद्र कराडचे सदस्य मा.श्री.पी.डी.पाटील, मा. श्री. विलासराव पाटील (वाठारकर) यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रतिष्ठानचे सचिव मा. श्री. डकरे, श्री. सुनील पवार, डॉ. ब्रम्हनाळकर इत्यादि मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास कराडकर रसिकांनी मोठी दाद दिली व कार्यक्रम संपन्न झाला.

स्वर्गीय चव्हाणसाहेबांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन : सौ. वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृहात स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, व सौ.वेणूताई चव्हाण यांच्या विविध कार्यक्रमाच्या वेळीचे फ्लॅशबॅक फोटो प्रदर्शन आयोजित केले जाते.

स्वर्गीय चव्हाणसाहेबांच्या विविध भावमुद्रा, मान्यवरांनी दिलेल्या भेटी, अभिप्राय, दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शनातून त्यांच्या कार्याची ओळख फ्लॅशबॅक प्रदर्शनातून लोकांच्यासमोर ठेवण्याचे कार्य विभागीय केंद्र कराड करीत असते. सतत वर्षभर या छायाचित्र प्रदर्शनाचे कामकाज चालू असते.

ग्रंथालय सहल व मार्गदर्शन कार्यशाळा : विभागीय केंद्र,कराडाद्वारा संचालित शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्ग २००६ मधील सर्व विद्यार्थ्यांची ग्रंथालय अभ्यास सहल कराडमधील नगरवाचनालय व कृष्णा वैद्यकीय महाविद्यालयास झाली. यावेळी विद्यार्थ्यांना नगरवाचनालयातील सुमारे दीडलाख ग्रंथांची मांडणी, वर्गवारी, ग्रंथालयाचे कामकाज इत्यादिंबाबत शास्त्रशुद्ध माहिती नगरवाचलनालयाचे ग्रंथपाल ए.जी.आमदमणे यांनी दिली. तसेच महाविद्यालयातील संदर्भ ग्रंथांची माहिती ग्रंथपाल श्री.श्रीधर कुलकर्णी यांनी दिली.

ग्रंथालय क्षेत्रात ज्यांनी खूप मोठी तपस्या केली अशा व्यक्तिंशी सुसंवाद साधता यावा. त्यांनी या क्षेत्रात केलेले कार्य, त्यांचे अनुभव व विद्यार्थ्यांच्यासमोर यावेत या दृष्टिकोनातून मा. श्री. अरविंद टिकेकर, मुंबई विद्यापीठाचे माजी ग्रंथपाल याची कार्यशाळा ग्रंथालय अभ्यासक्रमवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विभागीय केंद्र, कराडने आयोजित केली होती.

एलेमेंट्रीग्रेड व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा मार्गदर्शन व पूर्वपरीक्षा कार्यशाळा (दि. २०.७.२००६ ते २४.९.२००६) : लहान सृजनांचे सृजन हेच ध्येय. या ध्येयाची जाणीव ठेवून नव्या पिढीत चित्रकलेचा प्रसार विकास व्हावा या हेतूने विभागीय केंद्र, कराड व 'सृजनसृष्टी', कराड यांच्या संयुक्त विद्यमाने एलेमेंट्रीग्रेड व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा मार्गदर्शन व पूर्वपरीक्षा कार्यशाळा दि.२०.७.२००६ ते २४.९.२००६ अखेर सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या सभागृहात केली होती.

सौ. वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृहात प्रत्येक रविवारी सकाळी ८.०० ते ११.०० या वेळेत प्रशिक्षणवर्ग चालू असतो. कोणत्याही प्रकारचे शुल्क न घेता, कराडमधील सर्व शाळेतील एकूण सत्तेचाळीस (४७) विद्यार्थी चित्रकलेचे प्रशिक्षण घेत होते. यासाठी श्री.सतीश गायकवाड व श्री. विकास शेवाळे याशिवाय विविध तज्ज्ञ रंगकर्मीचे मार्गदर्शनपर व्याख्याने रंगशाळेच्या कार्यशाळेत घेण्यात आलेली होती.

मुलांना विविध निसर्ग, वस्तू, स्मरण, मुक्तहस्त, संकल्प, भूमिती आदि प्रकारातील चित्रांचे बारकाव्याने प्रशिक्षण देतात. चित्रकलेबरोबरच मुलांच्या सृजनशीलतेत भर पडावी यासाठी विविध उपक्रम प्रतिष्ठानच्या माध्यमातून मोफत राबविले जात असतात.

आजच्या गतिमान युगात चित्रकलेला अनन्य साधारण महत्त्व आहे. इतर कलाप्रमाणेच या कलेलाही स्थान मिळणे गरजेचे आहे. मात्र तसे न होता शाळा महाविद्यालयांतून या विषयाकडे दुर्लक्ष होत असताना जाणवते. विद्यार्थी प्राथमिक अवस्थेत असतानाच त्यांच्या अंगी चित्रकलेचे

बीज रोवले जावे, त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे व चित्रकलेचा प्रसार व विकास व्हावा या उद्देशाने विभागीय केंद्र, कराडने कार्यशाळेचे आयोजन केले आहे. अशा कार्यशाळांच्या माध्यमातून एलेमेंट्रीग्रेड व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेत विद्यार्थ्यांना यश मिळू शकते.

या कार्यशाळेतील यशस्वी चार विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण कराड कल्पक पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना विभागीय केंद्र कराडच्या वतीने सहभागाबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.

विभागीय केंद्र,कराड व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टमध्ये अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात देशाचा ५९ वा स्वातंत्र्यदिन प्रथमच संपन्न झाला. विभागीय केंद्र, कराडचे सचिव, मा. श्री. डकरे यांच्या शुभहस्ते विभागीय केंद्राच्या 'विरंगुळा' कार्यालयात व सौ.वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टमध्ये ध्वजारोहण संपन्न झाले व शिवाजी हायस्कूलच्या बँड पथकाने ध्वजवंदना दिली. याप्रसंगी ध्वजरोहणानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

तिर्थरुप विठामाता स्मृतिदिन : भारताचे उपपंतप्रधान स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या मातोश्री स्व.विठामाता यांच्या ४१ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जन्मगांवी देवराष्ट्रे, ता. कडेगांव, जि. सांगली येथील यशवंतराव हायस्कूल व कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,देवराष्ट्रे या ठिकाणी विभागीय केंद्र कराडच्या महिला व्यासपीठामार्फत दि. १८.८.२००६ रोजी आदरांजली वाहण्यात आली. प्रतिष्ठानच्या वतीने मोफत पुस्तके देण्यात आली. सेवानिवृत्त शिक्षकांच्या वतीने मुलामुलींना गणवेष वाटप करण्यात आले.

विज्ञान कार्यशाळा 'सूर्यमालेतील सृष्टी चमत्कार' प्रा. मोहन आपटे : सूर्यमालेतील एका ग्रहावर राहत असतो; परंतु त्याचेही पूर्ण ज्ञान आपल्याला नसते. सूर्यमालेतील सृष्टी चमत्कार हे अद्‌भुत आणि अगम्य असे आहेत, असे मत प्रा.मोहन आपटे यांनी व्यक्त केले.

विभागीय केंद्र कराडचे महिला व्यासपीठ व डॉ. कल्पना चावला विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'सूर्यमालेतील सृष्टी चमत्कार' या विषयावरील विज्ञानविषयक व्याख्यान व स्लाईड शो मध्ये ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते श्री. पी. डी. पाटील मा. श्री. विलासराव पाटील (वाठारकर), डॉ. रा. गो. प्रभुणे, डॉ. एस. व्ही उमर्जीकर, प्रा. शोभना रैनाक आदि उपस्थित होते. प्रा. आपटे म्हणाले की, गणिती भाषेत सूर्यमालेत 'सृष्टी चमत्कार' सांगायचा झाल्यास सूर्याचा व्यास × १०८ = सूर्य आणि पृथ्वीमधील अंतर त्याचपद्धतीने चंद्र व पृथ्वीवरील अंतर काढता येईल. १९ वर्षांनी पुन्हा त्याच दिवशी घडलेली घटना असते. १८ वर्षे ११ दिवसांनी आज घडलेली घटना पाहायला मिळते. खग्रास सूर्यग्रहण एक पर्वणी असते. ते भारतात २२ जुलै २००९ रोजी साडेसहा मिनिटे दिसणार आहे. १५ जानेवारी २०१० ला पुन्हा सूर्यग्रहण दिसणार आहे याचा लाभ घ्यावा.

सौ. शोभना रैनाक यांनी आपल्या प्रास्ताविकात प्रतिष्ठानचे विविध उपक्रमाची माहिती सांगितली. श्री.संजय पुजारी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी मतिमंद मुलांनी बनविलेले बुके देऊन उपस्थितांचे स्वागत रोबोच्या साह्याने करण्यात आले. विभागीय केंद्राचे सचिव श्री. डकरे यांनी सर्वांचे आभार मानले. कराडमधील सर्व विज्ञानप्रेमी, नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थिनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन स्मृतीदिन : भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा स्मृतिदिन विभागीय केंद्र कराडच्या वतीने सौ.वेणूताई चव्हाण संशोधन ग्रंथालयात संपन्न झाला. सांगलीच्या जिल्हा नगर वाचनालयाच्या माजी ग्रंथपाल सौ.अबोली उमरानी प्रमुख पाहुण्या यासमयी उपस्थित होत्या. विभागीय केंद्राचे सचिव व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे ग्रंथपाल, ग्रंथालयातील सर्व कर्मचारीवर्ग, वाचक, अभ्यासक या समयी उपस्थित होते.

डॉ. एस. आर.रंगनाथन यांना आदरांजली वाहताना सौ.उमरानी म्हणाल्या, ग्रंथालयीन क्षेत्रात भारताचे नांव उज्ज्वल करण्याचा मान त्यांना लाभला. एक गणिततज्ज्ञ असूनही ग्रंथपालनाच्या क्षेत्रात आदर्श काम केले. त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन आदरांजली वाहण्यात आली. यावेळी ग्रंथालयीन क्षेत्रातील विविध मान्यवर ग्रंथप्रेमी वाचक बहुसंख्येने उपस्थित होते.

ग्रंथालय व्यवस्थापन परीक्षेत प्रतिष्ठानच्या कराड केंद्राचे सुयश : कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य योजनेतंर्गत एप्रिल ०६ ते जून ०६ अखेर घेण्यात आलेल्या ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम परीक्षेमध्ये कराड विभागीय केंद्राचा निकाल ९९ टक्के लागला. यामध्ये प्रथम क्रमांक कु. आमणे गीतल अमित (७०.७१), द्वितीय क्रमांक, कु.शर्मा सूरज गणेशमल (६८.८५), तृतीय क्रमांक सौ. तावरे रुपाली गोकुळ (६६.८५) यांनी पटकावला. कराड केंद्रामार्फत एकूण ३४ विद्यार्थी परीक्षेस बसले होते, त्यापैकी २१ विद्यार्थी प्रथमश्रेणी व १२ विद्यार्थी द्वितीयश्रेणीत पास झाले.

महात्मा गांधी जयंती : भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे जनक, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा २ ऑक्टोबर जन्मदिन स्वर्गीय चव्हाणसाहेबांच्या विरंगुळा बंगल्यात विभागीय केंद्र कराडच्या कार्यालयामध्ये महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजन करुन जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी स्वर्गीय चव्हाणसाहेबांच्या ग्रंथसंग्रहामध्ये महात्मा गांधीजीविषयी असणाऱ्या विविध ग्रंथांचे, त्यांच्या दुर्मिळ मौल्यवान असणाऱ्या ६० छायाचित्रांचे तसेच त्यांच्या विविध संदेशाचे प्रदर्शन भरविण्यात आले. विविध मान्यवर व लोकांनी या दुर्मिळ प्रदर्शनाचा आस्वाद घेतला. श्रीशिवाजी हायस्कूल व विठामाता विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींनी या प्रदर्शनाचा आस्वाद घेतला.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण स्मृतिदिन : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांचा २५ नोव्हेंबर २००६ हा स्मृतीदिन विभागीय केंद्र, कराड व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्यालयात संपन्न झाला. यावेळी विविध मान्यवरांनी स्वर्गीय चव्हाणसाहेबांच्या समाधीवर, व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टमधील सौ.वेणूताई चव्हाण व मा.यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. विलासराव देशमुख, मा. ना. दिलीप वळसे-पाटील, मा. ना. श्री. रामराजे निंबाळकर, मा. ना. श्री. पतंगराव कदम, मा. श्री. पी. डी. पाटील, मा. खासदार श्री. श्रीनिवास पाटील, मा. श्री. कल्लाप्पाआण्णा आवाडे, मा. श्री. अशोक चव्हाण, मा. श्री. सुनील पवार, मा. आमदार बाळासाहेब पाटील, मा. श्री. विलासराव पाटील (वाठारकर), मा. श्री. प्रकाशराव आवाडे, मा. श्री. विलासराव पाटील (उंडाळकर) विविध मान्यवर व कराडमधील आसपासच्या परिसरातील लोकांनी समाधीवर, विरंगुळा बंगला, सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टला भेट देऊन आदरांजली वाहिली. यावेळी विरंगुळा बंगल्यात स्वर्गीय चव्हाणसाहेबांच्या भाषणांच्या कॅसेट भेट देणाऱ्या लोकांना ऐकण्यासाठी लावण्यात आल्या होत्या.

स्व. यशवंतराव चव्हाण यांची ९४ वी जयंती विविध उपक्रमास मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. १२ मार्च २००७ ला सकाळी ८.०० वाजता स्व. यशवंतरावजी चव्हाणसाहेबांच्या भव्य प्रतिमेची चारचाकी चांदीने मढविलेल्या बग्गीतून सवाद्य मिरवणूक सौ. वेणूताई चव्हाण स्मृतिसदनापासून विरंगुळा बंगलामार्गे कराड शहरातील प्रमुख रस्त्यावरुन प्रीतिसंगमावरील मा. यशवंतरावजी चव्हाणसाहेबांच्या समाधी स्थळापर्यंत नेण्यात आली. विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने ट्रस्ट व विभागीय केंद्र कराड कार्यालयासमोर स्व. चव्हाणसाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी सायन्स कॉलेजचे प्राचार्य मा. एस. ए. पाटील, सौ. वेणूताई चव्हाण कॉलेजचे प्राचार्य मा. बी. एन. कालेकर, श्री. शंकर आप्पा सौसुंदी सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक शिक्षकेत्तर, कॉलेजचे कर्मचारी, विद्यार्थी, विभागीय केंद्र कराडचे व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व मान्यवर, पदाधिकारी, कर्मचारी मिरवणुकीत सहभागी होते.

प्रीतिसंगमावरील समाधीस्थळी आदरणीय श्री. पी. डी. पाटील गौरव प्रतिष्ठानच्या वतीने सकाळी ८.०० वाजता १२००० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शब्दसूरांची भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी 'यशवंत गौरव गीत' गाण्यात आले.

सौ. वेणूताई स्मृतिसदनातील सौ. वेणूताई चव्हाण व स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या पुतळ्यास मा. आमदार श्री. बाळासाहेब पाटील, नगराध्यक्षा सौ. सुषमाताई लोखंडे यांनी पुष्पहार अर्पण केले. 'विरंगुळा' बंगल्यातील मा. चव्हाणसाहेबांच्या प्रतिमेस मा. आमदारसाहेबांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली.

सायं. ७.०० वाजता विभागीय केंद्र कराड आणि दैनिक प्रीतिसंगम यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण यांच्या ९४ व्या जयंती निमित्त आदरणीय स्थितप्रज्ञ पी. डी. पाटीलसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली ख्यातनाम व्याखाते प्रा.नितीन बानगुडे (पाटील) यांचे यशवंतरावजींच्या जीवनावर अत्यंत ह्दयस्पर्शी व्याख्यान झाले. फार मोठा परिणाम श्रोत्यांच्या मनावर झाला. या कार्यक्रमासाठी उपनगराध्यक्ष मा.अल्ताफ शिकलगार, दैनिक प्रीतिसंगमचे संपादक श्री. शशीकांत पाटील, प्रा.प्रमोद सुकरे उपस्थित होते. मा.मुकुंदराव कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सर्व मान्यवरांचे स्वागत विभागीय केंद्र कराडचे सचिव यांनी केले. मोठ्या प्रमाणात श्रोत्यांची उपस्थिती होती.

कराड शहरातील हुतात्मा स्मारक, सहकारी संस्था, बँका, महाविद्यालये यामध्येही जयंती सोहळा चांगल्याप्रकारे आयोजित केला होता. विभागीय केंद्र कराड आणि सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या कर्मचाऱ्यांचा सर्व कार्यक्रमात सहभाग होता.

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन : सौ. वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृहात स्व.यशवंतराव चव्हाण यांचे निवडक फोटो, सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व विभागीय केंद्र कराड यांनी विविध कार्यक्रमांचे फ्लॅश बॅक फोटो प्रदर्शन आयोजित केले जाते.

स्व.चव्हाणसाहेबांच्या विविध भावमुद्रा, मान्यवरांनी दिलेल्या भेटी, त्यांचे अभिप्राय, दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन, त्यांची मानपत्रे, ग्रंथ, त्यांच्यावर लिहिलेली निवडक २००० काव्ये, इत्यादिंचे सातत्याने प्रदर्शन घेऊन त्यांच्या कार्याची ओळख फ्लॅश बॅक फोटो प्रदर्शनातून लोकांच्या समोर ठेवण्याचे कार्य विभागीय केंद्र कराड करत असते. मा. चव्हाणसाहेबांची निवडक १००० छायाचित्रे सतत आठवड्यातून

बदलून वर्षभर या छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे कामकाज चालू असते.

मान्यवरांच्या भेटी : यशवंत विचारांनी पुनित झालेल्या सौ.वेणूताईंच्या स्मृतींनी सुगंधीत झालेल्या विरंगुळा केंद्र यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व सौ. वेणूताई चव्हाण स्मृतीमंदिराला देशभरातून व महाराष्ट्रातून विविध मान्यवर, शाळा, संस्था, संघटना भेट देत असतात. एप्रिल २००६ ते मार्च २००७ अखेर ७३ मान्यवरांनी भेटी दिल्या.

बालचित्रपट महोत्सव : 'मुले ही देवाघरची फुले' वंदनीय साने गुरुजींनी लिहिलेल्या 'श्यामची आई' या कथेवर सिद्धहस्त नाटककार, कवी, पत्रकार, सर्वमान्य नेता, विनोदसम्राट आचार्य प्र. के. अत्रे यांनी काढलेल्या सिनेमाला सुसंस्कार होण्यासाठी अनेक चित्रपट व बोधपट सर्व भाषेतून उपलब्ध आहेत. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार बालकांच्या मनावर त्यांना आवडणाऱ्या चित्रपटाच्या माध्यमातून होत असतात. यासाठी भारत सरकारच्या क्षेत्रीय प्रचार कार्यालय सूचना व प्रसारण मंत्रालय,दिल्ली यांच्या विभागीय कार्यालयाचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी श्री. पी. फणिकुमार यांच्या सहकार्याने कराडातील विठामाता विद्यालय, श्री. शिवाजी हायस्कूल, अर्धनिवासी निवासी गुरुकूल शाळा, जनता इंग्लिश मिडियम स्कूलच्या सुमारे २५० मुलांना दोन दिवस चार बालचित्रपट दाखविण्यात आले. चार शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि बाल चमुनी मोठा प्रतिसाद दिला. विभागीय कार्यालयाच्या महिला व्यासपीठामार्फत हा उपक्रम मोठ्या आनंदमय उत्साही वातावरणात पार पडला, सातत्याने हे कार्यक्रम पार पाडावयाचा निर्धार महिला व्यासपीठाने केला आहे. नुकतेच सातारा येथील भारत शासनाच्या सूचना और प्रसारण मंत्रालयाच्या विभागीय कार्यालयाचे पुण्याला स्थलांतर झाले. तरीही कार्यालयीन प्रमुख श्री. पी. फणिकुमार यांनी सहकार्याचे आश्वासन दिले आहे. विभागीय केंद्र कराडच्या महिला व्यासपीठामार्फत ग्रामीण भागातही हा कार्यक्रम राबविण्याचा संकल्प आम्ही केला आहे. श्यामची आई, सेनानी सानेगुरुजी, छोटा शिपाई हे चित्रपट दाखविण्यात आले. चित्रपट महोत्सवाला मोठ्या प्रतिसाद लाभला.

'मी सावित्री बोलते' : दिनांक ३/०१/२००७ रोजी सायंकाळी ६.०० वाजता विभागीय केंद्र कराड व बहुजन क्रांतीदल,कराड यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज मंदिर, कराड येथे प्रा.सौ.शोभना रैनाक यांचे 'मी सावित्री बोलतेय' हा एकपात्री प्रयोग व कु.शर्मिला शिंदे यांचे 'सावित्रीबाई फुले–त्या व कार्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते.

विज्ञान अभ्यासक्रमाचे पुणे येथील लेखक प्रा. डॉ. पंडित विद्यासागर यांनी कराड येथे बालवैज्ञानिकांशी संवाद साधला यावेळी मेंदू व संगणक यांची माहिती देण्यात येऊन स्लाईड शो दाखविण्यात आले. विभागीय केंद्र कराड आणि डॉ. कल्पना चावला विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सौ.वेणूताई चव्हाण स्मारक सांस्कृतिक सभागृहात हा कार्यक्रम झाला.

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिन : विभागीय केंद्र कराडच्या विरंगुळा बंगल्यात व सौ.वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात ५८ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. केंद्राचे सचिव यांच्या शुभहस्ते विरंगुळा कार्यालयात व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्यालयात ध्वजारोहण केले. यावेळी विविध संस्था, संघटनेचे प्रतिनिधी, मान्यवर, शिवाजी हायस्कूल, विठामाता हायस्कूल कराडचे विद्यार्थी, महिला व्यासपीठाचे सदस्य उपस्थित होते.

महिला बचत मेळावा-२६.१.२००७ : विभागीय केंद्र कराडचे महिला व्यासपीठ, परिवर्तन विचार मंच,पाटण आणि भाग्योदय महिला पतसंस्था वांझोळे यांचे संयुक्त विद्यमाने मौजे वांझोळे, ता-पाटण येथे आयोजित केलेल्या महिला मेळाव्याच्या प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा.सौ.शोभना रैनाक होत्या. अध्यक्षस्थानी सातारा जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती सौ. सुनंदा गुरव होत्या.

महिला आरक्षणाबाबत आपले विचार मांडतांना सौ. छायाताई पाटील म्हणाल्या की, आज ३३ टक्के आरक्षण मिळाले असले तरी त्याचा लाभ स्त्रियांना घेता येत नाही. सामाजिक, आर्थिक व बौद्धिक क्षेत्रातील सक्षम ज्ञान व आत्मविश्वासाशिवाय महिलांना आरक्षणाचा लाभ उठवता येणार नाही. केवळ कायदे करुन स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी कायदे हे साधन व स्त्री कल्याण हे साध्य अशी मानसिकता समाजात निर्माण झाली पाहिजे.

निबंध व वक्तृत्व स्पर्धा दि. १.२.२००७ : सौ. वेणूताई चव्हाण यांच्या जीवनाच्या विविध पैलूंवर, कार्यावर विचार मंथन व्हावे. यासाठी विभागीय केंद्र कराडच्या महिला व्यासपीठाच्या वतीने कराड शहरातील माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले.

निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे विषय १. सौ. वेणूताई एक समर्पित जीवन, २. यशवंतराव व सौ. वेणूताई सहजीवन, ३. सौ. वेणूताईंच्या आठवणी.

**स्पर्धेचा निकाल :**

**वक्तृत्व स्पर्धा :**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | कु. प्रियांका चंद्रकांत संकपाळ | विठामाता विद्यालय,कराड |
| द्वितीय क्रमांक | कु. सई विश्वास ताम्हनकर | विठामाता विद्यालय,कराड |
| तृतीय क्रमांक | कु. अक्षय अर्जुन पाटील | शिवाजी विद्यालय,कराड |
| उत्तेजनार्थ | कु. आदित्य भगवान डोबांळे | शिवाजी विद्यालय,कराड |

**निबंध स्पर्धा :**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | कु. पाटील प्रतिभा दिलीप | विठामाता विद्यालय,कराड |
| द्वितीय क्रमांक | कु. संकपाळ प्रियांका चंद्रकांत | विठामाता विद्यालय,कराड |
| तृतीय क्रमांक | कु. पाटणकर विद्या लहू | महाराष्ट्र हायस्कूल,कराड |
| उत्तेजनार्थ | कु. गायकवाड सुमीत सुनील | यशवंत हायस्कूल,कराड |

वरील सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, रोख रक्कम आणि 'सह्याद्रीचे वारे' व 'विरंगुळा' हे ग्रंथ बक्षीस म्हणून देण्यात आले. अन्य विद्यार्थी-विद्यार्थिनींना सहभागाबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले. सौ. वासंती देशपांडे, सौ. वंदना रानडे, सौ. अबोली उमराणी, श्री. मुकुंदराव कुलकर्णी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

सौ. वेणूताई चव्हाण ८७ वी जयंती २.२.२००७ : स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या धर्मपत्नी सौ. वेणूताई चव्हाण यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त दि. २.२.२००७ रोजी सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त आमदार श्री. बाळासाहेब पाटील त्याचप्रमाणे माथाडी कामगार नेते श्री. नरेंद्र पाटील, मुंबई यांनी मा. यशवंतरावजी चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. विभागीय केंद्र कराडचे सचिव यांनी सर्वांचे स्वागत केले व आभारही मानले.

सौ. विजयाताई पाटील यशवंताची वेणूबाई व मा. श्री. मुकुंदराव कुलकर्णी (धनी) वेणूताईंच्या आठवणी : सौ. वेणूताई चव्हाण यांच्या ८७ व्या जयंती निमित्ताने दि.२.२.२००७ रोजी दुपारी २.०० वाजता सौ. वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृहात निबंध व वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा व प्रा. सौ. विजयाताई पाटील, कोल्हापूर 'यशवंताची वेणूबाई' व स्व. यशवंतरावांच्या कुटूंबातच लहानपणापासून वावरलेले मा. श्री. मुकुंदराव कुलकर्णी (धनी) 'वेणूताईंच्या आठवणी' या विषयावर भावपूर्ण भाषणे झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विठामाता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.कमला शेलार त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाण महिला व्यासपीठाच्या प्रा. निर्मला घोरपडे, सौ. शोभना रैनाक, सौ. रझिया मुजावर, सौ. पोतदार कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होत्या. प्रास्ताविक विभागीय केंद्र कराडचे सचिव श्री. डकरे यांनी केले. प्रा. सौ. निर्मला घोरपडे यांनी आभार मानले. सौ. अबोली उमराणी व श्री. अनिल पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

**३) विभागीय केंद्र, नागपूर :**

सामाजिक आशयाची काव्यसंध्या १३ एप्रिल २००६ : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पूर्वसंध्येला केंद्राच्या वतीने गुरुवार दि. १३ एप्रिल २००६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता सामाजिक आशयाची काव्यसंध्या आयोजित केली गेली. काव्यसंध्येच्या अध्यक्षस्थानी कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सीमाताई साखरे होत्या. या काव्यसंध्येत डॉ.सौ.सुलभा होर्लेकर, श्रीपाद प्रभाकर जोशी,चंद्रपूर, विजयकुमार राऊत, कौमुदी पाटील, उल्हास मनोहर, प्रशांत असनारे,अकोला, विजया ब्राम्हणकर, प्रभाकरराव काळे, भास्कर पांडे यांनी भाग घेतला. या कार्यक्रमावर असहाय हुंदक्याची छाप उमटली. यावेळी स्थानिक व विदर्भातून आलेल्या कवींनी आपल्या कवितांमधून समाजातील विदारक स्थितीचे चित्र उभे करतांनाच त्यातून बाहेर पडण्याचा प्रबळ आशावादही व्यक्त केला गेला. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, मानवी जीवन, स्वभाव, पाणी, महिलांचे शोषण, बाबासाहेबांच्या विचारांपासून भरकटत चाललेला समाज अशा अनेकविध विषयावरील कविता सादर करण्यात आल्या. कार्यक्रमाची संकल्पना मनीषा साधू यांची होती. त्यावेळी विजय जिचकार, डॉ.चंद्रभान भोयर, घनश्यामदास पनपालिया, उमाकांत रामटेके व्यासपीठावर उपस्थित होते.

दास्तान ए ग़ज़ल शनिवार दि. १५ एप्रिल २००६ : ग़ज़लने मराठीत पदार्पण केले आणि रसिक मराठी मनाने तिला वेगळ्या उंचीवर नेले ग़ज़लेचा प्रवास करविणारा दास्तान ए ग़ज़लचे आयोजन स्व.सुरेश भट यांच्या जयंतीनिमित्त नव्या-जुन्या ग़ज़लांसह सूरमयी प्रवास घडविणारा

कार्यक्रम राष्ट्रभाषा संकुल येथे पार पडला. नाविन्यपूर्ण असा कार्यक्रम करुन सुरेश भट यांना भावपूर्ण शब्द स्वरांजली समर्पित करण्यात आली. या कार्यक्रमाचे खास आकर्षण उर्दू शेरोशायरीचे गाढे अभ्यासक डॉ. विनय वाईकर यांचे अभ्यासपूर्ण निवेदन आणि सोनाली दीक्षीत यांचे सुरेल ग़जल गायन होते. सोनाली यांनी एकाहून एक सरस अशा दहा ग़जल सादर केल्यात. डॉ.वाईकर यांनी मूळ पर्शियन भाषेतून उर्दू-मराठी भाषेत उत्क्रांत झालेल्या ग़जलचा इतिहास, सुरेश भट यांचे मराठी ग़जलांच्या संदर्भातील अपूर्व योगदान, ग़जलातील खास सौदर्य स्थळांचा आढावा घेत शेरोशायरी करीत निवेदनात रोचकता आणली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.असदुल्लाह यांनी केले. मनीषा साधू यांनी आभार मानले.

पंडित नेहरु यांची विकासाची संकल्पना : पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार दि. २७ मे २००६ रोजी सायं. ५.३० वाजता राष्ट्रभाषा संकुल येथे 'पं. नेहरु यांची विकासाची संकल्पना' या महत्त्वपूर्ण विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी दैनिक भास्कर, नागपूरचे संपादक मा. श्री. प्रकाश दुबे होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. चंद्रभान भोयर यांनी केले. विभागीय केंद्र,नागपूरचे उपाध्यक्ष श्री. विजय जिचकार यांनी प्रास्ताविक केले. दीप प्रज्वलन डॉ. जोग यांनी केले.

'त्या एका क्षणी' ग्रंथ प्रकाशन समारंभ : विसंगत झालेले जग आज सुसंगत करण्याचे आव्हान वैचारिक लेखकाकांपुढे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी जगप्रसिद्ध लेखक आल्बेर कामू लिखित 'क्रॉस पर्पज' या नाट्यकृतीचा मराठी भावानुवाद-'त्या एका क्षणी' या कलाकृतीच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी केले. विभागीय केंद्र, नागपूर व युगसंवाद वाङमयीन आणि सांस्कृतिक चळवळीतर्फे 'त्या एका क्षणी' नाट्यकृतीचे प्रकाशन झाले. प्रसिद्ध रंगकर्मी डॉ. सतीश पावडे यांनी या पुस्तकाचे लिखाण केले आहे. व्यासपीठावर ख्यातनाम कादंबरीकार, ज्येष्ठ पत्रकार श्री. शैलेश पांडे होते. पुणे येथील पुष्प प्रकाशनातर्फे प्रकाशित या अनुवादित नाट्यकृतीचे लोकार्पण रिलायन्स इन्फोकॉमचे उपाध्यक्ष श्री. रवींद्र आवटी यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमात पुष्प प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या काही निवडक ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यांत आले होते.

जागतिक तंबाखू विरोधी दिवस व निबंध स्पर्धा पुरस्कार वितरण समारोह : जागतिक तंबाखू दिनानिमित्त विभागीय केंद्र नागपूर आणि इंडियन कॅन्सर सोसायटी नागपूर शाखा यांच्या विद्यमाने 'तंबाखुचे व्यसन-दुष्परिणाम व उपाय' या विषयावर शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी, मराठी, हिंदी या भाषांमध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शालेय गटातून प्रथम पुरस्कार सेंटर पॉईंट शाळेच्या कु. प्रियंका गर्ग यांने पटकाविला तर द्वितीय व तृत्तीय पुरस्कार कोंढाळीचा तेजस धानोरकर व मॉडर्न स्कूलचा कु. आकाश जैन यांना तर इयत्ता ११ वी व पुढील गटात घेण्यात आलेल्या स्पर्धेत कमला नेहरु महाविद्यालयाची कु.प्रियंका ठाकरे हिला प्रथम तर डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयाचे कु. प्रशांत डहाट व शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचा कु. चारुहास धर्माधिकारी यांना दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेतील सर्व विजेत्यांना रु. १००१/-, रु. ७०१/-, रु. ५०१/- रोख व प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. दि. ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिवस राष्ट्रभाषा संकुलात आयोजित आला. माजी खासदार श्री. बनवारीलालजी पुरोहित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. लोकसत्ताचे निवासी संपादक श्री. प्रविण बर्दापूरकर अध्यक्षस्थानी होते.

कृतज्ञता समारोह दि.११ जून २००६ : स्वत:साठी जीवन जगण्याची मानसिकता वाढत असतांना इतरांना मदत करण्यासाठी स्वत:ला झोकून देणाऱ्या व्यक्ती आजही समाजात दिसतात ही आशादायक बाब आहे. सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ.संजीव चौधरी व त्यांचे मित्र श्री. छोटूभाई उर्फ अब्दुल अजीज यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून आग लागलेल्या घरातून लोकांचे संरक्षण केले ही नागपूरकरांकरीता अभिमानाची गोष्ट आहे. त्यापासून आजच्या युवा पिढीने बोध घेण्यासारखे आहे असे प्रतिपादन श्री. बनवारीलाल पुरोहित यांनी डॉ. संजीव चौधरी व श्री. अब्दुल अजीज यांच्या प्रतिहृद्भावना व्यक्त करणाऱ्या कृतज्ञता समारोह प्रसंगी दि. ११ जून २००६ रोजी राष्ट्रभाषा संकुलात सत्कार करतांना काढलेत. विंग कमांडर (निवृत्त) व लेखक श्री. अशोक मोटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांनी केले. यावेळी केंद्राच्या वतीने शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. चौधरी व छोटूभाई यांचे कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला घटनेच्या दिवशी काय घडले याची चित्रफितही दाखविण्यात आली. संचालन सौ. रेखा दंडिगे यांनी केले व आभार सौ.शैल जैमिनी यांनी मानले. या सत्कार सोहळयाला बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते. व्यासपीठावर विभागीय केंद्र नागपूरचे श्री. विजय जिचकार, डॉ. चंद्रभान भोयर हे हजर होते.

१ जुलै ०६ : विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने नागपूर विद्यापीठाचे राजनीतिशास्त्राचे पूर्वाध्यक्ष प्रा. र. वि. रानडे यांचा प्रसिद्ध विचारवंत डॉ. भा. ल. भोळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी होते. 'राजनीति की भावी दिशापर' या विषयावर प्रा. र. वि. रानडे यांचे मौलिक व्याख्यान झाले. याप्रसंगी वरिष्ठ पत्रकार डॉ. सत्यनारायण शर्मा आणि श्रमिक नेता डॉ. रतिनाथ मिश्रा विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

२ जुलै ०६ : विभागीय केंद्र नागपूर आणि सम्यक साहित्य मंच यांच्या संयुक्त विद्यमाने 'पावसात भिजण्याचे वय निघून गेले'.. या ओळीवर तरई गजलधारा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी होते. प्रमुख अतिथी म्हणून नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. यदु जोशी तर विशेष अतिथी म्हणून निवृत्त विंग कमांडर व प्रसिद्ध लेखक श्री. अशोक मोटे उपस्थित होते. या कार्यशाळेत एकूण १७ कवींनी भाग घेतला.

१३ ऑगस्ट ०६ : विभागीय केंद्र नागपूर आणि सम्यक साहित्य मंच यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरक्षण..' या विषयावर गझलधारा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी थोर विचारवंत आणि साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून श्री. गिरीश गांधी होते. या कार्यशाळेत एकूण २३ कवींनी भाग घेतला.

१४,१५,१६ ऑगस्ट ०६ : नागपूर येथे झालेल्या द्वितीय राज्यस्तरीय बाल साहित्य संमेलनात 'जाऊ कवितेच्या गावात' या शीर्षकाखाली सचित्र बाल कवितांचे प्रदर्शन विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आयोजित करण्यात आले. प्रसिद्ध कवी श्री. शंकर विटणकर यांनी या प्रदर्शनाची जबाबदारी सांभाळली. तीनही दिवस या अभिनव प्रदर्शनाला बाल, शिक्षक व पालकांचा उत्स्फूर्त आणि चांगला प्रतिसाद मिळाला. कवी कुलगुरु कालिदास, संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे यांनी या प्रदर्शनाचे उद्घाटन केले. बालकुमार साहित्यिक व बाल नाटककार श्री.दिनकर देशपांडे व श्री. गिरीश गांधी हे याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

५ सप्टेंबर २००६ : विभागीय केंद्र नागपूरच्या 'पुस्तकांच्या ओझ्याखाली शिक्षणाची अवस्था' या महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा आयोजित केली. या चर्चेच्या अध्यक्षस्थानी माजी महापौर मा. अटलबहादूर सिंग होते. विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ.श्रीधर साळुंके, बालरोगतज्ञ डॉ. श्रीकांत चोरघडे, मानसोपचारतज्ञ डॉ. प्रबोध सोमलवार, हायस्कूलच्या मुख्याध्यापिका डॉ.विजया देसाई, सांदीपनी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका डॉ.विजया घांदे अशी तज्ञ मंडळी पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देत होती.

९ सप्टेंबर २००६ : विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने 'हिंदु सिक्ख स्नेहमीलन' या विषयावर पुणे विद्यापीठाच्या नामदेव अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ.अशोक प्रभाकर कामत यांचे व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी श्री. गिरीश गांधी होते.

१५ सप्टेंबर २००६ : नागपूरातील ज्येष्ठ दिग्दर्शक व नेपथ्यकार श्री. मोरूदादा कोठीवान यांचे निधन झाले. त्यांना श्रद्धांजलीपर कार्यक्रम प्रतिष्ठानचे प्रा.ज्ञानेश वाकुडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. वक्ता म्हणून डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, रंगकर्मी श्री. सुभाष चांदुरकर व लेखक-अभिनेता श्री. सुरेश कुळकर्णी उपस्थित होते.

२८ सप्टेंबर २००६ : १९०६ साली झालेल्या पहिल्या सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त विभागीय केंद्र नागपूर आणि महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी 'पहिला सत्याग्रह ते स्वातंत्र्य' या विषयावर आधारित चित्रस्पर्धा आणि निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आल्या. चित्रस्पर्धेत एकूण ३९ आणि निबंधस्पर्धेत एकूण ४४ प्रवेशिका आल्या चित्रस्पर्धेत स्व.भाऊसाहेब सुर्वे विद्यालयाचा अंकित बी बिटले याने रोख रु. ३००/- चा प्रथम; सोमलवार हायस्कूल खामलाच्या कु.सई विजय गोळे हिने रोख रु. २००/- चा द्वितीय; तर भिडे गर्ल्स हायस्कूलच्या कु. अभिलाषा बुरसे हिने रोख रु. १५०/- चा तृतीय पुरस्कार मिळविला.

निबंध स्पर्धेत प्रॉव्हिडन्स गर्ल्स हायस्कूलच्या कु.नीलम हरिश्चंद्र विश्वकर्मा हिने रोख रु. ३००/- चा प्रथम; भिडे गर्ल्स हायस्कूलच्या कु. शीतल दुर्योधन गवई हिने रोख रु. २००/- चा द्वितीय व सोमलवार हायस्कूल, खामलाच्या कु. गंधाली अनिल नाजपांडे हिने रोख रु. १५०/- चा तृतीय पुरस्कार मिळविला. पुरस्कार वितरण गांधी जयंतीच्या दिवशी करण्यात येईल.

१ ऑक्टोबर : महात्मा गांधी जयंतीनिमित्त विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने 'महात्मा गांधी सुराज्याची संकल्पना' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी श्रीमती लीलाताई चितळे होत्या. कार्यक्रमास अर्थशास्त्रतज्ञ डॉ. श्रीनिवासन खांदेवाले, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. अरुणकुमार उपस्थित होते. याचप्रसंगी 'पहिला सत्याग्रह ते स्वातंत्र्य' या विषयावरील आयोजित निबंध स्पर्धा व चित्रस्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

२२ ऑक्टोबर : दिवाळीच्या निमित्ताने विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने सकाळी ६.०० वाजता भावगीतांचे हा सुगम संगीताचा कार्यक्रम आयोजित केला होता. पुण्याच्या अंजली दाते, शरयू दाते, रुपाली बक्षी-सराफ, अनुजा मेंधळ (झी मराठीच्या सारेगमप या कार्यक्रमात सहभागी झालेली) पूजा दीक्षित, हिंडोल पेंडसे (झी मराठीच्या सारेगमपची पहिली फेरी विजेता) व माधुरी अशिरगडे यांनी विविध रंगी व विविध ढंगी गाणी सादर करुन भरगच्च सभागृहाला लुब्ध केले.

१ नोव्हेंबर : उदयोन्मुख रंगकर्मी सलीम शेख लिखित 'धम्मघोष' या दोन अंकी नाटकाचे प्रसिद्ध नाटककार, चित्रपट लेखक व

पटकथाकार श्री.संजय पवार ह्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी प्रा.डॉ.विनोद इंदुरकर, श्री.शेख सुलतान, श्री.निरंजन मार्कंडेयवार, श्री.महेंद्र सुके यांनीही आपले विचार मांडले.

८ नोव्हेंबर : दिवाळीच्या निमित्ताने विभागीय केंद्र नागपूर आणि स्नातकोत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने वि. वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' या अजोड नाट्यकृतीवर 'नाट्यावलोकन व महाचर्चा' आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. गिरीश गांधी ह्यांच्या हस्ते करण्यात आले. या महाचर्चेत श्री. पराग घोंगे यांनी 'नटसम्राट : कथावस्तू' प्रा. अनिल नितनवरे 'नटसम्राट : एक शोकांतिका', गणेश नायडू यांनी नेपथ्य व प्रकाशयोजना डॉ. आशा सावदेकर यांनी 'साहित्यमूल्य', डॉ. संध्या अमृते यांनी 'प्रयोगमूल्य', प्रकाश लुंगे यांनी 'भूमिका व दिग्दर्शन' या विषयावर आपले निबंधवाचन केले.

या महाचर्चेतून अभ्यासकांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन अध्यक्षस्थानी असलेले आचार्य अरुण वेलणकर यांनी केले.

१२ ते १४ नोव्हेंबर : भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त १४ नोव्हेंबर हा दिवस 'बालकदिन' म्हणून साजरा होतो. विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने वाय. एम. सी. ए.च्या सभागृहात कवी श्री. शंकरराव विटणकर यांच्या १३४ आकर्षक बालगीते-चित्रांचे १२ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २००६ या दरम्यान चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाला विद्यार्थी व शिक्षक पालकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.

१३ नोव्हेंबर : विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आणि राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'गो. वि.( विंदा) करंदीकरांचे साहित्य' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी या चर्चासत्राचे उद्घाटन केले. अध्यक्षस्थानी असलेले वि. सा. संघाचे उपाध्यक्ष, साहित्यिक व विचारवंत डॉ. श्रीपाद भालचंद्र होते. प्रसिद्ध समीक्षक व विचारवंत डॉ. वि. स. जोग म्हणाले की मार्क्सवाद समजून घेतल्याशिवाय करंदीकरांच्या साहित्याच्या सूक्ष्म छटा लक्षात येणार नाही.

चार सत्रांच्या या चर्चासत्रात डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी गो. वि. करंदीकरांचे निबंध प्रा.पुरुषोत्तम माळोदे यांनी 'गो. वि. (विंदा) करंदीकरांची साहित्य समीक्षा' डॉ. अक्षयकुमार काळे यांनी 'विंदा करंदीकरांच्या कवितेतील स्त्री–जाणिवा' या विषयावर आपले शोध निबंध सादर केले. या निबंधांवर अनेक मान्यवर साहित्य अभ्यासकांनी भाष्य केले.

२१ ते २२ नोव्हेंबर : विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आणि राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर मराठी विभाग आणि युगसंवाद यांच्या संयुक्त विद्यमाने व अथक परिश्रमांनी न भूतो न भविष्यति: असा 'अष्टपैलू आंबेडकर' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृति अर्धशताब्दीनिमित्त महाव्याख्यानसत्र हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दि. २१ नोव्हेंबर रोजी 'आंबेडकरांचे आर्थिक विचार' डॉ. श्रीनिवास खांदेवाले, नागपूर, 'भारतीय संविधान आणि डॉ. आंबेडकर' ॲड. डॉ. सुरेश माने, मुंबई 'आंबेडकरांची राजकीय भूमिका' डॉ. भा. ल. भोळे, नागपूर, 'आंबेडकरांची पत्रकारिता' - डॉ. गंगाधर पानतावणे, औरंगाबाद अशा चार चर्चासत्रांचे तर दि. २२ नोव्हेंबर रोजी 'डॉ. आंबेडकरांचे साहित्यकारण'- डॉ. श्रीकांत तिडके,मूर्तिजापूर, 'आंबेडकरांचे समाजकारण'- डॉ. यशवंत सुमंत, पुणे 'आंबेडकरांचे धम्मकारण' डॉ. प्रदीप गोखले, पुणे, 'आंबेडकरांचा राष्ट्रवाद'- डॉ. भाऊ लांखडे, नागपूर अशा चार चर्चासत्रांचे आयोजन करुन डॉ. बाबासाहेब आंबेकरांच्या निवडक आठ पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला.

खासदार मा. श्री. दत्ताजी मेघे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एस. एन. पठाण यांनी 'अष्टपैलू आंबेडकर' या महाव्याख्यानसत्राचे उद्घाटन केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. वेदप्रकाश मिश्रा होते.

'अष्टपैलू आंबेडकर' महाव्याख्यानसत्राचा समारोप श्री. गिरीश गांधींच्या अध्यक्षतेखाली आणि ज्येष्ठ पत्रकार आणि विचारवंत प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

दि. २५ नोव्हेंबर : मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्र नागपूरतर्फे प्रसिद्ध विचारवंत डॉ. भा. ल. भोळे यांच्या 'यशवंतराव चव्हाणांनंतरचा महाराष्ट्र' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी मा. श्री. गिरीश गांधी होते.

दि. २७ नोव्हेंबर : 'विभागीय केंद्र नागपूर' आणि 'अभिव्यक्ती' यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. विजया मरोतकर यांच्या 'आवर्तन' या नवीन काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मा. श्री. गिरीश गांधी होते.

दि. २८ नोव्हेंबर : महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने 'महात्मा फुले आणि 'आजचा शेतकरी' या विषयावर 'सकाळ'चे संपादक (एडिटोरियल इफेक्टीव्हनेस) श्री. चंद्रकांत वानखडे हयांचे व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी मा. श्री. गिरीश गांधी होते. प्रास्ताविक डॉ. प्रमोद मुनघाटे हयांनी केले.

दि. १ डिसेंबर : विभागीय केंद्र नागपूर आणि 'पारख' समाजकल्याण संस्था,नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वुमेन प्रिजनर्स ॲण्ड देयर अकंपनीड चिल्ड्रेन' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. डॉ. बद्री विशाल त्रिवेदी, सहायक निदेशक सुधारात्मक प्रशासन पोलीस अनुसंधान आणि विकास ब्युरो, गृह मंत्रालय, भारत सरकार,नवी दिल्ली हे प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होते. श्रीमंत राजे मुधोजी भोसले, पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य श्री. पंकज गुप्ता यांचेसह अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी, शैक्षणिक अधिकारी व सामाजिक मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने करण्यात आले. आभार प्रदर्शन विभागीय केंद्र नागपूरचे उपाध्यक्ष श्री. विजय जिचकार ह्यांनी केले.

दि. ६ डिसेंबर : विभागीय केंद्र नागपूर आणि 'विश्वास एज्युकेशन सोसायटी' यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त 'आदरांजी कार्यक्रम' आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी मा. श्री. गिरीश गांधी होते. प्रमुख अतिथी आमदार मा. श्री. सुधाकर गणगणे होते तर प्रमुख वक्ते म्हणून आमदार मा. श्री. उल्हास पवार उपस्थित होते. याप्रसंगी मंचावर श्री. यादवराव देवगडे, श्री. चंदशेखर टेंभेकर, श्री. घनश्यामदास पनपालिया, विभागीय केंद्र नागपूरचे उपाध्यक्ष श्री.विजय जिचकार, विश्वास एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. श्रीराम काळे, मुख्याध्यापिका सौ. अलका काळे उपस्थित होते.

दि. ९ व १० डिसेंबर : विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने विदर्भ साहित्य संघाच्या बुलढाणा येथे झालेल्या बालसाहित्य संमेलनात प्रतिष्ठानच्या वतीने तयार करण्यात आलेल्या १३४ बालगीत चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. चांगला प्रतिसाद लाभलेले हे प्रदर्शन संमेलनात आकर्षणाचे केंद्र होते. कवी श्री. शंकर विटणकर हयांनी प्रदर्शनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली.

दि. २४ व २७ डिसेंबर : विभागीय केंद्र नागपूर आणि विदर्भ कलाकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अमूर्त शैलीकडे वळलेले ८८ वर्षांचे ज्येष्ठ चित्रकार श्री. अरुण मोरघडे यांच्या ८८ अमूर्त चित्रांचे 'वेदनेचा रंग' या प्रदर्शनाचे रवींद्र आर्ट गॅलरीमधे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन माजी खासदार श्री.बनवारीलाल पुरोहित यांनी ब्रशने कॅनव्हासवर उभे-आडवे रंगाचे फटकारे मारुन केले. अध्यक्षस्थानी स्वातंत्र्यसेनानी व माजीमंत्री मा.श्री.शंकरराव गेडाम होते.

दि. २५ डिसेंबर : विभागीय केंद्र,नागपूर आणि अक्षरभूषण मधुकरराव भाकरे स्मृति प्रतिष्ठान,नागपूर, जिल्हा परिषद-शिक्षण विभाग आणि महानगरपालिका-शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरशालेय सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकुण एकलाख पस्तीसहजार विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भाग घेतला. ही स्पर्धा सहा गटात विभागलेली होती. प्रत्येक गटाला पांच प्रमाणे एकूण तीस मानचिन्हे व प्रशस्तीपत्रे विजेत्यांना देण्यात आली.

विभागीय केंद्राचे कार्यालयीन सचिव श्री.गणेश नायडू आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या 'बसोली ग्रुप' संस्थापक चित्रकार श्री.चंद्रकांत चन्ने यांनी परीक्षकांचे काम केले. पारितोषिक वितरण माजी खासदार मा.श्री.बनवारीलाल पुरोहित आणि उपमहापौर मा.श्री.रघुनाथ मालीकर गुरुजी यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी माजी पोलीस महानिरीक्षक मा.श्री.अरविंद इनामदार आवर्जून उपस्थित होते.

दि. २७ डिसेंबर : विभागीय केंद्र नागपूर आणि महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, विदर्भ विभाग,नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मिर्झा ग़ालिब यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'ये तेरा बयान ग़ालिब' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. 'एक संवाद, एक मुशायरा' असे या कार्यक्रमाचे स्वरुप होते.

२, ३ व ४ फेब्रुवारी ०७ : ७३ वर्षांनंतर नागपुरात संपन्न झालेल्या ८० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचा महत्त्वाचा सहभाग होता. विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री.गिरीश गांधी हे या संमेलनाचे 'स्वागताध्यक्ष' होते. प्रतिष्ठानचे सचिव, श्री. गणेश नायडू यांनी संमेलनाच्या कार्यालयीन कामाकाजाची जबाबदारी सांभाळली तसंच कार्यक्रमस्थळांची देखरेख करुन ती सुशोभीत करण्याचे काम केले.

सौ.मनीषा साधू ह्यांनी निमंत्रित सन्माननीय कवींच्या 'कवी संमेलनाचे' सूत्रसंचालन केले. डॉ. सुनील रामटेके हयांनी 'शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठी निकालात निघाली आहे' या परिसंवादाचे सूत्रसंचालन केले. डॉ. चंद्रभान भोयर ह्यानी विविध आयोजनात मोलाचे सहकार्य केले.

श्री. गिरीश गांधी आर्थिक सहाय्य मिळवून देण्यात जसे अग्रेसर होते तसंच संमेलन आशयासमृद्ध आणि नीटनिटके होण्यासाठी त्यांनी

अहोरात्र कष्ट घेतले.

२० फेब्रुवारी २००७ : पौगंडावस्थेतील मुलांना त्यांच्यात होणाऱ्या मानसिक व शारीरिक परिवर्तनासंबंधी अवगत करण्यासाठी 'रेल्वेमेन्स हायस्कूल' मधील ८वी व ९वी इयत्तांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी 'बोला डॉक्टरांशी' हा कार्यक्रम आयोजित केला.

१२ मार्च २००७ : मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त मराठी, हिंदी व उर्दू कवींचे त्रिवेणी 'कवी संमेलन' आयोजित केले होते.

**महिला व्यासपीठ–विभागीय केंद्र नागपूर :**

जागतिक महिलादिनानिमित्त आंतर महाविद्यालयीन अध्यापक महिला विद्यालयांसाठी 'माध्यमांच्या भडक चित्रणामुळे स्त्रियांवरील अत्याचारात वाढ' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत कु. प्रीती इंगळे-प्रथम; कु. अपूर्वा सप्रे-द्वितीय आणि कु. निशा मदरानी-तृतीय पारितोषिक विजेत्या ठरल्या. अध्यक्षस्थानी स्त्रीरोग तज्ञ डॉ. लीना बिरे होत्या. परीक्षक म्हणून डॉ. पल्लवी देशपांडे व श्री. गणेश नायडू यांनी काम पाहिले. संचालन श्रीमती कल्पना तिवारी यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीमती शैल जैमिनी यांनी केले.

१० मार्च २००७ : सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त शिक्षिकांसाठी 'काव्य स्पर्धा' आयोजित केली होती. चांगला प्रतिसाद लाभलेल्या या 'काव्य स्पर्धेत' सौ. उज्ज्वला अंधारे, सौ. सुमति बिसन आणि सौ.विजया मारोतकर प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिक विजेत्या ठरल्या. अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्त्या मा. सौ. उषा मिश्रा होत्या. परीक्षकांची जबाबदारी सौ.मनीषा साधू आणि सौ. संगीता महाजन ह्यांनी पार पाडली. संचालन श्रीमती कल्पना तिवारी यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीमती शैल जैमिनी यांनी केले.

**४) विभागीय केंद्र कोकण :**

दिनांक २३ एप्रिल २००६ रोजी स. ११ वाजता रत्नागिरी खालगांवचे माजी सरपंच श्री. घा. स. खोलये यांचे येथे शेतकरी व बागायतदार यांची गावागावात पायलट प्रोजेक्ट घेण्याचे दृष्टीने कृषी मेळावा घेण्यात आला होता. या मेळाव्याला मार्गदर्शक म्हणून कोकण केंद्राचे उपाध्यक्ष, डॉ. श्रीरंग कद्रेकर हे उपस्थित होते.

दिनांक २४ एप्रिल २००६ रोजी तालुका लांजा येथील कोंडये या ठिकाणी विविध गावातून पाणी नियोजनाबाबत पायलट प्रोजेक्ट घेण्याबाबत शेतकरी प्रतिनिधी व बागायतदार यांचा कृषी मेळावा आयोजित करण्यात आला होता.

दिनांक २८ एप्रिल २००६ रोजी डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे कृषीपर्यटन मेळावा आयोजित करण्यात आला. सदर मेळाव्याला विभागीय केंद्र कोकणचे अध्यक्ष मा. श्री. भाऊसाहेब नेवाळकर व मा. श्री. अनिल नेवाळकर हे उपस्थित होते.

दिनांक १५ मे २००६ रोजी मौजे निवे ता.संगमेश्वर येथे शेतकरी व बागायतदार यांचा गावात पायलट प्रोजेक्ट घेण्याचे दृष्टीने मेळावा घेण्यात आला तसेच त्यांचे समस्या सोडविण्याचे प्रयत्न करण्यात आले.

दिनांक ५ जून २००६ रोजी भारतीय पर्यावरण शास्त्र व तंत्रज्ञान संस्था, मुंबई जिल्हा रत्नागिरी शाखा आणि विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरणदिनानिमित्त रत्नागिरीच्या गोगट जोगळेकर महाविद्यालयाच्या राधाबाई शेट्ये सभागृहात तज्ञांचे उपस्थितीत दुपारी २.०० ते ६.०० या वेळेत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

दिनांक २१ जून २००६ रोजी निवे बु. येथील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचे दृष्टीने कृषी मेळावा घेण्यात आला.

दिनांक २४ सप्टेंबर २००६ रोजी दुपारी ४.०० वाजता कोंडये ता.लांजा येथे शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचे दृष्टीने कृषी मेळावा घेण्यात आला.

दिनांक १ ऑक्टोबर २००६ रोजी ता.खेड येथे शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचे दृष्टीने कृषी मेळावा घेण्यात आला.

दिनांक १९ फेब्रुवारी २००७ रोजी मौजे वाघावळे उऱ्याट ता. खेड खोपी मार्गे जिल्हा सातारा या ठिकाणी पर्यटन विकासाच्या दृष्टीने पर्यटन विकास केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने तेथील गावातील ग्रामस्थांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

विभागीय केंद्र, कोकण जिल्हा समिती रत्नागिरीच्या वतीने माहे एप्रिल २००६ ते मार्च २००७ या कालावधीत शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी पाणी नियोजन, हायड्रोइलेक्ट्रिक पायलट प्रोजेक्ट घेणे, पाण्याचे सिंचनत्तर उपक्रम, कृषीपर्यटन विकासाच्या दृष्टीने पर्यटन विकास केंद्र होणे अशा विविध विषयांबाबत कार्यक्रम कृषी मेळावे राबविण्यात आले.

**महिला व्यासपीठ-विभागीय केंद्र कोकण :**

२४ ऑगस्ट २००६ रोजी विभागीय केंद्र कोकणच्या हॉलमध्ये महिलांसाठी व्यावसायिक व आरोग्यविषयक जागृती या विषयीचे उद्‌बोधन तसेच सांस्कृतिक असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला ८० ते ९० महिलांची उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमाला देवरुख येथील मातृमंदिर संस्थेच्या संचालिका, मा. सौ. शांताबाई नारकर व जिल्हा महिला पतपेढीच्या माजी चेअरमन मा.सौ.युगंधरा राजेशिर्के यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमात अनेक महिलांनी आपले प्रश्न मांडले व मार्गदर्शन घेतले.

दि. २९ सप्टेंबर २००६ रोजी देवरुख येथील मातृमंदिर संस्थेच्या गोकुळ सभागृहात उद्योग करु इच्छिणाऱ्या महिलांसाठी हस्तकला प्रशिक्षणवर्ग घेण्यात आला होता. या प्रशिक्षणाला शिक्षक, प्रा. श्री. विठ्ठल वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. सदर प्रशिक्षणाला विविध डिझाइन्सचे शोभीवंत कंदील व आकर्षक भेटकार्ड इत्यादि वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण महिलांना देण्यात आले. त्याचा ४७ महिलांनी लाभ घेतला.

दि. ३ जानेवारी २००७ सावित्रीबाई फुले जयंती व २ फेब्रुवारी २००७ सौ.वेणूताई चव्हाण जयंती या कालावधीत महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. उदा.निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धा, स्मरणशक्ती स्पर्धा, असोला नारळ सोलणे, दोरी तोंडली बांधणे वगैरे तसेच ग्रामीण भागातील मुलींची जाकडी नृत्य स्पर्धा शिवाजी स्टेडियम, मारुती मंदिर, रत्नागिरी येथे स्टेजवर आयोजित करण्यात आली होती. त्या स्पर्धेत ग्रामीण भागातील विविध संघांनी भाग घेतला होता. या स्पर्धेला परीक्षक म्हणून पर्यटन केंद्राच्या कार्यक्रमाचे आयोजक मा. श्री. हुश्ये व जिल्हा उपाध्यक्ष कलगी-तुरे मंडळाचे मा. श्री. शांताराम मालप यांना नियुक्त केले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. सौ. फरोग मुकादम, प्रांताधिकारी यांच्या शुभहस्ते झाले. या स्पर्धेला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. अशाप्रकारची जिल्ह्यातील प्रथमच स्पर्धा विभागीय केंद्र कोकणने आयोजित करुन ग्रामीण भागातील पारंपरिक कला जोपासून ग्रामीण मुलींना व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्याबद्दल मान्यवरांनी विशेष आभार मानले व पुढील वर्षी यापेक्षा भव्य प्रमाणात स्पर्धा व्हावी अशी इच्छा प्रकट केली.

वरील सर्व स्पर्धांचा बक्षीस समारंभ मा. आमदार श्री. उदयजी सामंत यांचे शुभहस्ते दि. २ फेब्रुवारी २००७ रोजी सौ.वेणूताई चव्हाण यांचे जयंती दिवशी करण्यात आला. त्यावेळी सौ. वेणूताई चव्हाण यांचे जीवनाबद्दल सौ. शांताबाई नारकर यांनी भाषण केले.

दिनांक ८ मार्च २००७ रोजी रोटरी क्लब व महिला आर्थिक विकास महामंडळ यांचे संयुक्त विद्यमाने बचतगटातील महिलांकरिता त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला चांगली बाजारपेठ मिळावी म्हणून बचतगटातील महिलांच्या मालांची विक्री व प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्यात जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील २५ बचतगटातील महिलांनी स्टॉल लावले होते. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी मा.श्री.विकासचंद्र रस्तोगी व मा. सौ. जयाताई सामंत यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमात महिलांनी आपली मनोगते व्यक्त केली.

दिनांक १६ मार्च २००७ रोजी सकाळी ११.०० ते सायं.६.०० या वेळात कुवारबांव येथील रत्नभूमी प्रेसच्या हॉलमध्ये बचतगटातील महिलांकरिता व्यवसायाच्या दृष्टीने आवळ्यापासून विविध विक्री योग्य पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण व जरदोसी वर्क यांचे मोफत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाला प्रशिक्षक श्री. सुधाकर कांबळे व सौ. शीतल साळवी यांचे मार्गदर्शन लाभले. सदर प्रशिक्षणात श्री. सुधाकर कांबळे यांनी आवळ्यापासून तयार होणाऱ्या पदार्थाचे प्रात्यक्षिक व उद्‌बोधन केले. तसेच फणसापासून तयार होणारे पदार्थ व इतर विक्री योग्य पदार्थांची माहिती दिली. तसेच सौ. शीतल साळवी यांनी जरदोसी वर्क संबंधित २१ टाक्यांची माहिती दिली व महिलांकडून प्रात्यक्षिक करुन घेतले. या प्रशिक्षणाचा ४५ महिलांनी लाभ घेतला.

दिनांक २२ मार्च २००७ रोजी लांजा येथील सांस्कृतिक भवन हॉल येथे बचतगटातील महिलांसाठी विविध व्यवसायाचे मोफत प्रात्यक्षिक प्रशिक्षण करण्यात आले होते. हे प्रशिक्षण कोल्हापूरच्या स्वयंसिद्धा संस्थेच्या संचालिका,श्रीमती कांचनताई परुळेकर यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. तसेच उद्‌बोधन करण्यात आले. सदर प्रशिक्षणात मेणबत्त्या, मेणाची फळे, फिनेल, नीळ, बांधणी प्रिंट, शेंगदाणा चिक्की, काजू चिक्की, पॉपकॉर्न इत्यादि वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण महिलांना देण्यात आले. त्याचा ११० महिलांनी लाभ घेतला.

दिनांक २५ मार्च २००७ रोजी वडनाका महिला मंडळ,चिपळूण येथील हॉलमध्ये सकाळी ११.०० ते सायं.६.०० या वेळात बचतगटातील महिलांसाठी विविध उद्योगाचे प्रशिक्षण श्रीमती कांचनताई परुळेकर यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणात विविध वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण तसेच उद्‌बोधन करण्यात आले. या प्रशिक्षणाला १२५ महिला उपस्थित होत्या.

दिनांक २९ मार्च ते ३१ मार्च २००७ या कालावधीत बचतगटातील महिलांकरिता त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला चांगली बाजारपेठ मिळावी या उद्देशाने बचतगटातील महिलांच्या मालाचे विक्री व प्रदर्शन भरविण्यात आले होते. सदर प्रदर्शनाचे उद्‌घाटन स्वातंत्र्यसैनिक व

ज्येष्ठ वयोवृद्धा समाजसेविका मा. श्रीमती कुमुदताई रेगे यांचे हस्ते करण्यात आले. बचतगटातील महिलांनी या प्रदर्शनात १९ स्टॉल मांडले होते. त्यांना ग्राहकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. अशाप्रकारे विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती रत्नागिरीच्या वतीने एप्रिल २००६ ते मार्च २००७ या कालावधीत महिलांसाठी विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

**५) विभागीय केंद्र, नाशिक :**

**'मुलांचे आरोग्य पालकांच्या हाती' पुस्तक प्रकाशन :** डॉ. सुभाष काश्यपे लिखित तसेच विभागीय केंद्र नाशिक व राजहंस प्रकाशन निर्मित 'मुलांचे आरोग्य पालकांच्या हाती' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. ४ जून २००६ रोजी आय. एम. ए. हॉल, नाशिक येथे सायं.६.०० वाजता मा. डॉ. स्नेहलता देशमुख, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या शुभहस्ते व मा. डॉ. संजय चहांदे, विभागीय महसूल आयुक्त,नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

**स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला 'युवा अभिवादन फेरी' :** शहिद भगतसिंगांच्या शताब्दी वर्षानिमित्त नवमहाराष्ट्र युवा अभियान नाशिकतर्फे 'युवा अभिवादन फेरी' आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी शहरातील नागरिक व विविध महाविद्यालयातील सुमारे १५० युवा/युवतींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

**यशवंतराव चव्हाण यांच्या २२ व्या पुण्यतिथीनिमित्त 'भारतासमोरील आव्हाने आणि महाशक्तीच्या दिशेने वाटचाल' या विषयावर व्याख्यान :** यशवंतराव चव्हाण यांच्या २२ व्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्र, नाशिकतर्फे शनिवार दि. २५ नोव्हेंबर २००६ रोजी कै. रावसाहेब थोरात सभागृह के. टी. महाविद्यालय, गंगापूर रोड, नाशिक येथे सायं. ६.०० वाजता मा. ना. पृथ्वीराज चव्हाण, राज्यमंत्री, पंतप्रधान कार्यालय यांचे 'भारतासमोरील आव्हाने आणि महाशक्तीच्या दिशेने वाटचाल' या विषयावर जाहीर व्याख्यान मा. ना. बाळासाहेब थोरात, कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

**स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला भारताचे राष्ट्रपती मा. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी युवकांना उद्देशून केलेल्या आवाहनाचे पोस्टर प्रकाशन :** स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला भारताचे राष्ट्रपती मा. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी युवकांना उद्देशून केलेल्या आवाहनाचे पोस्टर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या नवमहाराष्ट्र युवा अभियान,मुंबईतर्फे तयार करण्यात आले असून त्याचे प्रकाशन मा. ना. पृथ्वीराज चव्हाण यांच्या शुभहस्ते व मा. ना. बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली प्रकाशित करण्यात आले. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष, श्री. विनायक पाटील व पदाधिकारी ॲड. विलास लोणारी, डॉ. वसंत पवार, डॉ. शोभा बच्छाव, माधव पाटील, गुरुमित बग्गा, विश्वास ठाकूर उपस्थित होते.

**'राज्यस्तरीय अपंग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धा २००६-२००७ नाशिक' :** अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे, क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, नाशिक महानगरपालिका, नाशिक, जिल्हा परिषद नाशिक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अपंग मुला-मुलींच्या 'राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा' दि. १७ व १८ फेब्रुवारी २००७ रोजी संपन्न झाल्या. महाराष्ट्रातील सुमारे दोनहजार विविध प्रवर्गातील अपंगांनी सहभाग नोंदविला.

अपंगांच्या दृष्टीने विशेष सोयी-सुविधा उपलब्ध कराव्यात, यासाठी केंद्र शासनातर्फे नाशिक महानगरपालिकेला राजे संभाजी स्टेडियमसाठी एक कोटी रुपयांची व जलतरण तलावासाठी पंचवीस लाख रुपयांची मदत देण्याचे मान्य केलेले आहे. त्याचा पाठपुरावा प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुप्रिया सुळे व्यक्तिश: करीत आहेत. या स्पर्धेच्या उद्घाटनास भारत सरकारचे अपंग कल्याण विभागाचे आयुक्त डॉ. मनोज कुमार, अपंग कल्याण आयुक्त आर. के. गायकवाड, नाशिक विभागाचे महसूल आयुक्त डॉ. संजय चहांदे, जिल्हाधिकारी एस. चोक्कलिंगम्, महापालिका आयुक्त, विलास ठाकूर, जिल्हापरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर राजूरकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

या स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू श्री. विनोद कांबळी यांच्या शुभहस्ते, मा. श्री.रमेश उबाळे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली, श्री. आर. के. गायकवाड, आयुक्त अपंग कल्याण, सिनेअभिनेता श्री. अरुण नलावडे व राष्ट्रीय खेळाडू श्री. निलेश शिंदे, डॉ. सुजाता चहांदे, सौ. भावना राय, सौ. विजया चोक्कलिंगम्, सौ. वर्षा ठाकूर, सौ. पद्मा राजूरकर, सौ. नीता चौधरी, सौ. संध्या व्यंकेश्वर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

**यशवंतराव चव्हाण यांच्या ९४व्या जयंतीनिमित्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या मुला-मुलींना टी-शर्ट/टोपी व पुस्तक वाटप :** यशवंतराव चव्हाण यांच्या ९४ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येस दिशा क्लासेसच्या संचालिका श्रीमती सुधा मेहता यांच्यामार्फत आनंदवल्ली परिसरातील शेतमजूर, कामगार, घरगुती काम करणाऱ्या महिला यांच्या मुला-मुलींना शिक्षण देण्याचे कार्य केले जाते. या आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या

७२ मुला-मुलींना टी-शर्ट/टोपी व पुस्तक वाटप मा. सौ. वर्षा विलास ठाकूर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

**यशवंतराव चव्हाण यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त आदिवासी मुलांच्या वसतीगृहास पाण्याच्या टाकीचे वितरण :** नाशिक जिल्हा आदिवासी महिला हक्क संरक्षण समिती, पेठ संचालित मुलींचे वसतीगृह, बालसदन मु. कापुरसिरा पाडा, ता-पेठ, जि. नाशिक या आदिवासी मुलांच्या वसतीगृहासाठी पाण्याचा प्रश्न बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित होता. यासाठी विभागीय केंद्रामार्फत वीसहजार लिटरच्या चार पाण्याच्या टाक्या पुरविण्यात आल्या.

**भारत-पाकिस्तान मैत्रीनिमित्त सायकल यात्रेचे स्वागत :** भारत-पाकिस्तान मैत्रीसाठी दि.१ मार्च २००७ रोजी पनवेलहून सायकलवर निघालेले नऊ युवक युवती हे दि. २ मार्च २००७ रोजी येथे आले. पनवेल निसर्गमित्र मंडळाच्या वतीने या सायकल यात्रेचे स्वागत करण्यात आले होते. या सायकल यात्रेचे स्वागत विभागीय केंद्र नाशिकमार्फत करण्यात आले.

**आश्रमशाळेच्या मुला-मुलींना टी-शर्ट/टोपी वाटप :** सातारा येथील आ. श्री. लक्ष्मण माने यांच्या मार्गदर्शनाखाली कै. शारदाबाई पवार आश्रमशाळा, सातारा क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले प्राथमिक आश्रमशाळा, उपडी, साथी एस. एम. जोशी माध्यमिक आश्रमशाळा, करंजे येथील विद्यार्थी विद्यार्थिनींना स्पोर्टस् टी-शर्टचे वाटप करण्यात आले.

### ६) विभागीय केंद्र, औरंगाबाद :

ऑक्टोबर ०६ ते जानेवारी ०७ हा चार महिन्यांचा कालावधि विभागीय केंद्र, औरंगाबादसाठी भरगच्च आणि अर्थपूर्ण कार्यक्रमांमुळे दुमदुमणारा ठरला. कार्यकर्त्यांची कल्पकता आणि उत्साह, विभागीय अध्यक्ष श्री. नंदकिशोर कागलीवाल यांचे प्रेरक नेतृत्व, सचिव, श्री. मुकुंद भोगले, कोषाध्यक्ष, श्री. सचिन मुळे यांचे सुयोग्य नियोजन आणि श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. लक्ष्मण अय्यर यांसारख्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे अनुभवी मार्गदर्शन या सर्वांच्या समुच्चयामुळे चार महिन्यांच्या या कालावधीत सात आठ कार्यक्रमांद्वारे विभागीय केंद्र, औरंगाबादने अपंग, किशोरी, युवा, कवि-कवयित्री, सामाजिक कार्यकर्ते, नाट्यकलावंत अशा विविध समाजघटकांसाठी कार्यक्रम घडवून आपले आणि विभागीय केंद्र,औरंगाबादच्या विधायक कार्याचा ठसा आपल्या कार्यक्षात येणाऱ्या भूप्रदेशावर उमटविला.

पंगूम लंघ यते गिरीम् ! : विभागीय केंद्र, औरंगाबादने आणि पद्मभूषण बाळासाहेब भारदे अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ ऑक्टोबर २००६ रोजी अपंग अनुशेष भरती मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होतें. अपंग विभागाचे आयुक्त श्री. आर. के. गायकवाड यांच्या उपस्थितीत दि.२९ नोव्हेंबर ०६ रोजी एक संवाद कार्यक्रमही आयोजित केला. या कार्यक्रमाला शेकडो अपंग तरूण-तरूणी उपस्थित होते. या दोन कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी प्रामुख्याने श्री. सुहास तेंडुलकर, श्री. सुबोध जाधव, श्री. गणेश घुले, श्रीमती काशीताई थोरात या युवा कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या दोन्हीही कार्यक्रमाच्या आयोजनात अपंग हक्क आणि विकास मंचचे समन्वयक श्री. विजय कान्हेकर, श्री. दत्ता बाळसराफ यांचे नियोजन होते. त्याला खा. मा. सुप्रियाताई सुळे यांचा खंबीर पाठिंबा होता.

**कवितेची कार्यशाळा :** २३ नोव्हेंबर रोजी 'कवितेची कार्यशाळा' औरंगाबादमध्ये संपन्न झाली. कविता जन्मावी लागते, कविही जन्मावाव लागतो, असे भलेही अनेकांना वाटो, परंतु प्रतिभेला वळण देणे, तीवर संस्कार करुन ती अधिक विकसित करणे यासाठी जाणकारांचे मार्गदर्शन लागते. यामध्ये कवि असलेले आणि कवितेत रूचि असणारे साठाहून अधिक युवक युवतींनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेत प्रख्यात कवि, कवितेचे अभ्यासक, आस्वादक श्री. फ. मु. शिंदे, डॉ. प्रल्हाद फुलेकर, ऋषिकेश कांबळे, सुरेश पैठणकर, संजय अर्वीकर यांच्यासारखे मार्गदर्शक लाभल्याने ही कार्यशाळा पार पडली.

**संचारबंदी आणि पथनाट्ये :** ४ नोव्हेंबर ते ११ डिसेंबर या काळात पुण्याहून निघालेली 'समताभूमी आणि दीक्षाभूमी' ही यात्रा जेव्हा आमच्या कार्यक्षेत्राच्या जिल्हयातून गेली, तेव्हा प्रतिष्ठानच्या पथनाट्य चमूने २२ ते ३० नोव्हेंबर या काळात या यात्रेतील सर्व महत्त्वाच्या गावी विविध सामाजिक विषयांवर पथनाट्ये सादर करुन त्या विषयांबाबत त्या त्या गांवातून जाणीव जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. हिंगोलीचे प्रशासन, नागरिक आणि आपले कार्यकर्ते यांच्यातील उत्तम समन्वयामुळे पथनाट्याचे कार्यक्रम हिंगोलीतही झाले, मगच रॅली पुढे गेली. या प्रकल्पातही अरुण रसाळ आणि त्यांचे सहकारी यांचा मोठा वाटा होता.

दि. १९ ते २३ डिसेंबर या काळात ग्रामीण किशोरींसाठी एक निवासी शिबीर संपन्न झाले. या शिबिराची संकल्पना, उद्दिष्टे, कार्यक्रम हे सगळे अनिता पगारे आणि तिच्या सहकाऱ्यांनी आखले होते. शिबिराची सुरुवात योगाभ्यास, कवायत, धावणे, डोंगर चढणे अशा मैदानी खेळांनी मोठ्या उत्साहात झाली. त्यानंतर तज्ञांतर्फे किशोरींना त्यांच्यात व्यक्तिमत्त्व विकासास पोषक अशा विविध विषयांबाबत मार्गदर्शनपर सत्रे चालत. गाणी, खेळ, विविध रंजक स्पर्धा, अनुभव कथन, पथनाट्य, नृत्यसंगीत आदिंचीही जोड दिल्याने म्हैसमाळ, बिडकीन,

खुलताबाद अशा छोट्या छोट्या गावांहून आलेल्या आठवी ते अकरावी इयत्तेतील या मुली विलक्षण रंगून गेल्या, हरखून गेल्या. त्यांच्या समारोपासाठी प्रा. स्नेहजाताई रूपवते आवर्जून आल्या होत्या. विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागात सदर किशोरी शिबिर संपन्न झाले.

**संगणक आणि शेती :** जागतिक ख्यातीचे संगणकतज्ञ, संगीत आस्वादक, लेखक श्री. अच्युत गोडबोले आणि जागतिक ख्यातीचे डाळींब बागाईत निर्यातदार कृषीभूषण श्री. विश्वास कचरे या दोघांना प्रतिष्ठानने एका व्यासपीठावर आणले. त्यांच्या बहारदार भाषणांची रसिकांना जणु मेजवानीच दिली, ती यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार वितरण सोहळयाच्या निमित्ताने. हा सोहळा औरंगाबादेत १२ जानेवारी २००७ रोजी मोठ्या जोषात आणि थाटामाटात संपन्न झाला. या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण प्रसंगी व्यासपीठावर सर्वश्री विजय कान्हेकर, दत्ता बाळसराफ, विभागीय अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, पाहुणे वक्ते अच्युत गोडबोले, विश्वास कचरे, कोषाध्यक्ष सचिन मुळे आणि युवा पुरस्कार विजेते अभिजित वडगांवकर, कुषावर्ताबाई बेळे आणि मान्यवर होते. कार्यक्रमाचे बहारदार संचालन प्रा. शिवानंद भानुसे यांनी केले.

**७) विभागीय केंद्र, लातूर :**

१) १ एप्रिल २००६ रोजी भूम-परंडा तालुक्याचा दौरा करण्यात आला. यावेळी मा.श्री.संजय गाढवे, चेअरमन, दूध उत्पादन संघ यांच्या अध्यक्षतेखाली सदर दूध डेअरीवरती कार्यकर्त्यांची एक बैठक घेऊन चर्चा-विचारविनिमय करण्यात आला. यावेळी सदर दौऱ्यात विभागीय केंद्र, लातूरचे अध्यक्ष डॉ. जे. एम. वाघमारे व श्री. सचिव, श्री. हरिभाऊ जवळगे होते.

२) १४ मे ०६ रोजी कळंब येथे प्रा. विठ्ठलराव जाधव यांच्या निवासस्थानी त्यांच्याच अध्यक्षतेखाली कळंब तालुका परिसरातील कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस केंद्राचे पदाधिकारी उपस्थित होते.

३) २५ जून०६ रोजी उस्मानाबाद येथे मा. श्री. जीवन गोरे यांच्या कॉम्प्लेक्सवर त्यांच्या अध्यक्षतेखाली, उस्मानाबाद शहर व परिसरातील कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली.

४) २ जुलै ०६ रोजी उमरगा येथे भारत विद्यालयामध्ये, प्राचार्य शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सदर भागातील कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली.

५) २५ जुलै ०६ रोजी नळदुर्ग येथे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये मा. शिवाजीराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

६) २० ऑगस्ट०६ रोजी बिंदू माधव महाविद्यालय,भोकर, जि. नांदेड येथे प्राचार्य बी.के.कदम यांच्या अध्यक्षतेखाली त्या भागातील कार्यकर्त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

७) ३ सप्टेंबर ०६ रोजी प्रा. पानपट्टे यांच्या अध्यक्षतेखाली हिंगोली येथे सरांच्या निवासस्थानी सदर जिल्हयातील कार्यकर्त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले.

८) १७ सप्टेंबर ०६ रोजी लातूर येथे ज्ञानेश्वर विद्यालयामध्ये मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनानिमित्त कवी प्रा.फ.म.शाहाजिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काव्यवाचन-कवी संमेलन घेण्यात आले. सदर कवी संमेलनाचे उद्घाटन विभागीय केंद्र लातूरचे अध्यक्ष डॉ.जे.एम.वाघमारे यांनी केले. तर कवी योगीराज माने यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सुमारे ५० पेक्षा अधिक कवींनी यात सहभाग घेतला.

९) २५ नोव्हेंबर ०६ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीदिनानिमित्त लातूर नगर परिषदेच्या सभागृहामध्ये 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय' या विषयावर सकाळचे संपादक श्री. चंद्रकांत वानखेडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या अनुषंगाने सदर विषयावरच, खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेस उदंड प्रतिसाद मिळाला. अर्थातच प्रथम, द्वितीय व तृतीय या तीन पारितोषिकाशिवाय, ८ स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिके याच कार्यक्रमात देण्यात आली. यावेळी कार्यकर्ते, परीक्षक, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जे. एम. वाघमारे हे होते. तर प्रास्ताविक श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले.

१०) १० डिसेंबर०६ रोजी महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर येथे प्राचार्य कॅ. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

११) ७ जानेवारी ०७ रोजी निलंगा येथे शिवाजी विद्यालयामध्ये पंढरीनाथ जाधव यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली.

१०) ११ फेब्रुवारी ०७ रोजी उदगीर व औराद शहाजानी येथे संपर्क दौरा करण्यात आला. अनुक्रमे ॲड. दत्ता पाटील व प्रा.दत्ता सोमवंशी

यांच्या अध्यक्षतेखाली सदरील दोन्ही बैठका त्यांच्या निवासस्थानी घेण्यात आल्या.

१२) १२ मार्च ०७ रोजी शाहू चौक,लातूर येथे यशवंतराव चव्हाण यांची ९४ वी जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने घेण्यात आलेल्या कार्यक्रमास मा.आ.विक्रम काळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर प्राचार्य अनिरुद्ध जाधव हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

त्याचबरोबर सदर कार्यकालामध्ये विभागीय केंद्र लातूरच्या वतीने अन्य पुरोगामी व परिवर्तनवादी अशा सामाजिक चळवळी आणि सेवाभावी संस्थांच्या, सार्वजनिक कार्यक्रमामध्ये सातत्याने लक्षणीय अशी स्वतंत्रपणे भागीदारी केलेली आहे.

१) माहे डिसेंबर ०६ मध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने कायद्यासाठी लातूर येथे करण्यात आलेल्या जाहीर सत्याग्रहामध्ये आपल्या केंद्राच्या कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला.

२) त्याचबरोबर सदर संघटनेच्या वतीने लातूर शहर व परिसरामध्ये आयोजित करण्यात आलेल्या सत्यशोधकी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह समारंभांना उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदविण्यात आला.

३) अशाच सामाजिक मित्र संघटनांनी आयोजित केलेल्या शेतकरी शेतमजूर, कामगारांच्या प्रश्नासह, सच्चर समिती अहवाल आदि प्रश्नावर आयोजित करण्यात आलेल्या परिषदा आणि मेळाव्यांना, आपल्या केंद्राने सक्रिय सहयोग नोंदविला.

**११. वार्तापत्र :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबईच्या वतीने प्रतिष्ठानच्या सभासदांना कार्यक्रम/उपक्रम यांची माहिती मिळावी यासाठी तीन महिन्यातून एकदा वार्तापत्र प्रसिद्ध करण्यात येते. वार्तापत्राचे मानद संपादक म्हणून दत्ता बाळसराफ काम पाहतात. या वार्तापत्रामध्ये रंगस्वरतर्फे होणारे सांस्कृतिक कार्यक्रम, नवमहाराष्ट्र युवा अभियान, महाराष्ट्र महिला व्यासपीठाचे युवक व महिलांसाठी आयोजित केले जाणारे विविध उपक्रम त्याचप्रमाणे कृषी व सहकार. मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम, ग्रंथालय, शिवाय पुणे, नागपूर, कराड, नाशिक, औरंगाबाद, लातूर, कोकण या प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राच्या कार्यासंबंधी सविस्तर अहवाल प्रसिद्ध होतो. वार्तापत्राच्या वाचकांना यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे मार्गदर्शन व्हावं यासाठी विविध विषयांवरील त्यांचे लेख समाविष्ट केले जातात. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानने घेतलेल्या स्पर्धामध्ये पहिला क्रमांक मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या लेखाचा समावेश वार्तापत्रात केलेला आहे. मा. शरद काळे, मा. श्री. बापूसाहेब खैरे व डॉ.रवि बापट हे वार्तापत्रासाठी वेळावेळी बहुमूल्य सल्ला देत असतात. या अहवाल वर्षात वार्तापत्राचे दोन अंक प्रसिद्ध झाले.

विश्वस्त मंडळ/कार्यकारिणी मंडळ
**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**

मुंबई
दिनांक : .९.२००७




नवमहाराष्ट्र युवा अभियानने आयोजित केलेल्या अपंग हक्क व विकास परिषदेमध्ये स्मरणिकेचे उद्‌घाटन करताना केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार सोबत हेमंत टकले, मा. नाम. धर्मराव बाबा अत्राम, राज्यमंत्री, श्री.विजय कान्हेकर, श्री. आर. के. गायकवाड, आयुक्त, अपंग कल्याण व मा. सौ. सुप्रिया सुळे.



सृजन कार्यशाळेत कागदी शिल्पकला/ तयार करीत असताना सहभागी विद्यार्थी



विभागीय केंद्र नाशिकने आयोजित केलेल्या येथे राज्यस्तरीय अपंग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धेतील स्पर्धक.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई

## प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१ | यशवंतराव चव्हाण : विधी मंडळातील निवडक मराठी भाषणे भाग-१ संकलन : डॉ.व्ही.जी.खोबरेकर | २००.०० |
| ०२ | वाय.बी.चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधीमंडळ भाग-२ संकलन : डॉ.व्ही.जी.खोबरेकर | २५०.०० |
| ०३ | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट- वाय.बी.चव्हाण भाग १ ते ४ संकलन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४ | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन-ना.धों.महानोर | ३.५० |
| ०५ | सहयाद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६ | म.ज्योतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन-प्रा.गजमल माळी | १२.०० |
| ०७ | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास-संपादक-वि.स.पागे | ३५.०० |
| ०८ | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन-संपादन- अण्णासाहेब शिंदे | ६९.०० |
| ०९ | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन-शरदराव पवार- भाषणसंग्रह-संपादन दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १० | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन-पी.बी.पाटील | १००.०० |
| ११ | नवभारत : परिवर्तनाची दिशा- संपादन-पी. बी. पाटील | १००.०० |
| १२ | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास-संशोधक/लेखक-लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३ | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल-डॉ.नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४ | यशवंतराव चव्हाण-चरित्र लेखन-अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५ | शब्दांचे सामर्थ्य-संपादन-राम प्रधान | ३७५.०० |
| १६ | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) | २५०.०० |
| १७ | बाऊंटीफूल बनियन-डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र खंड-४ (इंग्रजी)-बॅ.पी.जी.पाटील | ८००.०० |
| १८ | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९ | अजिंठा-(काव्यसंग्रह) लेखक-ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |

### व्हिडीओ कॅसेटस्

मी एस. एम : एस. एम. जोशी यांचा जीवनपट

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट

प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट

पु. ल. वृत्तांत : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट

या चारही व्हिडीओ कॅसेटस्ची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने केली असून दिग्दर्शनाची जबाबदारी सुप्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.

कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक-श्री. राम गबाले.

येस्, आय एम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट दिग्दर्शक-विनय नेवाळकर